
१७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांतीला सुरुवात झाली, पण तिचा उद्रेक १८०४ मध्ये नेपोलियनचा उदय होईपर्यंत सातत्याने चालू होता. तत्कालीन इंग्रज सरकारने फ्रेंच राज्यक्रांतीच्या वार्तांना बंदी घातली असल्याने, फ्रान्समधील घडामोडींच्या वास्तव वार्ता कळणे अशक्य होते आणि त्यामुळे या काळात इंग्लंडमध्ये जे काही लिहिले गेले, त्यामध्ये सत्यांश असेलच, असे सांगणे कठीण होते. गरीब-श्रीमंतांमधील हा लढा होता, की उपेक्षित मध्यमवर्गीयांची ही उठावणी होती, याबद्दल मतभिन्नता होती.

१८३७ साली कार्लाइलने फ्रेंच राज्यक्रांतीवरील आपला ग्रंथ लिहिला. इंग्रज जनमनाची या ग्रंथाने.चांगलीच पकड घेतली. पण या ग्रंथाला ऐतिहासिक वस्तुस्थितीपेक्षा कल्पना-विलासाचीच जोड अधिक होती. १८५९ साली डिकन्स्ने आपली 'टेल् ऑफ टू सिटीज्' ही ऐतिहासिक कादंबरी लिहिली. ती लिहिताना कार्लाइलचा ग्रंथच त्याने पायाभूत मानला.

ऐतिहासिक घटना व खाजगी काल्पनिक जीवनचित्रे यांचा मेळ घालताना डिकन्स्ला फ्रेंच राज्यक्रांतीचे वस्तुनिष्ठ राजकीय मूल्यमापन करणे अशक्य झाले. फ्रान्समधील दारिद्र्य त्याला बोचले. धनिकांचा उन्मत्तपणा त्याला असह्य वाटला, तर क्रांतिकालीन क्रौर्याची, सूड-बुद्धीची त्याला घृणा आली. आजच्या भारतीय जमान्यात मात्र डिकन्स्च्या या कथेचे मनन आवश्यक वाटते.

जुन्या ऐतिहासिक घटनांपासून माणसे बोध घेणारच नसतील, तर इतिहासाची पुनरावृत्ती टळणे अशक्य आहे. डिकन्स्च्या या कथेचे योग्य मूल्यमापन, रसग्रहण थोरांनी न केल्यास पोरे करतील!!

*चार्लस् डीकन्सची 'अ टेल ऑफ टू सिटीज' सन १८५९ मधील, त्या गाजलेल्या कादंबरीचा हा मराठी संक्षेप, पुस्तिकेच्या रूपात सप्टेंबर १९६७ मध्ये प्रकाशित झाला. मुंबईच्या ढवळे प्रकाशन समूहातील कर्नाटक प्रकाशन संस्थेने 'चेतक पुस्तक' मालेतून हे पुष्प गुंफले. 'स्वातंत्र्य-समता-बंधुता' हा फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्घोष होता; पण सामान्य जनतेच्या वाट्याला जे आले; त्याचे या कथेतील चित्रण मनस्पर्शी आहे.*




**प्रकरण** — **पृष्ठ**


**खंड पहिला - पुनर्जन्म**

| | | |
|---|---|---|
| | नांदी ते दिवस | २८९ |
| १ | देवाची लीला | २९० |
| २ | 'मुली, भिऊ नकोस' | २९४ |
| ३ | कुलूपबंद चर्मकार | २९७ |
| ४ | 'भूतकाळ विसरून जा' | २९९ |

**खंड दुसरा - सुवर्णाचा धागा**

| | | |
|---|---|---|
| ५ | खटल्याला विलक्षण कलाटणी | २९९ |
| ६ | प्रचंड वादळ | ३०३ |
| ७ | भाषा तसा माणूस | ३१४ |
| ८ | पुन्हा चर्मोद्योग | ३१९ |
| ९ | जुने सहकारी | ३२१ |
| १० | वादळाची लक्षणे | ३२३ |
| ११ | पॅरिस गाठण्याचा निश्चय | ३२५ |

**खंड तिसरा - वादळ धागा**

| | | |
|---|---|---|
| १२ | नवा कायदा | ३३१ |
| १३ | संकटाला आमंत्रण | ३३३ |
| १४ | डार्ने मुक्त | ३३७ |
| १५ | सॉलोमन उर्फ बरसाड | ३३९ |
| १६ | बदमाष बंधू | ३४३ |
| १७ | वेगळीच प्रेरणा | ३४४ |
| १८ | हा काय मूर्खपणा | ३४६ |
| १९ | चिंधड्या उडवीन | ३४८ |
| २० | खरी चिरशांती | ३५० |




# कथा ही नगरींची दोन

## नांदी : ते दिवस

ते दिवस जसे उत्कृष्ट होते, तसेच निकृष्टही होते. ते युग शहाणपणाचे होते, तितकेच मूर्खपणाचेही होते. तो काळ श्रद्धेचा होता, तितकाच पाखंडी पणाचाही होता. तो मोसम प्रकाशाचा होता, तितकाच काळोखाचाही होता. तो आशेचा वसंत होता, तसाच नैराश्याचा शिशिर होता. आमच्यापुढे सगळ्या सिद्धी हात जोडून उभ्या होत्या, तसेच आमच्या हातात नुसते धुपाटणेच राहिलेले होते. आम्ही सगळे स्वर्गावर स्वारी करीत होतो, तशीच आम्ही सगळ्यांनी थेट नरकाची वाट धरलेली होती. थोडक्यात सांगायचे, म्हणजे तो काळ आजच्यासारखाच होता. त्याने आजच्या सारखीच चांगले-वाईटपणाची कमाल मर्यादा गाठलेली होती. त्या काळचे जाणकारही ही वस्तुस्थिती आग्रहाने सांगत.

त्या काळचा इंग्लंडचा राजा अगदीच बिनडोक होता. त्याची राणीही रूपाने बेताचीच होती. मात्र फ्रान्सचा राजा जरी इंग्लंडच्या राजासारखा बिनडोक असला, तरी त्याची राणी मात्र रूपवती होती. दोन्ही देशांमधली सरदार-दरकदार तर आपल्या सत्तेची व संपत्तीची मक्तेदारी जणू युगानुयुगे अबाधित राहणार आहे, या नादात होते.

ते १७७५ साल होते. इंग्लंडमध्ये त्या काळी दैवी संदेशांचा सुळसुळाट माजलेला होता. याच्या उलट अमेरिकन जनतेने मानवी हक्कांचा जाहीरनामा मंजूर करून इंग्लंडच्या राजाला व जनतेला नुकताच धाडून दिलेला होता. हा जाहीरनामा कोणत्याही दैवी संदेशापेक्षा अखिल मानवजातीच्या दृष्टीने अधिक महत्वाचा असल्याचे सिद्ध झालेले होते.

फ्रान्समध्ये दैवी चमत्कारांऐवजी धार्मिक जुलुमांना ऊत आलेला होता. राज्यकर्त्यांच्या उधळपट्टीला सुमार नव्हता. एवढ्या तेवढ्या निमित्ताने धर्ममार्तंडाच्या आज्ञेवरून गरीबगुरिबांचे हात-पाय तोडणे, त्यांच्या जिभा छाटणे, त्यांना जिवंत जाळणे, असल्या अमानुष शिक्षांचे सत्र चाललेले होते. या अनाचारांचा प्रतिकार करण्यासाठी नियती 'गिलेटिन'(जुलुमकर्त्यांना फाशी द्यायचे यंत्र) उभारायच्या उद्योगात होती. पॅरिस शहराच्या परिसरात गोरगरिबांच्या वस्त्यांतून यमराज क्रांतीचे वाहन व्हायच्या तयारीत होता.

इंग्लंडमध्येही सशस्त्र दरोडेखोरांचा सुळसुळाट माजलेला होता. वाटमाऱ्या, घरफोड्या, चोरट्या मालाचा व्यापार, इत्यादींना सुमार राहिलेला नव्हता. छोट्या-मोठ्या गुन्हेगारांना फाशी द्यायचा सपाटा चालू झाला, तरी कोणालाच कशाचे काही वाटत नव्हते. या आणि अशाच प्रकारच्या हजारो घटना सन १७७५ मध्ये दोन्ही देशांत घडत होत्या. जुलूमकर्त्यांच्या शासनाची तयारी यमराजाने क्रांतीच्या रूपाने निवांतपणे चालविलेली असली, तरी राज्यकर्त्यांचे तिकडे अजिबात लक्ष नव्हते. आपल्या ईश्वरदत्त हक्कांचा बेमुर्वत उपभोग घेण्यात ते सर्वस्वी दंग होते. असे हे १७७५ साल राज्यकर्त्यांच्या मोठेपणाचा व लक्षावधी प्रजाजनांच्या क्षुद्रपणाचा डंका वाजवीत होते. त्यातच या कथेतील पात्रे सामील होती आणि नियतीने त्यांना दाखवून दिलेल्या मार्गाने चालली होती.

## खंड पहिला : पुनर्जन्म

### १.देवाची लीला

१७७५ च्या नोव्हेंबर महिन्यातील ती एक भयाण रात्र होती. पाऊस, थंडी आणि घनदाट धुके यांनी एकच गहजब चालविला होता. अशा या भयाण रात्री लंडनहून डोव्हरला निघालेली टपालगाडी शूटर टेकडीच्या चढाला लागली होती. चिखला-पाण्यातून रें रें करीत आपला मार्ग कापीत होती. गाडीतील सर्व उतारू पायउतार होऊन गाडीच्या बाजूने रेंगाळत चालले होते.

हा काळच असा होता, की नागरी वस्तीवरही रात्री अपरात्री दरोडे पडत! मग अशा निर्जन मार्गावर दरोडेखोरांची भीती असावी यात काहीच आश्चर्य नव्हते. गाडीबरोबर चाललेले प्रवासी याच शंकेने भयभीत होऊन एकमेकांकडे संशयाने पाहात होते. सर्वच प्रवासी थंडीवाऱ्याने हैराण झाले असल्याने त्यांनी आपली अंगे नखशिखांत गरम कपड्यांनी लपेटून घेतली होती. कोणाचेच चेहरे व अंगकाठी दिसून येण्यास मार्ग नव्हता आणि यामुळे आपणांपैकीच कोणी इसम लुटारू नाही ना, अशी धाकधूक प्रत्येकाला वाटत होती.

टेकडीची चढण चढून होताच, घोडे तोंडातून फेस गाळीत धापू लागले. टपालगाडीच्या रक्षकाने पुढे येऊन गाडीचे दरवाजे उघडले आणि उतारूंनी आता गाडीत जाऊन बसण्यास हरकत नाही, असे सुचविले. एवढ्यात गाडीच्या पुढील भागी पेटीवर बसलेल्या सईसाने ''ज्यो ऽ ऽ!'' अशी त्याला हलक्या आवाजात हाक मारली. त्याच्या आवाजात एक प्रकारे शंका व्यक्त करण्याचा सूर होता. मग दोघेही कान टवकारून ऐकू लागले.

''टॉम, कुणीतरी घोडदौड करीत येत असावं!'' रक्षक घाईघाईने म्हणाला व त्याने आपली बंदूक सरसावली. हे करीत असताना त्याने उतारूंनाही अगदी स्तब्ध राहाण्याचा इशारा दिला. एक उतारू गाडीच्या पायरीवर चढून आत बसण्याच्या विचारात होता, पण तो या इशाऱ्याने थबकला व तेथेच उभा राहिला. प्रत्येकजण कसा जीव मुठीत घेऊन स्तब्ध उभा होता. रात्रीची भयाण नीरवता यामुळे अधिकच गंभीर झाली होती. घोड्यांच्या धापा व उतारूंच्या भीतीग्रस्त हृदयांची धडधड हीच काय ती भयाण शांततेत ऐकू येत होती. टेकडी चढून वर येणाऱ्या घोड्याच्या टापांचा आवाज क्रमश: स्पष्ट स्पष्ट ऐकू येऊ लागला.

''कोण आहे? एकदम खडा हो! नाहीतर गोळी घालेन!'' रक्षकाने घनगंभीर आवाजात धमकी दिली.

घोडा एकाएकी आवरला गेल्याने चिखला-पाण्यात कडमडलेल्या त्याच्या टापांचा आवाज ऐकू आला व नंतर थांबला. येणारा घोडेस्वार थबकला होता.

''डोव्हरला जाणारी टपालगाडी चालली आहे काय?'' दाट धुक्यातून आवाज आला.

''तुला का पंचाईत? तू कोण आहेस? '' रक्षकाने दटावले.

''ही जर टपालगाडी असेल, तर तिच्यातला जर्व्हिस लॉरी या उतारूकडे माझं काम आहे!''

''तू आधी असशील तिथे खडा हो!'' नंतर तो प्रवाशांना उद्देशून म्हणाला, ''तुमच्यापैकी कोणी जर्व्हिस लॉरी आहे

> मी, माझी मुले व माझी मित्रमंडळी विल्की कॉलिन्सच्या 'द फ्रोझन डीप' (हिमसागर) या नाटकात काम करीत असू, त्यावेळी हे कथानक मला सुचले. या कथानकातली मुख्य भूमिका जणू काही मलाच करायची आहे, अशी माझी भावना होती. ही भूमिका डोळस प्रेक्षकांसमोर साकार करायची आहे या जाणिवेने त्या भूमिकेच्या बारीक-सारीक लकबा मी अंगवळणी पाडून घेतल्या आणि त्यांनी आपसूकच आकार धरला. मी त्यात पुरता रंगून गेलो आणि त्या भरातच पुढे वर्णिलेल्या यातना जणू काही मी स्वत:च भोगल्या, इतका त्यांच्याशी एकरूप झालो.
>
> फ्रेंच राज्यक्रांतीच्या पूर्वी किंवा प्रत्यक्ष क्रांती चालू असता फ्रेंच जनतेची जी परिस्थिती मी सांगितली आहे, ती तिच्या खरेखोटेपणाची शहानिशा करून घेऊनच सांगितली आहे. तो भयानक काळ रंजक व ठसठशीत स्वरूपात चितारायच्या साधनांमध्ये या कथेच्या रूपाने काही तरी भर घालावी, अशी उमेद मी बाळगली आहे. मात्र फ्रेंच राज्यक्रांतीच्या इतिहासावर कार्लाइलने लिहिलेल्या अपूर्व ग्रंथातील तत्त्वचिंतनात भर घालण्याची उमेद कोणीच बाळगू नये.
>
> **-चार्ल्स् डिकन्स् (नोव्हेंबर १८५९)**

काय?''

गाडीत चढता चढता थबकलेला उतारू म्हणाला, ''मीच जर्व्हिस लॉरी! काय भानगड आहे?''

रक्षक त्याला उद्देशून म्हणाला, ''ते तुमचं तुम्हीच काय ते पाहा!'' उतारू दबलेल्या आवाजात म्हणाला, ''मी टपालगाडीत आहे. आपण कोण? माझ्याकडे आपलं काय काम आहे?''

''टी. आणि कंपनीने तुम्हाला काही निरोप द्यायला मला तुमच्या मागोमाग दवडलं आहे.''

''रक्षकमहाशय, हा दूत माझ्या परिचयाचा आहे. त्याला माझ्याकडे येऊ द्यायला काही हरकत दिसत नाही.''

करड्या आवाजात रक्षक ओरडला, ''जो कोणी असेल, त्याने पायउतार होऊन पुढे यावं. त्याच्याजवळ पिस्तुल असो अगर नसो, त्याने आपल्या हाताची त्या दिशेने काही हालचाल केलेली दिसली, तर मात्र गोळी घातली जाईल!''

मग तो घोडेस्वार पायउतार होऊन पुढे आला. रक्षकाकडे संशयाने पाहात त्याने एक पत्र जर्व्हिस लॉरीच्या हाती दिले.

''रक्षकमहाशय, मी टेलसन बँकेचा प्रतिनिधी असून पॅरिसला जायला निघालो आहे. गाडीच्या कंदिलाच्या प्रकाशात मी हे पत्र वाचू का?''

''अलबत्!'' बंदुकीवरील पकड किंचित्ही शिथिल होऊ न देता रक्षक म्हणाला.

''कुमारी मॅनेटसाठी डोव्हर इथे वाट पाहा!'' लॉरीने मोठ्यानेच ते पत्र वाचले. नंतर तो निरोप आणणाऱ्या माणसाला उद्देशून म्हणाला, ''जेरी, 'पुनर्जन्म' एवढंच माझं उत्तर सांग!''

जेरी खांदे उडवीत पुटपुटला, ''काय चमत्कारिक उत्तर आहे!''

''वेळ घालवू नको! एवढाच निरोप घेऊन जा! अच्छा, नमस्कार!'' एवढे बोलून लॉरीने दरवाजा उघडला व गाडीत प्रवेश केला. बाकीचे उतारूही एकामागून एक गाडीत जाऊन बसले आणि गाडी टेकडीच्या उतारावरून खाली डोव्हरच्या दिशेने जाऊ लागली. घनदाट धुके आता तिला चोहोबाजूंनी वेढू लागले.

''टॉम, ऐकलास तू निरोप?'' रक्षकाने सईसाला विचारले.

''होय, ज्यो, भलताच चमत्कारिक निरोप!''

''भलतीच गंमत दिसते! या बेट्यांच्या या निरोपाचा काही थांगपत्ताच लागत नाही!'' रक्षक उद्गारला.

लंडनकडे परत फिरलेल्या जेरीच्या घोड्यांचा टापांचा आवाज हळूहळू मंद होत अजिबात बंद झाला, तर इकडे टपालगाडीही उतारावरून गडगड करीत डोव्हरच्या दिशेने दौडू लागली.

लॉरी बसल्या बसल्या डुलक्या घेत होता. मध्येच तो दचकून जागा होई व फिरून पेंगू लागे. त्याचा डोळा लागतो न लागतो तोच अनेक स्वप्ने त्याच्या डोळ्यापुढे तरंगू लागत. स्वप्नसृष्टीत अनेक चेहरे त्याला दिसत. प्रत्येक वेळी त्याला असा भास होई, की आपण कोठले तरी थडगे उकरीत असून त्यात गाडलेला मृतदेह बाहेर काढण्याची खटपट करीत आहोत.

एखादा असा चेहरा पुढे येई, की त्याचा फिकेपणा, बसलेली गालफडे व काष्ठवत् झालेली शरीरयष्टी पाहून लॉरी अगदी थिजून -गोठून जाई. आपल्या स्वप्नातल्या माणसाला तो विचारी,

''किती वर्षांपूर्वी तुला गाडलं?''

''असेल अठराएक वर्षांपूर्वी!''

''तुझा पुनर्जन्म होणार आहे, हे तुला माहीत आहे?''

''मला कुणी कुणी असं सांगतात खरं!''

''तुला जगायची इच्छा आहे?''

''मी काय सांगणार? कसं सांगणार?''

''मी तिचं दर्शन तुला घडवू का? ती तुला खात्रीने दिसेल!''

स्वप्नांत दिसणाऱ्या प्रत्येक मृत व्यक्तीला हेच प्रश्न तो बिचारी व शेवटच्या प्रश्नास प्रत्येक वेळी काही निराळेच उत्तर मिळे.

''हां. पण तिला भेटायचं, म्हणजे मला मरावं लागेल?'' काही वेळा ती व्यक्ती म्हणे, ''मला ती कोण ते माहीत नाही; मला समजत नाही.'' असे म्हणून ती व्यक्ती अश्रू ढाळू लागे.

फटफटीत उजाडले. लॉरी जागा झाला. रात्रीची ती स्वप्नमालिका व तीत झालेली प्रश्नोत्तरे अद्यापि त्याच्या

कानात घुमत होती, त्याला बेचैन करीत होती. रात्रीच्या भयप्रद छाया नष्ट झाल्या होत्या. उगवत्या सूर्याची प्रभा सर्वत्र फाकली होती. जमीन भिजून चिंब झाली होती. चिखलाने सर्वत्र दलदल माजविली होती पण आकाश मात्र निरभ्र होते. सूर्याच्या कोमल प्रकाशात सर्वत्र कसे शांत आणि सुंदर भासत होते.

उगवत्या सूर्याकडे पाहात लॉरी पुटपुटला, 'अठरा वर्षं! अठरा वर्षं जिवंत गाडले जाणं अशक्य! अशक्य!! देवा, तुझी लीला अगाध आहे हे मात्र खरं!'

●●●

## २. 'मुली, भिऊ नकोस'

सकाळी बऱ्याच उशिरा टपालगाडी डोव्हर शहरातील एका पथिकाश्रमापुढे येऊन उभी राहिली. पथिकाश्रमापुढील प्रशस्त अंगणात उतरताच लॉरीने तेथील एका नोकराला विचारले, ''उद्या कॅलेला जाणारं एखादं गलबत मला मिळेल का?''

''मिळेल की! पण ती गोष्ट उद्याच्या हवामानावर अवलंबून आहे!'' नंतर त्या नोकराने पुढे विचारले, ''साहेब, आपल्याला उतरायला एखादी खोली व न्याहरी हवी आहे का?''

''जरूर!''

लॉरीने अंगावर लपेटलेले जाडजूड कपडे उतरले. तो सुमारे साठीचा दिसत होता. त्याचे कपडे नीटनेटके असून एकूण रुबाबावरून तो कोणी जबाबदार अधिकारी असावा असे दिसत होते.

पथिकाश्रमातील प्रशस्त दिवाणखान्यात बसून तो शांतपणे न्याहरीची वाट पाहात होता. त्याची मुद्रा अगदी शांत दिसत होती. टेलसन बँकेचा एक जबाबदार अधिकारी या दृष्टीने आवश्यक असलेले गांभीर्य, आत्मविश्वास व कोणतीही गोष्ट गुप्त ठेवण्याची कला त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होती. त्याचे डोळे चांगलेच तीक्ष्ण व चमकदार दिसत होते. त्याचा रंग त्याच्या आरोग्याचा निदर्शक होता. चिंतेची बारीक छटाही त्याच्या मुद्रेवर दिसत नव्हती.

न्याहरी हजर होताच आपली खुर्ची टेबलाकडे सरकवीत तो नोकराला म्हणाला, ''हे पाहा, आज एखादी तरुणी इथे केव्हा येऊन टपकेल याचा नेम नाही. ती कदाचित् माझी चौकशी करेल. म्हणजे 'जर्व्हिस लॉरी हा टेलसन बँकेचा अधिकारी इथे आहे काय?' असं विचारेल. तिच्यासाठी एक खास खोली राखून ठेव!''

''होय साहेब! लंडनची टेलसन बँक ना? या बँकेची बरीच माणसं लंडन ते पॅरिस अशी सारखी ये-जा करीत असतात. त्यांची बडदास्त राखण्याचे प्रसंग आम्हाला नेहमीच येत असतात!''

''हो का? आमची बँक इंग्लंडची व फ्रान्सची अशी संयुक्त बँक आहे. पण मी मात्र गेल्या पंधरा वर्षांत फ्रान्सला गेलेलो नाही.''

''पंधरा वर्षांपूर्वी म्हणजे मी इथे येण्यापूर्वीची ही गोष्ट आहे साहेब! मला वाटतं आपली बँक स्थापन होऊन पन्नास वर्षं तरी झाली असतील, नाही?''

''पन्नास? दीडशे वर्षं झाली या बँकेला!''

यानंतर लॉरी फिरण्यासाठी म्हणून समुद्रकिनाऱ्यावर गेला. दूर इंग्लिश खाडीच्या पलीकडे असलेला फ्रान्सचा किनारा त्याला तेथून अंधूक अंधूक दिसत होता. हळूहळू आकाशात ढग जमू लागले. लॉरीच्या मनातही अनेक विचार गर्दी करू लागले. अंधार पडू लागण्याच्या सुमारास तो परत आला आणि दिवाणखान्यातील शेकोटीपाशी येऊन बसला. त्याच्या मनात आता काल स्वप्नसृष्टीत पाहिलेल्या माणसाचे विचार गर्दी करू लागले. अठरा वर्षांपूर्वी वारलेला तो माणूस त्याच्या मनात थैमान घालू लागला. डोव्हरच्या अरुंद रस्त्यावरून खडखडाट करीत येत असलेल्या घोडागाडीचा आवाज त्याने ऐकला. गाडी बाहेर अंगणात येऊन उभी राहिल्याची जाणीवही त्याला झाली.

'ही मुलगी बहुधा आली असावी!'' तो उद्गारला आणि

अल्पावधीतच तेथे येऊन थडकलेल्या नोकराने त्याला वर्दी दिली, ''ल्यूसी मॅनेट नावाची मुलगी लंडनहून आली असून, टेलसन बँकेच्या अधिकाऱ्याला भेटायची तिची इच्छा आहे.'' किंचित त्रस्त मुद्रा करून लॉरी उठला आणि त्या नोकराच्या पाठोपाठ ल्यूसी मॅनेटच्या खोलीत येऊन दाखल झाला. खोली बरीच मोठी असली, तरी जरा अंधारीच होती. तेथे लावलेल्या दोन भल्या मोठ्या मेणबत्त्यांचा मंद प्रकाश खोलीत पसरला होता. त्या अंधूक प्रकाशात, सुमारे सतरा-अठरा वर्षांची एक तरुणी आपलीच मार्गप्रतीक्षा करीत उभी आहे, याची लॉरीला जाणीव झाली. अद्यापि तिने आपले प्रवासी कपडेही बदलले नव्हते.

मुलीची एकूण आकृती मोठी सुंदर होती. तिच्या केसांना असलेली सुवर्णछटा मोठी कमनीय होती. निळ्या डोळ्यांतील चौकसपणा विलोभनीय होता. पंधरा वर्षांपूर्वी इंग्लिश खाडी ओलांडताना आपल्या हातात असलेल्या एका अर्भकाची लॉरीला आठवण झाली. ती हिवाळी रात्र अगदी थंड होती. समुद्र सारखा उसळ्या घेत होता. विचार तंद्रीतून जागे होऊन लॉरीने त्या मुलीला अभिवादन केले.

''आपण बसा ना!'' ती मुलगी अगदी स्पष्ट पण मधुर आवाजात म्हणाली. तिच्या उच्चारांतील फ्रेंच छटा लॉरीला जाणवल्यावाचून राहिली नाही.

''काल मला एक पत्र मिळालं. माझ्या वडिलांना मी कधीच पाहिलेले नाही. ते केव्हा वारले, याचीही मला काही कल्पना नाही. पण त्यांच्या मालमत्तेबाबत मी टेलसन बँकेच्या अधिकाऱ्याबरोबर पॅरिसला जावं, अशी एक सूचना त्यात आहे.''

''मीच तो अधिकारी!'' किंचित् अस्वस्थ हालचाल करीत लॉरी म्हणाला.

तिने मोठ्या नम्रतेने त्याला अभिवादन केले. 'आपण माझ्यापेक्षा किती तरी अनुभवी व वडील आहात,' असेच जणू तिला सुचवायचे होते.

ती म्हणाली, ''मी पोरकी असल्यामुळे मला बँकेच्या अधिकाऱ्याबरोबरच पॅरिसला रवाना करावे, अशी मीच बँकेला विनंती केली आणि म्हणूनच बँकेने मला डोव्हर मुक्कामी आपल्याला भेटायची सूचना दिली.''

आपली वाट पाहात थांबल्याबद्दल तिने लॉरीचे आभार मानले. ''आपला माझा परिचय नाही आणि काम काय आहे, त्याचीही मला कल्पना नाही!'' ती म्हणाली.

लॉरी मंद स्मित करीत म्हणाला, ''ल्यूसी मॅनेट! मी अगदीच अपरिचित आहे असं नाही! मी एका बँकेचा अधिकारी म्हणून बोलत आहे. मी जे सांगणार आहे, त्याकडे तुम्ही व्यवसायातील एक बाब म्हणूनच पाहिलं पाहिजे! मी जी हकिकत सांगणार आहे, ती आमच्या एका ठेवीदाराची आहे. तो एक फ्रेंच सद्गृहस्थ होता. चांगला डॉक्टर होता तो!''

''ती बिव्हायला होता का?''

''तुमच्या वडिलांप्रमाणे म्हणजे डॉ. मॅनेटप्रमाणे तो पॅरिस शहरीदेखील चांगला प्रसिद्ध होता. वीस वर्षांपूर्वी त्याचे सर्व आर्थिक व्यवहार मीच पाहात असे. त्याने एका इंग्रज तरुणीशी लग्न केलं होतं.''

''आपण मला माझ्या वडिलांची हकिकत सांगत आहात का? माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी आईनेही प्राण सोडला आणि मी पोरकी झाले. नंतर एका गृहस्थानी मला इंग्लंडला आणून सोडलं. ते गृहस्थ आपणच का?''

''होय. ल्यूसी मॅनेट, मीच तो गृहस्थ!'' लॉरीने पुढे जाऊन हळुवारपणाने ल्यूसीचा हात आपल्या हाती घेतला व त्याचे चुंबन घेतले. तो पुढे म्हणाला, ''आणि त्या दिवसापासून टेलसन बँकेने तुला आपली पाल्य समजून तुझा सांभाळ केला आहे!'' लॉरीचा आवाज खचल्याप्रमाणे झाला होता तरी तो नेटाने पुढे बोलू लागला, ''आतापर्यंतची हकीकत तुझ्या वडिलांचीच आहे. पण यानंतरच्या घटना काही निराळंच सूचित करीत आहेत. जर तुझे वडील वारले नसतील, हयात असतील... भिऊ नकोस मुली...'' तिच्या हाताची आपल्या हातावरील पकड घट्ट होऊ लागल्याची जाणीव लॉरीला झाली. ती थरथर कापतही होती. तिला धीर देऊन लॉरी पुढे बोलू लागला, ''तुझे वडील डॉ. मॅनेट एकाएकी नाहीसे झाले. त्यांचा कुठेच थांगपत्ता लागेना. त्यांच्या कुणातरी शत्रूंनी राजाकडे कागाळी करून त्यांना आजन्म तुरुंगात खितपत पाडायचा विचार केला असावा आणि त्यामुळेच ते एकाएकी नाहीसे झाले असावेत. तुझ्या आईने अनेक धडपडी करून पाहिल्या. राजा-राणीची

पायधरणी करून पाहिली, पण कुणाकडूनही तिला त्यांचा मागमूस लागला नाही.''

लॉरीच्या प्रत्येक शब्दागणीक ल्यूसी मॅनेटची अस्वस्थता वाढत होती. तो पुढे म्हणाला, ''तुझी आई मोठी शूर स्त्री होती. तुझ्या वडिलांचा थांगपत्ता काढण्यासाठी तिने अनेक हालअपेष्टा सहन केल्या आणि निराश झाल्यानंतर, तुला वाढवताना, तुझे वडील मृत झाले आहेत असा बोभाटा तिने जाणून बुजून केला. हे करण्यात तिचा उद्देश एवढाच होता, की तुझे वडील तुरुंगात खितपत आहेत, का मृत झाले आहेत, या शंकेने तुझं जीवन झाकळलं जाऊ नये! तुझ्या आई-वडिलांची मालमत्ता फार मोठी असेल असं नाही, पण आज तुझ्या वडिलांचा तलास लागला आहे. त्यांच्यात खूप बदल झाला आहे. पण तो भोवतालचं वातावरण बदलताच नष्ट होईल! ल्यूसी, तुझे वडील आपल्या एका जुन्या नोकराच्या घरी पॅरिसला सुखरूप असून, त्यांना परत आणावं, त्यांना सुख व प्रेम यांचा लाभ द्यावा, एवढीच माझी इच्छा आहे!''

भीती आणि दु:ख यांची एक सळसळती चमक ल्यूसीच्या अंगातून निघून गेली. ती स्वप्नात असल्याप्रमाणे पुटपुटली, ''मला त्यांना भेटायचं आहे.''

''डॉ.मॅनेट सध्या दुसऱ्याच नावाने वावरत असावेत. त्यांना गुपचूप फ्रान्समधून बाहेर काढलं पाहिजे. त्यांच्या जुन्या शत्रूंना याचा किंचितसुद्धा थांगपत्ता लागता उपयोगी नाही.'' लॉरी म्हणाला.

पण ल्यूसीची काहीच हालचाल दिसेना. लॉरीने तिच्याकडे नीट निरखून पाहिले. ती बेशुद्ध झाली होती. त्याची खूपच धांदल उडाली. एवढ्यात लालबुंद चेहऱ्याची एक धडधाकट बाई लगबगीने तेथे आली. तिने लॉरीला दूर सारले व नोकराला गार पाणी आणि हुंगण्यासाठी अमोनियाची बाटली आणण्याचा हुकूम दिला.

''आपण मोठे शहाणे दिसता!'' ती कडवटपणे म्हणाली, ''आपणाला जे काही सांगायचं होतं ते सांगताना पोरगी घाबरून मरणार नाही, एवढी खबरदारी घ्यायला काही हरकत नव्हती. आपला हा अडाणीपणा बँकेच्या धंद्याला शोभणाराच आहे म्हणा!'' तिच्या या बेदरकार भडिमाराने थक्क झालेला लॉरी म्हणाला, ''मला वाटतं, तिला आता बरं वाटेल!''

''तसं झालं तर मग आपले आभारच मानावे लागतील!''

थोडा वेळ थांबून लॉरीने विचारले, ''आपण तिच्याबरोबर फ्रान्सला येता का?''

''होऽ! येईन तर काय झालं.''

नंतर लॉरी त्या खोलीतून बाहेर पडला.

●●●

## ३. कुलूपबंद चर्मकार

'सेंट अँतोन' म्हणजे पॅरिस शहरातील कमालीचा दरिद्री घाणेरडा विभाग. तेथे वावरणाऱ्या प्रत्येक माणसाला, आपल्या कपड्या-लत्त्यांतून, हडकुळ्या शरीरयष्टीतून, आपल्या दारिद्र्याचे प्रदर्शन करणे भाग पडे. तेथील अरुंद रस्ते कचऱ्याने व घाणीने बुजबुजलेले असते. कुजट घाणीने तेथे कायमचे ठाण मांडलेले असे. अधूनमधून एखादे दुकान दिसे, पण त्यातील रिकामी डबडी येथे काही खरेदी-विक्री चालत नाही, हे स्पष्ट दर्शवीत. मुलखाचा भयाण व भकास असा हा विभाग पॅरिस नगरीत होता, हे एक मोठेच आश्चर्य होते!

नोव्हेंबर महिन्यातील अगदी कडक थंडीचा दिवस होता. छकड्यातून मद्याचे एक लाकडी टीप या भागातून चालले होते. आदळ-आपटीत टिपाला गळती लागली आणि हां हां म्हणता त्यातील मद्य गुत्त्यासमोरच रस्त्यात

सांडले. आजूबाजूच्या सर्व भागांत मद्याचे हे एकुलते एक दुकानच काय ते नीटनीटके दिसत होते.

गुत्तेवाला दारात उभा राहून सेंट अँतोनमधील दारिद्र्याचे निरीक्षण करीत होता. मद्य सांडल्याची वार्ता हां हां म्हणता सर्वत्र पसरली आणि मग मधमाश्यांचे मोहोळ उठावे त्याप्रमाणे घराघरांतून गजबज करीत असंख्य माणसे त्या मद्याच्या टिपाकडे धावली. टिपांतून निथळणाऱ्या व रस्त्यात सांडलेल्या मद्यावर ती अक्षरश: तुटून पडली. पिसाळलेल्या लांडग्यांप्रमाणे त्यांची एकूण अवस्था दिसत होती. मद्याने माखलेले त्यांचे हात व चेहरे रक्ताने माखल्याप्रमाणे दिसत होते.

''यांच्या अंगावर पडलेले हे लाल डाग केवळ मद्याचे आहेत!'' त्यांच्याकडे पाहात उभा असलेला गुत्तेवाला पुटपुटला व आत जाण्यासाठी वळला.

गुत्तेवाल्याचे वय सुमारे तीस वर्षांचे असून तो मोठा रानदांडगा व राकट माणूस दिसत होता. कडाक्याची थंडी असूनही त्याने फारसे कपडे घातले नव्हते. हात कोपरापासून उघडेच होते. त्याचे केस कुरळे व काळेभोर असून डोळे मोठे पाणीदार होते. सर्वसाधारणपणे तो सुस्वभावी असल्याचा भास होत होता, तरी त्याचा स्वभाव करारी व करडा असावा हे स्पष्ट दिसत होते.

तो आला तेव्हा त्याची पत्नी मादाम दफार्ज दुकानात एका टेबलाशी बसली होती. बाई नवऱ्याच्याच वयाची असून चांगली बळकट दिसत होती. तिच्या तीक्ष्ण नजरेतून कोणतीही गोष्ट सुटणार नाही याची सहज कल्पना तिचे डोळे पाहाताच येई. दुकानाच्या हिशेबांत, तिच्या हातून कधीच चूक घडली नव्हती.

नवरा आत आला तेव्हा तिचे विणकाम जोरात चालू होते. ती काही बोलली नाही पण 'खक्' करून एकदा हळूच खोकली मात्र. भुवयांची किंचित् हालचाल करून तिने पतीला सुचविले, की आत येऊन बसलेल्या गिऱ्हाइकांवर एकदा नजर टाकावी. पत्नीच्या संकेताचा अर्थ तत्काल लक्षात घेऊन दफार्जने आपली चौकस नजर एकदा दुकानात फिरविली आणि एका कोपऱ्यात बसलेला एक सभ्य व वयातीत गृहस्थ त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्या शेजारी एक सुंदर तरुणी बसल्याचेही त्याने पाहिले. दफार्ज आपल्या पत्नीकडे गेलेला पाहून तो गृहस्थ त्या तरुणीला हलक्या आवाजात म्हणाला,

''आपल्याला हवा असलेला माणूस तो हाच!''

''या गृहस्थाचं इथे काय काम असावं बरं? मी तर याला ओळखत नाही!'' दफार्ज पत्नीजवळ कुजबुजला. नंतर त्या गृहस्थाकडे आपले काहीच लक्ष नाही असे भासवीत तो तेथेच मद्य प्राशन करीत बसलेल्या आणखी तीन गिऱ्हाइकांकडे तो वळला.

''कसं काय? गळलेली, गळणारी सारीच दारू लोकांनी मारली वाटतं?'' त्यातील एकजण दर्फाजला उद्देशून म्हणाला.

''थेंब न् थेंब मारला लेकाच्यांनी, जॅक्सि!'' दफार्ज उत्तरला.

''इथल्या लोकांना दारिद्र्य, मरण, उपवास यांचीच चव माहीत असल्याने मद्याची मजा जरा निराळी वाटणार, जॅक्सि!''

''आज लेकाच्यांना एक पर्वणीच मिळाली, जॅक्सि!''

त्यांनी चालविलेल्या या सांकेतिक शब्दोच्चाराने किंचित् अस्वस्थ झालेली दफार्जबाई फिरून 'खक् खक्ऽ' करून हळूच खोकली.

''पर्वणीच तर काय, जॅक्सि!,'' दफार्ज म्हणाला आणि त्याची पत्नी पुन्हा खोकली.

''या लोकांच्या तोंडाला नेहमीच कडवटपणा आलेला आहे, बरोबर की नाही, जॅक्सि?''

''बरोबर, जॅक्सि!'' दफार्ज उत्तरला आणि मग त्याच्या पत्नीने केलेली किंचित् हालचाल पाहून तो त्यांना म्हणाला, ''ही माझी पत्नी!'' आणि मग त्या तीनही गिऱ्हाइकांनी आपल्या टोप्या काढून मादाम दफार्जला अभिवादन केले. तिने त्यांच्यावर एक ओझरती नजर टाकली, गुत्त्याच्या अंतर्गत भागाचे एकवार निरीक्षण केले आणि मग झपाट्याने आपल्या विणकामास सुरुवात केली.

दफार्ज आपल्या पत्नीकडे पाहात मग त्या लोकांना म्हणाला, ''साहेब! आपल्याला जी खोली हवी आहे, ती पाचव्या मजल्यावर आहे. अंगणाच्या डाव्या बाजूला वर जाण्यासाठी जिना आहे. बरं आहे, नमस्कार!''

त्या लोकांनी मद्याचे पैसे चुकते केले व ते बाहेर निघून

गेले.

नंतर तो वयातीत गृहस्थ पुढे आला व दफार्जला उद्देशून म्हणाला, ''मला आपल्याशी काही बोलायचं आहे.'' त्या उभयतांचे संभाषण अगदीच मोजके पण मुद्देसूद होते. नंतर लॉरीने, -होय, तो जर्व्हिस लॉरीच होता, आपल्याबरोबर असलेल्या ल्यूसी मॅनेटला खूण केली आणि ती दोघेही पहिल्या तीन माणसांच्या पाठोपाठ बाहेर पडली.

दफार्जने ल्यूसीपुढे, आपल्या जुन्या धन्याच्या कन्येपुढे, गुडघा टेकून व तिच्या हाताचे चुंबन घेऊन, तिच्याबद्दल आपला आदरभाव व्यक्त केला.

आता दफार्जच्या मुद्रेवरील चांगुलपणाचा भाव नष्ट झाला होता. त्याची मुद्रा कमालीची रागीट बनली होती. तो आता भयानक धोकेबाज माणसाप्रमाणे दिसू लागला होता.

''ते एकटेच आहेत काय?'' लॉरीने त्याला हळूच विचारले.

दफार्जने काहीच उत्तर दिले नाही आणि मग सर्वजण अंगणाच्या डाव्या कोपऱ्यात असलेला तो जुनाट जिना मुकाटपणे चढून जाऊ लागले.

''ते एकटेच का? परमेश्वर त्यांचा पाठीराखा आहे ना!'' दफार्ज कडवटपणाने जिना चढता चढता पुटपुटला.

''ज्या अवस्थेत ते मला आढळले, त्याच अवस्थेत ते अद्यापि आहेत. त्यांच्या रक्षणकर्त्यांनी त्यांना माझ्या स्वाधीन केलं आणि मीही धोका पत्करून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी पत्करली!'' दफार्ज म्हणत होता.

''त्यांच्यात खूप बदल झाला आहे का?''

''बदल?'' गुत्तेवाला मोठ्याने ओरडला व त्यांचे भिंतीवर ठकठक आवाज केला. लॉरीचे अंत:करण उत्सुकतेने भारावल्यागत झाले होते.

जिना अत्यंत घाणेरडा होता. सर्वत्र कचऱ्याचे ढीग पसरले होते. मोकळी शुद्ध हवा खेळण्यास कोठेच अवसर दिसत नव्हता. शेवटच्या मजल्यावर येताच सर्वजण थबकले आणि दफार्जने खिसे चाचपून एक किल्ली बाहेर काढली.

''दरवाजाला कुलूप आहे आणि ते का?'' लॉरीने आश्चर्याने विचारले. ''त्यांना दीर्घकाळ कुलूपबंद खोलीतच राहावं लागलं आहे. आता उघड्या खोलीत राहण्यानेच त्यांना अपाय होण्याची शक्यता आहे.'' घोगऱ्या आवाजात दफार्ज म्हणाला.

''तेही खरंच आहे! आपण राहात असलेल्या सुंदर जगात असले भयानक प्रकार घडत आहेत. जाऊद्या. चला पुढे''

हा सारा संवाद इतक्या हळू शब्दांत चालला होता, की ल्यूसीच्या कानावर त्यातील एक शब्दही गेला नाही. उत्सुकता व भीती यांमुळे तिचा वारंवार थरकाप होत होता. लॉरी तिला सावरण्याचा, उत्तेजन देण्याचा प्रयत्न वारंवार करीत होता.

वर गेल्यानंतर एका कोपऱ्यात त्यांना गुत्त्यात बसलेले ते तीन असामी आढळले.

''आपल्या अनपेक्षित भेटीमुळे मी या तीन बेट्यांना अगदीच विसरून गेलो होतो. जा बाबांनो, जा! आम्ही आता कामात आहोत,'' दफार्ज त्यांना उद्देशून म्हणाला. दरवाज्याच्या एका फटीतून ते तिघेही आत डोकावण्याचा प्रयत्न करीत होते. आपली जागा सोडून ते तिघेही दूर झाले व मुकाट्याने खाली निघून गेले.

हा प्रकार पाहून लॉरी किंचित् रागाने म्हणाला, ''डॉक्टर मॅनेट यांचे प्रदर्शन मांडायचा तुझा विचार आहे काय?''

''माझ्याच नावाची ही माणसं आहेत. आम्ही सारे जॅक्विस आहोत! तुम्ही इंग्रज असल्याने तुम्हाला यातलं काही एक कळणार नाही.'' नंतर तो पुटपुटला, ''आपण जरा थांबलात तर अधिक बरं होईल!''

दफार्जने जवळच्या चावीने कुलूप काढले व हळूवारपणाने दरवाजा उघडला. मग त्याने बरोबरच्या मंडळींना आत येण्यास खुणावले. लॉरीने आपल्या हाताने ल्यूसीच्या कमरेभोवती विळखा घातला. ती खाली कोसळेल अशी शंका त्याला सारखी येत होती. ''मला त्यांची भीती वाटते,'' ती पुटपुटत होती.

तिला जवळ जवळ उचलूनच लॉरीने आत नेले. आत जाताच पाठोपाठ दफार्जने दरवाजा बंद करून टाकला. खोलीत खूपच अंधार होता. एकुलत्या एका खिडकीला काचा नव्हत्या व थंडी लागू नये म्हणून तीही बंद केली होती. आत काय आहे, काय चालले आहे, हे कळण्यास काहीच मार्ग नव्हता. पण सर्वांचे डोळे तेथील अंधाराला अंमळशाने सरावताच अंधूक अंधूक दिसू लागले. एका बसक्या बाकड्यावर दरवाज्याकडे पाठ करून, एक दुबळा माणूस बसला होता. त्याचे सगळे केस पिकले होते. पाठीला पोक काढून हा माणूस जोडे शिवण्यात गढून गेला होता.

●●●

## ४. 'भूतकाळ विसरून जा'

''नमस्कार, आपण अतिशय कामात आहात की काय?'' दफार्जने विचारले.

हा प्रश्न ऐकताच त्या माणसाने आपली मान वर केली. दीर्घकाळ मुकाटपणे व शून्य नजरेने इकडे तिकडे पाहिल्यानंतर तो म्हणाला, ''होय, मी जरा कामात आहे.''

त्याच्या आवाजातील दुर्बलता भयानक व दयनीय होती. एकांतवास व अबोल राहण्याचा प्रसंग, यांमुळे त्याच्या शरीराप्रमाणेच आवाजालाही क्षीणता आलेली दिसत होती. काही घडलेच नाही अशा रितीने त्याने पुन्हा कामाला सुरुवात केली. काही वेळाने त्याने अहेतुकपणे आपली मान वर केली आणि भेटायला आलेले लोक अजूनही येथेच आहेत, हे त्याच्या लक्षात आले.

''आणखी थोडा प्रकाश आत येऊदे का? आपल्याला तो सहन होईल का?'' दफार्जने विचारले.

''मला तो सहन केलाच पाहिजे!'' चर्मकार अगतिकपणे उत्तरला आणि आपल्याला हा प्रश्न कोणी केला, हे पाहाण्यासाठी तो इकडे तिकडे पाहू लागला.

दफार्जने खिडकीचे झडप किंचित् किलकिले केले. थोडासा अधिक प्रकाश आत येताच असे दिसले, की तो चर्मकार एक अपुरा जोडा मांडीवर घेऊन, तो पुरा करण्याच्या नादात गुंगला आहे. चर्मकाराच्या व्यवसायाला आवश्यक असणारी साधनसामग्री त्याच्या आजूबाजूला पसरली होती. त्याची दाढी पांढरी शुभ्र असून गालफडे बसलेली होती. पण त्याच्या डोळ्यांत मात्र विलक्षण चमक दिसत होती. त्याच्या फाटक्या-तुटक्या कपड्यांवर व रोडावलेल्या अंगावर पिवळसर छटा आली होती.

दफार्ज त्याला अनेक प्रश्न विचारी, पण तो चर्मकार मात्र विसराळू मुद्रा करून मुकाट्याने बसून राही. त्याचे नाव विचारताच तो म्हणे, ''एकशे पाच, उत्तर मनोरा!''

''आपण व्यवसायाने चर्मकार नाही का?'' लॉरीने विचारले.

''नाही! नाही! '' तो माणूस म्हणाला.

''मग आपण हे काय चालवलं आहे?''

''मी इथं आल्यानंतर शिकलो ही विद्या. आता मी बऱ्यापैकी जोडे शिवू शकतो.'' एवढे कसे-बसे बोलून त्या माणसाने पुन्हा आपल्या कामास सुरुवात केली.

लॉरीने दफार्जचा हात आपल्या हाती घेत म्हटले, ''डॉक्टर मॅनेट, आपण मला विसरलात का? याच्याकडे पाहा, मजकडे पाहा आणि तो जुना काळ स्मरणात आणा. आपला पेढीवाला आपल्या स्मरणात येतो का पाहा!''

त्याचे हे भाषण ऐकताच त्याच्या हातून जोडा गळून पडला. मोठ्या संभ्रमात पडल्याप्रमाणे तो त्याच्याकडे पाहू लागला. त्या माणसाच्या मुद्रेवर बुद्धिमत्तेचे पूर्वीचे तेज क्षणमात्र चमकून गेले. दफार्जने हळूवार स्वरात विचारले, ''साहेब, आपण यांना ओळखलंत का?''

एव्हाना ल्यूसी मॅनेट त्या बाकड्यापाशी येऊन दाखल झाली होती आणि मुकाट्याने आपल्या पित्याकडे पाहात उभी होती. त्या माणसाने आपल्या हत्यारांची अदला-बदल करण्यासाठी काही हालचाल केली आणि शेजारी उभ्या असलेल्या ल्यूसीकडे त्याचे लक्ष गेले. त्याने दचकून आपली मान वर केली. भयभीत मुद्रेने तो दीर्घकाळ ल्यूसीच्या चेहऱ्याकडे पाहात राहिला; मग तो पुटपुटला, ''हे काय आहे?''

ल्यूसीच्या गालांवरून अश्रूंचे ओघळ वाहू लागले. आपले हात तोंडावर ठेवून तिने आपला हुंदका आवरला.

''तू तुरुंगाधिकाऱ्याची मुलगी का?'' त्याने विचारले.

''नाही!''

''मग तू कोण आहेस?''

ल्यूसी आपल्या पित्याच्या शेजारी बसली. काही बोलायला तिचे मन घेईना. ल्यूसीला पाहून तो किंचित दूर सरला; पण तिने त्याच्या हातातील काम दूर सारले व त्याचा हात आपल्या हाती घेतला. तिच्याकडे टक लावून पाहात त्याने तिच्या सोनेरी केसांना स्पर्श केला. नंतर एक दीर्घ उसासा टाकून त्याने आपल्या कामाला सुरुवात केली. त्याच्या मुद्रेवर गोंधळाची, संशयाची दाट छटा आता पसरली होती. त्याने काम दूर सारले व ल्यूसीच्या केसांना पुन्हा स्पर्श केला. ''तेच हे केस. पण हे कसं शक्य आहे?'' तो पुटपुटला, ''मला बाहेर नेलं त्या रात्री तिने आपलं

मस्तक माझ्या खांद्यावर टेकलं होतं. तिच्या अंत:करणात भीती ओतप्रोत भरली होती. मी यापुढे तिच्या नजरेस पडेन की नाही, याची दाट शंका तिच्या मनात वावरत होती.'' तो स्वत:शीच म्हणत होता. हे बोलत असताना त्याला महत्प्रयास पडत होते, असह्य यातना होत असल्याचे स्पष्ट दिसत होते; पण त्याच्या शब्दोच्चारात मात्र काही अंशी स्पष्टता येऊ लागली होती.

''तुम्हीच काय ते?'' ल्यूसीने हळूच विचारले.

''ओऽहो! कुणाचा हा आवाज?'' तो उद्गारला आणि मग एकाएकी त्रागा करून आपले केस तटतटा तोडू लागला. जराशाने थोडाफार शांत होऊन तो म्हणाला, ''नाही नाही! तू अगदीच लहान दिसतेस, नुकतीच उमलू लागलेली कळी आहेस तू! मी उत्तर मनोऱ्यातील कोठडीत जाण्यापूर्वी ती तरुण होती. आता त्या गोष्टीला अठरा वर्ष होऊन गेली!'' त्याच्या आवाजात आलेली मृदुता पाहून त्याच्या कन्येला -ल्यूसीला -धीर आला. पित्याचा हात आपल्या हाती घेऊन ती सौम्यपणाने म्हणाली, ''बाबा, भूतकाळ आता विसरून जा! भविष्यकाळात तुम्हाला सुख व शांतता लाभावी, म्हणून ही तुमची कन्या अविश्रांत परिश्रम करायला सज्ज आहे.'' लहान मुलाची समजूत काढावी त्याप्रमाणे ती बोलत होती. तिच्या ह्या बोलण्याने तिचा पिता अश्रू ढाळू लागला. हा देखावा इतका कारुण्यपूर्ण होता, की इतरांच्या डोळ्यांतूनही अश्रू वाहू लागले.

तो जरा शांत झाल्यानंतर ल्यूसी म्हणाली, ''आपण एखादी गाडी काढून कॅलेला जाऊ नि तिथून लंडनला रवाना होऊ!''

''पण हा प्रवास डॉक्टर मॅनेटना झेपेल ना?'' लॉरीने विचारले.

''त्यांच्या तिरस्काराला पात्र झालेल्या ह्या शहरात राहाण्यापेक्षा हा प्रवास पतकरणं त्यांना अधिक मानवेल!'' दफार्ज म्हणाला. ''दुसरं म्हणजे, डॉक्टर मॅनेटना फ्रान्सबाहेरच अधिक सुरक्षितता लाभेल.''

नंतर ल्यूसी मॅनेट आपल्या पित्यापाशी राहिली आणि दफार्ज व लॉरी त्यांच्या पुढील प्रवासाची आखणी करण्यासाठी बाहेर पडले.

सर्व सिद्धता होताच डॉक्टर मॅनेटना बाहेर काढले. पुढे काय होणार, ह्या विचाराने त्यांच्या मुद्रेवर आश्चर्य ओसंडत होते. ल्यूसीच्या बोलण्याचे विशेष आकर्षण त्यांना वाटत असावे, असे दिसत होते. तिचा शब्द कानी येताच ते तिच्याकडे मोठ्या अगत्याने वळून पाहात.

डॉक्टर मॅनेटना गाडीत बसविले. पाठोपाठ ल्यूसीही आत जाऊन त्यांच्या शेजारी बसली.; पण एवढ्यात त्यांना आपल्या चर्मविद्येच्या साधनांची आठवण झाली. मादाम दफार्जने व लॉरीने तत्काळ ते साहित्य गाडीत भरले आणि मग त्यांच्या प्रवासाला सुरुवात झाली.

मादाम दफार्ज हे सारे पाहात दारात उभी होती. तिचे विणकाम जोरात चालू होते. ती सर्व बारकाईने पाहात होती, पण काहीच पाहात नसल्याचे भासवीत होती. शेवटी दफार्ज स्वत: गाडीवर चढला. गाडी नगर-वेशीच्या दिशेने दौडू लागली. हातात कंदील घेतलेले लष्करी शिपाई अधून-मधून गाडी अडवत होते. दफार्ज त्यांच्याशी काही बोले, मग काही कुजबूज चाले व गाडी पुढे चालू लागे.

सारी रात्र गाडीचा प्रवास चालू होता. लॉरी डॉक्टर मॅनेट यांच्या समोरच बसला होता. तो जुनाच प्रश्न पुन्हा पुन्हा त्याच्या मनात उद्भवे. ''तुम्हाला पुन्हा जीवनात येण्याची इच्छा आहे का?'' आणि त्याला तेच जुने उत्तर मिळे, ''मला सांगता येत नाही!''

●●●

## खंड दुसरा
### ५. खटल्याला विलक्षण कलाटणी

१७८०मधील ओल्ड-बेली या जागेचे स्वरूप कसे भीषण आणि मन विषण्ण करणारे होते! या ठिकाणी घडणाऱ्या अमानुष घटनांचा ठसा जन-मनावर खोलवर उमटला असल्याने, ही जागा क्रूर आहे, अशी सर्रास भावना होती. या न्यायालयात क्षुल्लक अपराधासाठीसुद्धा अंगावर शहारे आणणाऱ्या भयानक शिक्षा देत असत. या ठिकाणी चौकशीसाठी आणलेल्या कैद्यांना प्रथम अशा भयानक व घाणेरड्या जागी कच्च्या कैद्यांत ठेवत असत, की त्यांना अनेक व्याधी-व्यथा जडत व अशा कैद्यांच्या संसर्गात आल्याने खुद्द न्यायाधीशांनाही संसर्गजन्य रोगांची बाधा होऊन मृत्यूमुखी पडण्याची पाळी येई.

गेल्या अध्यायात वर्णन केलेल्या घटना घडल्यानंतर सुमारे पाच वर्षांनी एका मार्च महिन्यातील सकाळी टेलसन बँकेचे प्रतिनिधी जर्व्हिस लॉरी, त्यांना तो निरोप आणणारा दूत जेरी, डॉक्टर मॅनेट व त्यांची कन्या ल्यूसी अशी सर्व मंडळी राष्ट्रद्रोहाच्या एका खटल्यात साक्ष देण्यासाठी म्हणून ओल्ड-बेली या न्यायालयात जमली होती. आरोपी कैदी पंचवीस वर्षांचा एक तरुण असून त्याचे नाव चार्ल्स डार्ने असे होते. तो भला उंच व देखणा होता. त्याने करड्या रंगाचा ऐटबाज पोषाख परिधान केला होता. त्याचे काळेभोर लांब केस तत्कालीन पद्धतीप्रमाणे फितीने मागे बांधले होते.

न्यायालयात उपस्थित असलेल्या प्रत्येकाला अशी खात्री वाटत होती, की या माणसाला अत्यंत कठोर शासन होणार. अत्यंत क्रूर पद्धतीने त्याचा वध केला जाईल, अशीच बहुतेकांची भावना होती. पण कैदी मात्र अगदी निर्विकार मुद्रेने व खंबीर मनाने सर्व गोष्टींचे निरीक्षण करीत उभा होता. डॉ.मॅनेट व त्यांची कन्या ल्यूसी या उभयतांकडे लक्ष जाताच मात्र त्याच्या मुद्रेत किंचित् फरक पडलेला दिसला.

डॉ.मॅनेट आता जुन्या काळचे, बावळ्या मुद्रेचे पॅरीसमधील चर्मकार राहिले नव्हते. आपल्या कन्येचा हात धरून ते रुबाबात बसले होते. न्यायालयातील एकूण देखावा पाहून ल्यूसी घाबरून गेली होती. त्या तरुण कैद्याबद्दल तिला वाटणारी दया, तिच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होती. तिची ही एकूण अवस्था पाहून प्रत्येकाला तिच्याबद्दल सहानुभूती वाटू लागली. तिला व तिच्या पित्याला कैद्याविरुद्ध साक्ष देण्यासाठी आणले आहे, हे ऐकून तर लोकांना तिची अधिकच दया आली.

सरकारी वकील उठून उभा राहिला आणि न्यायाधीशाला व पंचांना उद्देशून म्हणाला, ''हा कैदी दिसायला तरुण, उमदा आणि निरपराध दिसला, तरी त्याने राष्ट्रद्रोही कृत्यं करण्यात काही वर्षं घालवली आहेत! फ्रान्स व इंग्लंडमध्ये वारंवार प्रवास करून इंग्लिश आरमार व सैन्य यांची बित्तंबातमी त्याने फ्रेंच राजाला देऊन, इंग्लंडविरुद्ध युद्ध करायला फ्रेंच राजाला मदत केली आहे आणि हे सिद्ध करायला मी काही साक्षीदार हजर करीत आहे!''

यानंतर बस्टार्ड आणि क्ले अशा दोन सरकारी साक्षीदारांची नावे पुकारण्यात आली आणि दोन रुबाबदार तरुण पुढे आले. या दोघांनीही असे अवसान आणले होते, की जणू काही देशप्रेमाने भारावून देशद्रोह्यांची बिंगे चवाट्यावर आणण्यासाठी ते शपथबद्ध झाले होते! त्यांचे जबाब झाल्यानंतर आरोपीच्या वकिलाने त्यांचा उलट तपास घेतला आणि मग या ढोंगी देशभक्तांचे खरे स्वरूप प्रकट झाले.

''आपण इथे उभ्या असलेल्या कैद्याकडून कधी उसनवार पैसे घेतले होते का?''

''होय!''

''आपण ते पैसे कधी परत केलेत काय?''

''नाही!''

''कर्जबुडवे म्हणून आपण कधी तुरुंगाची हवा खाल्ली आहे का?''

''होय!''

लोकांना कळेना, की ही प्रश्नोत्तरे कशाकरता चालली आहेत?''

''आपण यापायी किती वेळा तुरुंग पहिला आहे? दोनदा की तीनदा?''

''दोन-तीन वेळा!''

''पाच-सहा वेळा नाही ना?''

''तसं नक्की स्मरत नाही. असेलही कदाचित्!''

आणि मग आरोपीच्या वकिलाने त्यांना असे काही पेचात आणले, की त्या उभयतांनाही आपण कोणाकडून तरी पैसे घेऊन चहाडखोरीचा व खोटे आरोप लादण्याचा धंदा करतो, हे मान्य करावे लागले. यानंतर सरकारी वकिलाने जर्व्हिस लॉरीचे नाव पुकारले.

लॉरीने आपल्या जबाबात सांगितले, ''१७७५ च्या नोव्हेंबर महिन्यातील एका शुक्रवारी मी टपालगाडीने लंडन ते डोव्हर असा प्रवास केला होता. त्यावेळी माझ्याबरोबर आणखी दोन प्रवासी होते पण थंडीमुळे त्यांनी आपलं सर्वांग कपड्यांनी आच्छादून घेतलं होतं.''

सरकारी वकिलाने विचारले, ''लॉरी, आपण आरोपीकडे नीट पाहा व विचार करून सांगा, की त्या दोघांपैकी एक हा आरोपी होता का?''

''मला तसं सांगता येणार नाही. ते प्रवासी अगदीच भित्रे होते, पण आरोपी तर चांगलाच धीट व खंबीर दिसत आहे.''

''समजा, या आरोपीला नखशिखान्त कपडे घातले, तर तो आपण पाहिलेल्या प्रवाशासारखा दिसेल का?''

''मला तसं वाटत नाही.''

''हे पहा लॉरी, तुम्ही शपथेवर असं सांगू शकता का?''

''हो!''

''यापूर्वी तुम्ही आरोपीला कधी पाहिलं आहे का?''

''हो!''

''केव्हा?''

''काही दिवसांनंतर मी फ्रान्सहून परत यायला निघालो, त्यावेळी परतीच्या प्रवासात याला मी जहाजावर पाहिलं आहे.'' परंतु आरोपीशी आपले काय संभाषण झाले, याबाबत लॉरीला काहीच सांगता आले नाही. समुद्र खवळला असल्याने आपण स्वस्थ पडून होतो व कोणाशीच संभाषण करायच्या मन:स्थितीत नव्हतो, असे सांगून त्याने आपली सुटका करून घेतली. तरीही सरकारी वकिलाने चिकाटी धरून विचारले, ''या प्रवासात आपल्याबरोबर आणखी कोणी गृहस्थ नि त्यांची मुलगी होती का?''

''हो!''

''ती उभयता या कोर्टात हजर आहेत का?''

''आहेत''

यानंतर ल्यूसी मॅनेटचे नाव पुकारण्यात आले. ती पुढे येताच कोर्टाने तिला कैद्याचे निरीक्षण करायला सांगितले. ल्यूसी उभी होती. तिच्या शेजारी तिला धीर देण्यासाठी तिचे वडीलही उभे होते. या सौंदर्यशाली तरुणीला व तिच्या दयामय दृष्टीला तोंड देणे कैद्याला अशक्य झाले. न्यायालयातील इतर लोकांच्या दृष्टीपेक्षा त्याला ही दृष्टी असह्य वाटली. त्याने आपला श्वासोच्छ्‌वास संथ करण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा चेहरा पांढरा फटक पडला.

''मिस् मॅनेट, या आरोपीला तुम्ही पूर्वी कधी पाहिले आहे का?''

''हो!''

''जहाजावर असलेल्या त्या तुम्हीच का?''

''होय, मीच ती!''

''जहाजावर या प्रवाशाचं आणि तुमचं काही बोलणं झालं का?''

''हो.''

''काय बोलणं झालं?''

मोठ्या नाखुशीने व अगदी मंद स्वरात ती बाई बोलू लागली. सर्व न्यायालयात प्रगाढ शांतता पसरली होती. ल्यूसी बोलू लागली, ''या तरुण गृहस्थाने माझ्या वयोवृद्ध व अशक्त वडिलांना मदत केली. प्रवासात त्यांना सुख-स्वास्थ्य लाभावं म्हणून परिश्रम घेतले.''

''जहाजावर ते एकटेच आले होते का?'' न्यायाधीशाने मध्येच प्रश्न केला.

''नाही. त्यांच्याबरोबर आणखी दोन फ्रेंच गृहस्थ होते.''

''त्याचं बोलणं अगदी हळू चाललं होतं, त्यामुळे त्यातलं काहीच मला ऐकू आलं नाही.''

''मिस् मॅनेट, आरोपीशी तुमचं जे बोलणं झालं, ते मला हवं आहे.''

''कैदी इतक्या चांगुलपणाने नि मोकळ्या मनाने आमच्याशी वागला होता, की यापुढे काही बोलून त्याला संकटात आणायची मला मुळीच इच्छा नाही!'' असे म्हणून ल्यूसी एकदम रडू लागली.

''मिस् मॅनेट, तुम्ही काय पुरावा देत आहात, हे कैद्याला न समजलं तर चालेल का? खुशीने वा नाखुशीने, पण खरा पुरावा सादर करणं तुमचं कर्तव्य आहे!''

''कैदी म्हणत होता, की आपण एका महत्वाच्या कामात गुंतलो असून, त्यामुळे अनेक लोक संकटात पडायची शक्यता आहे. आपण टोपण नावाखाली वावरत असून इंग्लंड व फ्रान्स यांच्या दरम्यान आपल्याला सारखी ये-जा करावी लागते.''

यानंतर सरकारी वकिलाने डॉ.मॅनेट यांचे नाव पुकारले.

''डॉक्टर मॅनेट, या कैद्याला आपण पूर्वी कधी पाहिले आहे काय?''

''होय, तीन-साडेतीन वर्षांपूर्वी तो एकदा आमच्या घरी आला होता.''

''जहाजावर तो कुणाशी काय काय बोलला, हे आपण सांगू शकाल का?'' पण डॉक्टर मॅनेटना त्याबद्दल काही सांगता आले नाही. कारण त्यावेळी ते ज्या विशिष्ट मनोवृत्तीत होते, तीमुळे त्यांना काही स्मरणात ठेवणे शक्यच नव्हते! त्यांच्या तत्कालीन अवस्थेचे वर्णन ऐकून लोकांना उलट त्यांची दयाच आली.

''आपल्याला कोणत्याच गोष्टीचं कसं स्मरण नाही?'' सरकारी वकिलाने विचारले.

''सतत अठरा वर्षं अंधार-कोठडीत काढून मी नुकताच बाहेर आलो होतो.''

या साक्षी पुराव्यांतून विशेष काही निर्माण होण्याची शक्यता न दिसल्याने, सरकारी वकिलाने शेवटचा खास बाण म्हणून एक नवा साक्षीदार पुढे आणला. त्याने मात्र अगदी पढवलेल्या पोपटाप्रमाणे आरोपीविरुद्ध बिनचूक जबाब देण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, ''अनेक लष्करी व आरमारी तळांजवळ वावरताना मी आरोपीला पाहिलं आहे. नंतर एका कॉफीगृहात कोणातरी फ्रेंच माणसाशी त्याचं काहीतरी संगनमत चालू असतानाही मी त्याला पाहिलं आहे!''

आरोपीच्या वकिलाने या साक्षीदाराला उलट तपासात खूप छेडण्याचा प्रयत्न केला, पण साक्षीदार असा बनेल होता, की त्याची डाळ शिजण्याचा काहीच रंग दिसेना.

एवढ्यात एक अजब घटना घडली.

आतापर्यंत आढ्याकडे पाहात, निर्विकारपणाने खटला ऐकत बसलेल्या एका तरुण माणसाने कागदाच्या कपट्यावर काही मजकूर गडबडीत खरडला व त्या कागदाची गुंडाळी करून ती आरोपीच्या वकिलाच्या अंगावर टाकली. वकिलाने तो कागद उलगडून वाचला आणि मग आरोपी व हा माणूस यांचे मोठ्या औत्सुक्याने सूक्ष्म निरीक्षण केले व नंतर तो साक्षीदाराला उद्देशून म्हणाला,

''हे सारे उपद्व्याप करणारा माणूस आरोपीच होता याबद्दल तुमची खात्री आहे?''

''होय!''

''आरोपीसारखाच दिसणारा आणखी कोणी माणूस तर तुम्ही पाहिलात नाही ना?''

''ते शक्य नाही!''

''मग माझ्यामागे बसलेल्या माझ्या विद्वान वकील बंधूकडे एकदा नीट पाहा बरं!'' असे म्हणून आरोपीच्या वकिलाने चिठी टाकणाऱ्या तरुणाकडे अंगुलीनिर्देश केला. ''पाहा बरं या उभयतांत सारखेपणा आहे की नाही तो!''

साक्षीदारासुद्धा तेथे उपस्थित असलेल्या सर्वांच्याच नजरा त्या माणसाकडे वळल्या आणि काय आश्चर्य! कपड्यांतील फरक वजा केल्यास त्या उभयतांमध्ये जुळ्या भावंडांप्रमाणे विलक्षण साम्य आहे, हे प्रत्येकाला कळून चुकले.

''न्यायाधीशमहाराज, माझे मित्र श्री.कार्टन यांनासुद्धा आरोपी म्हणून गोवण्याचा सरकारी वकिलांचा मानस नाही ना?'' स्ट्रेयरने -आरोपीच्या वकिलाने -सरकारी वकिलांकडे कुत्सितपणाने पाहात विचारले. यानंतर त्याने आपल्या भाषणात बरसाड हा चुगलखोर लाचखाऊ असून पैसे मिळविण्यासाठी खोट्या साक्षी देण्यात कसा पटाईत आहे, हे सिद्ध केले. आरोपी फ्रेंच असून त्याच्या घरगुती हितसंबंधांबाबत तो वारंवार इंग्लंड व फ्रान्स यांच्या दरम्यान खेपा करीत असतो, हे त्याने दाखवून दिले. या साऱ्याच खटल्याला विलक्षण कलाटणी देणारा तो तरुण मात्र कोणतीच हालचाल न करता, आढ्याकडे निर्विकारपणाने पाहात बसला होता.

न्यायाधीशाने ज्यूरीला खटला सारांशरूपाने समजावून दिला. हे सर्व घडत असताना सिडने कार्टन आढ्याकडे पाहात निर्विकारपणे बसला होता, तर त्याचा मित्र - आरोपीचा वकील स्ट्रेयर -कागदपत्रांची उलथापालथ करीत बसला होता. अधून-मधून चिंतातूरपणाने ज्यूरीकडे पाहात होता. न्यायाधीशमहाराजही आपल्या जागेवरून उठून येरझारा घालीत होते. सामान्य प्रेक्षक निकाल काय लागणार, याबाबत परस्परांत औत्सुक्यपूर्ण चर्चा करण्यात गढले होते. सिडने कार्टन व चार्ल्स डार्ने यांच्यात दिसणारे विलक्षण साधर्म्य हाही त्यांच्या चर्चेचा विषय होता.

आतापर्यंत निर्विकार दिसणारा कार्टन एका घटनेने मात्र चमकलेला दिसला. आतापर्यंत जो ताण पडला होता, त्यामुळे बधिर झालेल्या ल्यूसीने हतबलपणाने पित्याच्या खांद्यावर मान टाकलेली दिसताच तो ओरडला, ''अरेरे! या तरुणीला सावरून कोणीतरी बाहेर मोकळ्या हवेत न्या. नाहीतर ती बेशुद्ध पडेल!''

तिला बाहेर नेले त्यावेळी प्रत्येकानेच तिच्याबद्दल दया व सहानुभूती व्यक्त केली. काही वेळाने कार्टनने तिच्या प्रकृतीची बारकाईने चौकशी केली व नंतर आरोपीकडे जाऊन तो म्हणाला, ''तुम्हाला त्या साक्षीदार मुलीची विशेष काळजी लागली असेल नाही? मिस् मॅनेटला आता अगदी आराम आहे!''

''माझ्या पायी त्यांना हा त्रास व्हावा, याचं मला अतिशय वाईट वाटतं. माझे मन:पूर्वक धन्यवाद त्यांना कळवा!''

''जरूर! आपली तशी इच्छा असेल, तर हे काम मी जरूर करीन.''

कार्टनचे एकूण वागणे असे बेपर्वाईचे होते, की त्याची गणना कोणीही उद्धटांत सहजच केली असती.

''मी आपला आभारी आहे, आपण एवढं काम जरूर करा!''

''डार्ने, आपली काय अपेक्षा आहे? यापुढे काय घडेलसं आपल्याला वाटतं?''

''जास्तीत जास्त वाईट!''

''जास्तीत जास्त वाईट धरून चालणं शहाणपणाचं असलं, तर मला वाटतं, ज्यूरी तुम्हाला अनुकूल आहे.''

आणि खरोखरीच तसे घडले. दीर्घकालीन चर्चेनंतर ज्यूरीने एकमताने डार्ने निर्दोषी असल्याचा निर्णय दिला. मग एकच कोलाहल माजला. जो तो आपापल्या अकलेप्रमाणे न्यायालयीन निर्णयाची चीर-फाड करू

लागला.

हळूहळू न्यायालयाची ती इमारत संपूर्ण रिकामी झाली. डॉ.मॅनेट, त्यांची कन्या ल्यूसी, वकिल स्ट्रेयर व लॉरी एवढीच काय ती माणसे मागे रेंगाळत होती. मृत्यूच्या तवडीतून सुटका झाली, म्हणून चार्ल्स डार्नेचे अभिनंदन करण्यासाठी ही मंडळी थांबली होती.

पॅरिस येथे चर्मकारांच्या वेशात ज्यांनी डॉ.मॅनेट यांना पाहिले असेल, त्यांना आता, त्यांच्या सध्याच्या वेशात ओळखणेही शक्य झाले नसते. आजचा त्यांचा रुबाबच असा होता, की एकदा त्यांच्याकडे लक्ष गेलेला माणूस पुन्हा त्यांच्याकडे वळून पाहिल्याशिवाय राहात नव्हता. लंडनमध्ये येऊन स्थायिक झाल्यानंतर त्यांच्यात झालेला बदल मोठाच प्रभावी होता.

या माणसाचे बरेचसे आयुष्य अत्यंत हालअपेष्टा, तुरुंगात गेले आहे, एकेकाळी बुद्धिभ्रंश होऊन, हा माणूस चर्मकाराप्रमाणे जोडे शिवीत बसला होता, हे कोणास सांगूनही खरे वाटले नसते.

डार्ने उत्साहाने पुढे आला व त्याने ल्यूसीच्या हाताचे चुंबन घेतले. स्ट्रेयरचे त्याने अंत:करणपूर्वक आभार मानले. स्ट्रेयर मोठा मजबूत आणि रंगाने लालबुंद गृहस्थ होता. रेटारेटी करून एखादी गोष्ट दडपून नेण्यात त्याचा हातखंडा होता. ''डार्ने, तुमच्या नावाला लागलेला डाग पुसून काढण्यात मला यश मिळालं, याचा आनंद वाटतो मला! तुमच्यावरील आरोप निराधार होता, तरी खरा ठरण्याची भीती होती. मी माझ्या प्रयत्नांची शिकस्त केली आणि सुदैवाने यशही मिळालं.''

''मला वाटतं आता आपण सर्वजण मिळूनच घरी जाऊया!'' लॉरीने सुचविले. ''सर्वांनाच मोठा विलक्षण ताण पडला आहे!''

डॉ.मॅनेट यांच्यावर या सर्व प्रकाराचा विशेष ताण पडलेला दिसत होता. डार्नेकडे ते विशेष रागाने, तिरस्काराने व अविश्वासाने पाहात असावेत, असे दिसत होते. त्यांची मुद्राही जरा भीतीग्रस्त दिसत होती. या ठिकाणाहून त्यांना त्वरित् हलवणे श्रेयस्कर दिसल्याने, ल्यूसी त्यांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाली, ''बाबा, आता आपण घरी जाऊया ना?'' एक लांबलचक सुस्कारा टाकून तिचे वडील म्हणाले, ''हं!''

तत्काळ एक घोडागाडी बोलावल्यावर मॅनेट कुटुंब घरी जायला निघाले. स्ट्रेयरही अल्पावधीत तेथून निघून गेला.

या सर्व घटना एका अंधाऱ्या कोपऱ्यात उभी राहून मुकाट्याने पाहात असलेली एक व्यक्ती आता पुढे आली आणि लॉरी व चार्ल्स डार्ने या उभयतांपाशी येऊन दाखल झाली.

●●●

## ६.प्रचंड वादळ

आतापर्यंत या खटल्यात सिडने कार्टनने बजावलेल्या कामगिरीचा उल्लेख कोणीच केला नव्हता. पण तेथे येऊन थडकलेल्या कार्टनमुळे लॉरी बुचकळ्यात पडल्याप्रमाणे झाला आणि त्याला टाळण्यासाठी तेथून सटकण्याचा विचार करू लागला. कार्टनची एकूण वागणूक त्याला जरा जंगलीपणाचीच वाटली. ''डार्ने, परमेश्वर तुम्हाला सुखी ठेवो. तुम्हाला दीर्घकाल सुखसमृद्धी लाभो!'' तेथे येताच कार्टन डार्नेला उद्देशून म्हणाला. त्याच्या तोंडाची मद्याची दुर्गंधी सर्वत्र दरवळली होती. तो अधून मधून हसत होता आणि दारूच्या नशेत

असल्याप्रमाणे वागत होता. ''आज आपण आपल्या एका प्रतिकृतीशी बोलत उभे आहात, हा एक मोठा चमत्कार आहे, नाही?'' डार्नेने पुढे विचारले.

''मी या जगात परत कसा आलो, हेच मला कळत नाही!''

''तुम्ही दुसऱ्या जगात जायच्या मार्गावर होता, पण थोडक्यात बचावलात! तुम्हाला भोवळ का येत आहे?''

''होय, तसं वाटतंय खरं!''

''आता आधी आपण जेवूया, म्हणजे तुम्हाला बरं वाटेल.''

''माझं जेवण झालंय.''

''खोटं! केव्हा होणार? कसं होणार? इथून जवळच एक खाणावळ आहे. चला, आपण तिथे जाऊ!''

जेवण झाल्यामुळे व थोडेसे मद्यप्राशन करायला मिळाल्यामुळे डार्नेला चांगलीच हुशारी वाटू लागली. आपली सर्व शक्ती परत आल्याप्रमाणे त्याला वाटले. त्याच्या समोरच कार्टन बसला होता. त्याने आपल्या पुढ्यात मद्याची बाटली ठेवली होती. त्याचा बेदरकार रानटीपणा त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होता. ''डार्ने, आपण आता या जगात राहिलो, याबद्दल तुम्हाला खात्री वाटते ना?''

''मला तसं वाटतंय, पण मी अजूनही जरा बुचकळ्यात आहे.''

कार्टनने फिरून आपल्या पुढ्यातील मद्याचा ग्लास भरला व म्हटले, ''मी नेहमीच भूतकाळ विसरायचा प्रयत्न करीत असतो. त्याचं स्मरण ठेवण्यात काहीच हशील असत नाही.'' नंतर किंचित हसून तो म्हणाला, ''आपण दिसायला आवळे-जावळे असलो तरी आपली मने मात्र अगदीच वेगळी आहेत!'' कार्टनच्या या बडबडीमुळे डार्ने बुचकळ्यात पडल्याप्रमाणे झाला. त्याने काहीच उत्तर दिले नाही. पण कार्टनच पुन्हा म्हणाला, ''आता कुणाचं तरी अभीष्टचिंतन करून आपण मद्याचा एकेक प्याला घेऊया. तुम्हाला कुणाचं नाव स्मरतं का?''

''ल्यूसी मॅनेट!''

''फार उत्तम. मिस मॅनेटचं आपण अभीष्ट चिंतू! या मुलीने तुमच्यासाठी अश्रू ढाळले होते. या मुलीची सहानुभूती मिळाल्यावर कोणत्याही खटल्याला तोंड द्यायला हरकत नाही, डार्ने!'' डार्नेने यावर काहीच उत्तर दिले नाही.

''तुझ्याबद्दलची वार्ता मी तिला दिली, तेव्हा ती मोठ्या खुशीत आली.'' कार्टनचा सहवास डार्नेला आता नकोसा वाटू लागला, असह्य होऊ लागला. पण त्या दिवसाच्या एका महत्वाच्या क्षणी त्याने त्याच्यावर अनंत उपकार केले असल्याने, डार्नेला आपली अप्रीती दाखविणे जरा कठीणच होते. तरी पण सुटका करून घ्यायच्या उद्देशाने तो म्हणाला, ''मी आपला आभारी आहे!''

''मला आभारांची मुळीच गरज नाही आणि मी त्याला पात्रही नाही. मी काय केलं, कशासाठी केलं, हे माझं मलाच माहीत नाही. डार्ने, मी तुला एकच प्रश्न विचारतो. तू मला खरोखर आवडतोस, अशी तुझी कल्पना आहे का रे?''

''कार्टन!'' डार्ने उत्तरला, ''तुम्ही जे वागलात, त्यावरून तशी कल्पना करून घ्यायला मला तर हरकत दिसत नाही! पण खरं पाहाता, मी तुम्हाला आवडत नाही, असं म्हणायलाही जागा आहे.''

''बरोबर आहे. तुमचा हा समजूतदारपणा पाहून मात्र माझं मत चांगलं झालं आहे.''

''काहीही असो!'' टेबलावरील घंटी वाजवीत डार्ने म्हणाला. ''मला वाटतं आपल्या उभयतांच्या खाण्या-पिण्याचे पैसे मीच द्यावेत नि आपण एकमेकांची रजा घ्यावी!''

कार्टनने तत्काळ संमती दिली व नव्याने मद्याचा प्याला भरून तो म्हणाला,''डार्ने, मी झिंगलेला दिसतो का हो?'' ''कार्टन, तू सारखा मद्यप्राशन करीत आहेस.

एवढंच मला दिसतंय!'' ''डार्ने, मी मद्यपी का झालो माहीत आहे? निराश झालेला मनुष्य मद्याचा गुलाम बनतो! या पृथ्वीवरील कोणाही माणसाची मला पर्वा नाही! आणि माझी पर्वाही कोणी करीत नाही. ही गोष्ट खेदजनक आहे! मला कळतंय्.''

''कार्टन, तुझ्या गुणांचा सदुपयोग तुला करता आला असता!''

''शक्य आहे आणि नाहीही! बराय् नमस्कार, डार्ने!'' असे म्हणून कार्टनने एकदम डार्नेला निरोप दिल्यासारखे केले व डार्नेही तत्काळ तेथून निघून गेला.

मागे एकट्याच राहिलेल्या कार्टनने स्वत:चा चेहरा एकदा समोरच्या आरशात नीट न्याहाळला. आपल्याप्रमाणेच दिसणाऱ्या डार्नेबद्दल आपल्याला एकाएकी एवढी आस्था का वाटू लागली, याचे कारण तो शोधू लागला. ल्यूसी मॅनेटने त्याच्याबद्दल आस्था दाखविली, त्यामुळेच आपणही त्याच्याबद्दल सहानुभूती बाळगत नाही ना, अशीही एक शंका त्याच्या मनाला चाटून गेली. तसे असल्यास, आपण त्याचा द्वेष करणेच वाजवी आहे. असेही त्याला वाटू लागले. मन:शांतीसाठी त्याने पाठोपाठ मद्याचे कित्येक प्याले रिकामे केले. शेवटी तो तिथेच टेबलावर डोकं टेकून झोपी गेला.

त्या काळी सर्वचजण सर्रास मद्यप्राशन करीत. स्ट्रेयरही त्याला काही अपवाद नव्हता. तो महत्वाकांक्षी होता, धीट होता, उत्तम वक्ता होता, पण एखादा महत्वाचा मुद्दा पटकन् हाताळून, वेळ कशी मारून न्यावी, याचे ज्ञान त्याला, कार्टनशी त्याचा स्नेह जमेपर्यंत नव्हते. मुद्दे मांडत असताना, नेमक्या महत्वाच्या मुद्द्यावर बोट कसे ठेवावे, ही कला तो कार्टनपासून शिकला होता.

कार्टनने झोपी जाताना मद्यप्राशन गृहाच्या नोकराला बरोबर दहा वाजताच उठवण्याबद्दल बजावले आणि त्याने महत्प्रयासाने ती कामगिरी पारही पाडली. उठताच कार्टन सरळ स्ट्रेयरच्या निवासस्थानाकडे गेला आणि त्याने त्याच्या खोलीचे दार ठोठावले.

''सिडने, तुला यायला खूपच उशीर झाला!'' स्ट्रेयर दार उघडून कार्टनला आत घेता घेता म्हणाला.

''आपला हा नेहमीचाच खाक्या आहे. झाला असेल अर्धा-पाऊण तास उशीर!''

स्ट्रेयरची खोली म्हणजे एक अजबखानाच होता. खोलीत अनेक पुस्तके व कागद इतस्तत: पसरले होते. तेथे एक शेगडीही धगधगत होती आणि एका टेबलावर मद्याच्या अनेक बाटल्या ठेवलेल्या दिसत होत्या.

''सिडने, तुझ्या आणि डार्नेच्या चेहऱ्यामधील हुबेहूबपणाचा एक अजब मुद्दाच आजच्या खटल्यात उपस्थित झाला, नाही का? पण हा हुबेहूबपणा तुझ्या लक्षात केव्हा आणि कसा आला?''

''मला वाटलं, आरोपी डार्ने एक मोठा देखणा तरुण आहे आणि मीसुद्धा तसा आहेच!''

स्ट्रेयर हसला आणि म्हणाला, ''चला, आपण पुढल्या उद्योगाला लागूया.'' रागारागाने कार्टनने आपला कोट सैल केला. थंड पाण्याचे घंगाळ आणले. एक-दोन टुवाल आणून, ते थंड पाण्याने भिजवून व पिळून डोक्याला लपेटले व नंतर आपल्या कामाच्या टेबलापाशी बसून तो म्हणाला,

''चला, मी तयार आहे!''

''आता आपल्यापुढे फक्त दोनच खटले आहेत!''

''मग त्यातला खरा गुंतागुंतीचा खटला आधी माझ्याकडे दे.''

मग जवळ जवळ सकाळपर्यंत कार्टन पुस्तके चाळीत व कागदपत्रांची उलथा-पालथ करीत बसला होता. अधून-मधून गार पाण्याने डोके थंड करीत होता.

''सिडने, सरकारी साक्षीदाराची भंबेरी उडवायला तू फारच चांगले मुद्दे तयार केले आहेस.'' स्ट्रेयर त्याच्याकडे कौतुकाने पाहात म्हणाला.

''माझी बाजू मी नेहमीच भक्कम तयार करीत असतो!''

''ही गोष्ट तर मी नेहमीच मान्य करीत आलो आहे!'' स्ट्रेयर म्हणाला.

''पण तू नेहमीच असा चिडल्यासारखा का असतोस? तुझा लहानपणचा शाळेतील स्वभाव अजूनही जात नाही ना? घटकेत आनंदी, तर घटकेत दु:खी!''

''मला त्यातच आनंद आहे स्ट्रेयर! मी इतरांचे धडे त्यावेळी तयार करून देई व माझे स्वत:चे तसेच राहात असत.''

'' हे असं का बरं?''

''देह स्वभाव!''

''कार्टन!'' स्ट्रेयर बोलू लागला, ''तुझ्या जीवनात काही उद्दिष्ट नाही, उत्साह नाही, हे काही ठीक नाही. जरा माझ्याकडे पाहा!''

''खरं आहे. तू नेहमीच पुढे असतोस आणि मी मागे राहातो. पॅरीस शहरी आपण फ्रेंच कायद्याचा अभ्यास करायला राहात असताना तू काही ना काही साध्य करीत होतास आणि मी मात्र उगीचच कुठे तरी भरकटत होतो!''

''मग हा कुणाचा अपराध?''

''तुझा मुळीच नाही. तू नेहमीच मला पुढे ढकलायचा प्रयत्न करीत आला आहेस. माझ्यावर अनेक वेळा दडपणही आणलं आहेस. पण जाऊदे, त्या दु:खद भूतकाळाचा विचार करण्यात काहीच अर्थ नाही. नवा दिवस उगवत असताना जुना दु:खद भूतकाळ स्मरून करायचंय् काय?''

''ठीक आहे. आता त्या सुंदर साक्षीदाराची आठवण म्हणून थोडं मद्य घे!''

''सुंदर साक्षीदार!'' कार्टन पुटपुटला. ''माझ्या डोळ्यांपुढे तर अनेक साक्षीदार आहेत!'' तू कोणता म्हणतोस?''

''डॉक्टर मॅनेटची मुलगी, ल्यूसी मॅनेट! ती सोनेरी केसांची सुंदर बाहुली!''

''एखाद्या नाजूक बाहुलीसारखी ती खरंच सुंदर होती.''

''पण त्या मुलीला भोवळ आली हे सगळ्यांच्या आधी तुझ्याच लक्षात आलं, नाही का?'' खवचटपणाने स्ट्रेयर म्हणाला.

''आपल्या नाकासमोर जर कुणी बेशुद्ध पडत असेल, तर त्याच्याकडे कुणाचंही लक्ष जाणारच! मद्यपी असलो, तरी तिच्या सौंदर्याने अवास्तव दिपणारा खास नाही. ठीक आहे. मला जरा झोपू दे आता.''

रात्रीचे काम संपवून व एक झोप काढून कार्टन परत आपल्या घरी जायला निघाला, तेव्हा सूर्य नुकताच उगवला होता. सर्वत्र कोवळा तांबूस प्रकाश पसरला होता, पण त्याला तो दिवस जरा उदासवाणाच भासत होता. एवढा बुद्धिमान, एवढा सद्बुद्धीचा हा माणूस, आपल्या गुणांचा योग्य उपयोग करून घ्यायला असमर्थ असावा, हे एक आश्चर्य होते. कार्टनला आपल्या उणिवेची जाणीव झाल्यामुळेच उदास वाटत असावे.

■ ■ ■

डॉक्टर मॅनेट यांचे घर एका निवांत रस्त्यावर एका टोकाला होते. देशद्रोहाचा तो खटला संपल्यानंतर सुमारे चार महिन्यांनी एका रविवारी सकाळी लॉरी त्यांच्या घराकडे आला. लॉरीने रविवारी त्यांना भेटायचा प्रघात अलीकडे चालू केला होता. डॉक्टर मॅनेटनी आपला पूर्वीचा वैद्यकीय व्यवसाय चालू केला असल्याने स्वत:च्या व कन्येच्या सुख-स्वास्थ्याला आवश्यक एवढी कमाई त्यांना सहज होऊ लागली होती. लॉरीने दारावरील घंटी वाजवताच दार उघडले, पण डॉ.मॅनेट व ल्यूसी उभयतांही घरी नसल्याची वर्दी त्याला दारातच मिळाली. ''मी परका थोडाच आहे?'' असे म्हणून तो सरळ आत गेला व थेट माडीवर जाऊन दाखल झाला. दालना-दालनांतून जाताना ल्यूसीची आवड किती साधी व नीटनेटकी आहे, हे त्याच्या चांगले प्रत्ययाला येत होते. एके ठिकाणी एका कोपऱ्यात, डॉक्टरांच्या पूर्वायुष्यातील स्मृती म्हणून

की काय, ते बसके बाकडे व चर्मविद्येला लागणारी अन्य हत्यारे मांडून ठेवलेली दिसत होती.

''आश्चर्य आहे! आपल्या दुर्दैवी पूर्वायुष्याची ही करुण स्मृती या लोकांनी काय म्हणून जतन करून ठेवली आहे?'' लॉरी जरा मोठ्यानेच म्हणाला.

''त्यात आश्चर्य करण्याजोगं काय आहे?'' लॉरीच्या मागून तीव्र स्वरात कोणीतरी प्रश्न विचारला.

हा प्रश्न लॉरीला डोव्हर मुक्कामी भेटलेल्या त्या लालबुंद जाडजूड बाईने -म्हणजेच मिस प्रास हिने विचारला होता. नंतर ती म्हणाली, ''काय, आपलं कसं काय चाललं आहे?'' लॉरीबद्दल आपल्या मनात कोणताही आकस वा किंतू नाही, हेच जणू काही तिला प्रकट करायचे होते.

''छान चाललं आहे, पण आपलं कसं काय?''

''माझं काय? ल्यूसीकडे पाहिलं, की झालं माझं काम! माझा सारा वेळ तिच्यावर देखरेख करण्यापायीच जातो!''

''देखरेख? आणि ती काय म्हणून?''

''अहो रोज दहा-वीस काय, पाच-पन्नास लोक इथे हेलपाटे घालतात. प्रत्येकाला ती हवी आहे, पण आपण तिच्या लायकीचे आहोत की नाही, हे पाहायची मात्र कुणाचीच तयारी नाही!''

''काय, पाच-पन्नास?''

''शेकडो म्हटलंत तरी चालेल!''

''अरे बाप रे!''

प्रासबाई, अत्यंत नि:स्वार्थीपणाने मॅनेट कुटुंबाच्या सेवेत आहे, हे लॉरीला माहीत होते. तिच्या भावाने तिचा पैसा-अडका सर्व लुबाडला होता. अक्षरश: कफल्लक बनून तिला आपल्या उदर-निर्वाहाची नवी घडी बसवावी लागली होती. पण इतके होऊनही तिने भावाबद्दल कधी अनादराचे उद्गार काढले नव्हते अगर त्याला मदत करायला नकार दिला नव्हता. ल्यूसी दहा वर्षांची असल्यापासून तिचा प्रतिपाळ करायचे काम मिस् प्रासच करीत होती. आणि ज्या पद्धतीने तिने ही कामगिरी बजावली होती, ती पाहिल्यानंतर तिच्याबद्दलचा लॉरीचा आदरभाव दुणावलाच होता.

''डॉक्टर मॅनेट आपल्या चर्मव्यवसायाबद्दल कधी काही बोलतात का?''

''नाही!''

''आणि असं असताना हे बाकडं आणि जोडे शिवायचं हे साहित्य त्यांच्या सहवासात का ठेवता?''

''ते प्रत्यक्षात काही बोलत नसले, तरी त्यांच्या मनात याबाबत विचार येत नसतीलच, असं कुणी सांगावं?''

''त्यांना आपल्या कैदेबद्दल व आपल्या शत्रूबद्दल काही कल्पना असेल, असं तुम्हाला वाटतं काय? मी आपला केवळ उत्सुकता म्हणून हे प्रश्न विचारीत आहे, असं नाही. त्यांना त्या दृष्टीने काही मदत करता आली तर पाहावी, हाही एक उद्देश आहे.''

लॉरीच्या भाषणांतील स्नेहार्द्रता पाहून मिस प्रासला चांगला धीर आला. ती म्हणाली, ''या सर्व विषयांबद्दल त्यांच्या मनात भीती असावी. ल्यूसीचं मत असं आहे, की त्यांना त्यांच्या शत्रूचं नाव माहीत असावं पण ते प्रकट करायच्या बाबतीत त्यांना काही दहशत वाटत असावी. भीतीमुळेच काही गोष्टी ते बोलत नसावेत!''

''भीतीमुळेच त्यांना स्मृतिभ्रंशाचा झटका आला असावा आणि पुन्हा तसा प्रसंग येऊ नये, म्हणून ते जपत असावेत! आपले विचार अंत:करणात कोंडून ठेवायचा त्यांचा प्रयत्न या भीतीपोटीच असावा!''

प्रासबाई संमतीदर्शक मान हलवीत म्हणाली, ''या विषयाला कुणी ओझरता जरी स्पर्श केला, तरीसुद्धा त्यांचं मन बिथरल्यागत होतं. ल्यूसीलाही ही गोष्ट माहीत झाली आहे. म्हणून हा विषय चुकूनसुद्धा कुणी त्यांच्यापुढे काढीत नाही. अनवधानाने कधी तसं झालंच, तर ते लगेच येरझारा घालू लागतात. त्यांचं मन भूतकाळात भटकू लागतं, तोंडावर भीतीची दाट छाया पसरते. आणि ते

दीर्घकाळ अबोल होऊन जातात!''

ज्या कोपऱ्यावर डॉक्टर मॅनेट यांचे घर होते, त्याची व त्या घराची एकूण रचनाच अशी होती, की तेथे क्षुल्लक हालचालीचे प्रतिध्वनी तत्काळ उठत. लॉरी आणि प्रासबाई यांना कोणीतरी येत असल्याप्रमाणे पावलांचे आवाज ऐकू आले.

''ही मंडळी परत आली वाटतं!'' प्रास म्हणाली. ''आता भेटीला येणाऱ्यांची एकच गर्दी चालू होईल!''

पण भोजनाची वेळ झाली, तरी कोणीच भेटायला आले नाही.

त्या दिवशी हवेत विलक्षण उष्मा होता आणि सर्व वातावरण कसे स्तब्ध, कोंडल्याप्रमाणे झाले होते. भोजन आटोपताच ल्यूसी म्हणाली, ''आपण बागेत जाऊन एखाद्या झाडाखाली बसूया, नि तिथेच हवं तर मद्यप्राशन करूया!''

सर्व मंडळी बागेत जाऊन स्थानापन्न होताच त्या ठिकाणी डार्ने येऊन दाखल झाला. डॉक्टर मॅनेटनी व ल्यूसीने त्याचे स्वागत केले. त्यांची तब्येत आज कमालीची खूश दिसत होती; तारुण्याची एक नवीच झलक त्यांच्या मुद्रेवर दिसत होती. ल्यूसी वडिलांच्या शेजारीच बसून त्यांचे संभाषण ऐकत होती. डॉक्टरांनी आज अनेक विषयांवर  गप्पा मारायला सुरुवात केली होती. बोलता बोलता ते जुन्या ऐतिहासिक इमारतींच्या विषयावर येऊन ठेपले. या विषयाची डार्नेला गोडी होती. तो एकदम म्हणाला, ''डॉक्टर, आपण 'लंडनचा मनोरा' या नावाने प्रसिद्ध असलेली इमारत पाहिली आहे का?''

''ल्यूसीने व मी या इमारतीचं ओझरतं दर्शन घेतलं आहे एकदा!'' डार्नेने प्रथम किंचित स्मित केले पण एकदम रागाने लालीलाल होऊन तो म्हणाला, ''या इमारतीची हवा मी एकदा खाल्ली आहे. तिथे कैदेत असताना मला एकदा कळलं, की त्या इमारतीत काही बदल करायचं काम चालू होतं आणि त्यावेळी , विस्मृतीत गेलेलं एक तळघर अधिकाऱ्यांना सापडलं. या तळघरात कैदेत असलेल्या कोणीतरी इसमाने भिंतीवर 'उकरा' अशी अक्षरं कोरून ठेवली होती. त्या अनुरोधाने उकरा-उकरी करून पाहिली. एका दगडाखाली चामड्याची एक पिशवी सापडली. काही अर्धवट जळलेले कागदही मिळाले. पण या वस्तूंचे रहस्य काय आहे, याचा मात्र कोणालाच काही उलगडा झाला नाही!''

''बाबा, बाबा, एकाएकी तुम्हाला काय झालं?'' ल्यूसी वडिलांचा हात धरून घाबऱ्या घाबऱ्या ओरडली. डॉक्टर मॅनेटनी आपले मस्तक दोन्ही हातांनी गच्च दाबून धरले होते. या प्रकाराने सारेचजण भिऊन गेले.

''नाही बाळ, मला तसं काहीच झालेलं नाही! एकाएकी पावसाचे भले मोठे थेंब डोक्यावर पडल्याने मी जरा दचकल्यागत झालो, एवढंच! चला, आपण आता आत जाऊ!'' डॉक्टर मॅनेट कसेबसे म्हणाले व धडपडत आत जाण्यासाठी उठले. डॉक्टरांनी मोठ्या चलाखीने आपल्या मन:स्थितीवर कबजा मिळवला होता. एव्हाना खरोखरीच पावसाचे टपोरे थेंब येऊ लागले होते. डॉक्टरांना आपली मन:स्थिती लपविण्यास त्याचा चांगलाच उपयोग झाला होता. लॉरीने हे सर्व जाणले. डॉक्टरनी डार्नेकडे अशा काही नजरेने पाहिले, की त्यांच्या हकिकतीमुळे आपणास काही विशेष वाटले नाही, असेच त्यांना सुचवायचे होते.

ओल्ड बेली न्यायालयात, ज्या नजरेने त्यांनी डार्नेकडे पाहिले होते, तीच नजर आताही दिसत होती. आकाशात मोठमोठाले काळे ढग लोंबकळत होते. अधूनमधून पावसाचे मोठाले थेंब सरसर करीत येत, पण हवेत मात्र गारवा असा मुळीच नव्हता. मॅनेट कुटुंबातील सर्व मंडळी एका उघड्या खिडकीपाशी आरामात बसली होती. चहाची सिद्धता झाली होती. एवढ्यात लांब-लांब ढांगा टाकीत सिडने कार्टन आत आला. त्याच्याकडे थोडेफार दुर्लक्षच करीत डॉक्टर म्हणाले, ''आता जरी

पाऊस बेताचा दिसला, तरी मला वाटते, थोड्याच वेळात वादळ झाल्याशिवाय राहाणार नाही!''

''वादळ तर नक्कीच होणार! एकूण रंगच तसा दिसत आहे!'' कार्टन म्हणाला. रस्त्यात धावपळ गडबड चालू झाली. वादळापूर्वी आसरा गाठावा म्हणून लोकांची गडबड उडाली होती. त्यांच्या पावलांचे असंख्य प्रतिध्वनी सर्वत्र उमटू लागले.

''बऱ्याच वेळा या आवाजांची मला मोठी गंमत वाटते. पण आज बाहेर पडलेला काळोख आणि वातावरणाला आलेलं गांभीर्य, यांमुळे आजच्या या रात्री माझा थरकाप होतोय.'' ल्यूसी म्हणाली.

''अशा कोणत्या विचाराने तुझा थरकाप होतोय?'' डार्नेने विचारले.

''तुम्हाला कदाचित् खरं वाटणार नाही, पण मला मात्र कधी कधी असं वाटतं, की पावलांचे हे असंख्य प्रतिध्वनी आमच्या जीवनात कधीतरी उमटणार आहेत. त्याच्यात ढवळाढवळ करून टाकणार आहेत! एखादा जमाव आपल्यावर चाल करून येणार आहे.''

''कुणी सांगावं काळाच्या उदरात काय दडलं आहे ते?'' विचारात गढल्याप्रमाणे दिसणारा कार्टन एकदम बोलून गेला. एव्हाना बाहेर प्रचंड वादळाला सुरुवात झाली होती आणि त्यामुळे कार्टनला बराच वेळ तेथे अडकून पडावे लागले.

''अच्छा कार्टन, नमस्कार! नमस्कार डार्ने!'' लॉरी बाहेर पडण्याच्या तयारीने म्हणाला.

''पुन्हा एखादी अशी वादळी रात्र, आपल्याला एकत्र बसायचा योग आणील काय?'' डार्नेने विचारले.

''आणील की, कुणी सांगावं? एखादं मानवी वादळही आपल्या अंगावर चाल करून यायचा संभव आहे!'' एखाद्या भविष्यवेत्त्याप्रमाणे कार्टन बोलून गेला.

▪ ▪ ▪ ▪

राजदरबारातून सरदारसाहेब नुकतेच बाहेर पडले होते. साठ वर्षांच्या या सरदाराचा पोषाख मोठा झोकदार होता. त्याच्या चेहऱ्यावरील खानदानी घमेंड उतू जात होती. राजदरबारी जरा थंडे स्वागत झाल्याने, स्वारी जरा नाराजीत, रागातच होती. गाडीत चढता चढता त्यांनी सईसाला दरडावून गाडी भरधाव हाकण्याचा हुकूम दिला. या शहरातून बाहेर पडून आपण आपल्या जहागिरीच्या गावी केव्हा जाऊन दाखल होतो, असे त्यांना झाले होते.

मार्गातील मानवी जिवांची काडीमात्र पर्वा न करता, सरदारसाहेबांची गाडी पॅरीस नगरीच्या अरुंद रस्त्यांतून प्रचंड खडखडाट करीत सुसाट चालली होती. आरडाओरड करीत, धावपळ करीत, स्त्रिया आपली मुले रस्त्यातून दूर करण्यासाठी धडपडत होत्या. पण एकाएकी गाडीला जबरदस्त हिसका बसला. अनेक कंठांतून भीतीची किंकाळी उठली. धावणारे घोडे अडखळल्यागत झाले. लगाम एकदम खेचला गेल्याने कडमडले.

वस्तुत: जखमी मुला-बाळांची, लोकांची पर्वा न करता या गाड्या अशाच पुढे दौडत जायच्या, पण आज काय झाले कुणास ठाऊक, गाडी थबकली आणि सरदारसाहेबांनी शांतपणाने काय झाले ते पाहाण्यासाठी बाहेर डोकावले. एक भला दांडगा व उंच माणूस घोड्यांच्या पायाखालून काही बोचके काढून घेण्याच्या प्रयत्नात होता. एखाद्या जखमी, रानटी श्वापदाप्रमाणे ओरडत होता, ''माझं पोर घोड्यांच्या टापांखाली चिरडलंय!'' तो ओरडला. नंतर उठून धावतच गाडीच्या खिडकीपाशी आला आणि भयानकपणे ओरडला, ''ठार झाला! माझा पोरगा ठार झाला!!''

एव्हाना गाडीभोवती असंख्य माणसे गोळा होऊ लागली होती. ती एकटक सरदारसाहेबांकडे पाहात होती. राग, द्वेष, त्यांच्या नजरेतून ओसंडत होता, पण प्रत्यक्ष कृतीने मात्र त्याचे प्रदर्शन त्यांनी केले नाही. कोणी चकार शब्दसुद्धा काढला नाही.

सरदारसाहेबांनी आपल्या थैलीतून एक सुवर्ण नाणे काढले व म्हटले, ''कार्टी सडकेवर कडमडत असतात आणि मग इजा झाली म्हणजे ओरडत बसतात. घोड्यांना काही इजा झाली म्हणजे? चल हे घे!'' असे बडबडत त्यांनी ते सुवर्ण नाणे त्या लांबटांग्याच्या अंगावर भिरकावले.

''ठार झाला! माझा मुलगा ठार झाला!!'' त्याने पुन्हा आक्रोश केला.

एवढ्यात गर्दी जरा पांगल्या पांगल्यागत झाली आणि एक माणूस त्या गर्दीतून वाट काढीत पुढे आला.

''धीर धर गस्पार्ड!'' तो त्या लांबटांग्याला म्हणाला, ''अरे, पोर एका क्षणात मेलं, हे उपकार समज सरदारसाहेबांचे! जगलं असतं, तर आज ना उद्या दारिद्र्यात झिजून-पिचून मेलं असतंच ना?''

''तू मोठा शहाणा माणूस दिसतोस!'' गालातल्या गालात हसत सरदारसाहेब म्हणाले, ''तुझं नाव काय?''

''दफार्ज!''

तत्काळ सरदारसाहेबानी आणखी एक सुवर्णमुद्रा काढून दफार्जच्या अंगावर भिरकावीत म्हटले, ''हे घे तुला. चैन कर हवी ती!'' मग सरदारसाहेब आरामाने, गाडीत मागे रेलून बसले व ओरडले, ''हं, चलो जल्दी!''

एवढ्यात उघड्या खिडकीतून आत फेकलेले सुवर्णाचे एक नाणे फाडकन् त्यांच्या कानशिलावर आदळले.

''थांब! कुणी फेकलं हे?'' ते ओरडले.

दफार्ज गर्दीत दिसेनासा झाला होता. लांबटांग्या आपल्या मुलाच्या प्रेतापाशी उभा राहून गाडीकडे रोखून पाहात होता. त्याच्या शेजारी एक भली दांडगी बाई उभी होती. तिच्या हातात काही विणकाम होते. सुया झरझर चालत होत्या. सरदारसाहेबांच्या नजरेला नजर भिडवून तिने त्यांच्याकडे टवकारून पाहिले. तिच्या त्या प्रखर नजरेने अस्वस्थ झालेले सरदारसाहेब ओरडले, ''चला. जलद जाऊदे गाडी!''

दुसऱ्या दिवशी सरदारसाहेबांची गाडी त्यांच्या इनाम गावच्या सरहद्दीवरून चालली होती. वस्तुत: हा प्रदेश तसा रमणीय असायला हरकत नव्हती, पण अवर्षणामुळे सारी वनश्री कोमेजून गेली होती. दारिद्र्य व उपासमारीमुळे व्याकूळ झालेली माणसे सर्वत्र भकास मुद्रेने, केविलवाणी वावरताना दिसत होती. सरदारसाहेब राजासाठी, स्वत:साठी, धर्ममंदिरासाठी या दुबळ्या प्रजेला पिळून करभार गोळा करीत आणि आता उरल्या-सुरल्याचा स्वाहाकार करण्यासाठी दुष्काळ आऽ वासून उभा होता.

खेड्यातून गाडी दौडत चालली होती.

एकाएकी गाडी थांबवण्याचा हुकूम त्यांनी दिला. सडकेवर काम करणाऱ्या एका मजुराकडे बोट दाखवून ते ओरडले, ''हाक मारा त्याला इकडे!'' तो येताच त्यांनी दरडावले, ''काय रे! आताच माझी गाडी तुझ्यासमोरून पुढे आली ना?''

''होय सरकार, हा सन्मान मलाच मिळाला आहे.''

''मग गाडीकडे एवढं टवकारून पाहायचं काय कारण?''

''सरकार, गाडीच्या तळाला बिलगलेल्या एका माणसाकडे मी पाहात होतो.''

''कोणता माणूस? त्याचं नाव काय?''

''सरकार, तो या गावचा अगर या भागातला दिसत नव्हता.''

''तो कोणासारखा दिसत होता?''

''सरकार, धुळीने माखल्यामुळे तो एखाद्या पिशाच्चासारखा दिसत होता. आपलं तोंड आकाशाकडे करून तो गाडीला बिलगला होता. भला लांब-टांग्या दिसत होता तो.''

सरदारसाहेब चांगलेच चमकल्यागत झाले, पण मुद्रेवर तसे काहीच न दाखवता त्यांनी त्या मजुराला खडसावले आणि त्या माणसाला न हटकल्याबद्दल त्याला सडकून दम दिला. नंतर तेथील तबेलावाला व करवसुली

अधिकारी गॅबेल, यांना बोलावून त्यांनी त्या लांब-टांग्याला काहीही करून पकडून आणण्याचा हुकूम दिला.

गॅबेल अगदी विनयाचा आव आणून म्हणाला, ''सरकार, आपल्या आज्ञेची अंमलबजावणी करण्यात मला धन्यताच वाटेल!''

'' हा माणूस म्हणजे केवळ सैतानच असावा'' रस्तामजूर सांगू लागला. ''गाडीचा वेग जरा कमी होताच त्या लंबाट्याने गाडी सोडून टेकडीच्या दिशेने धूम ठोकली आणि तो हां हां म्हणता दिसेनासा झाला.''

यानंतर गाडी सरदारसाहेबांच्या किल्ल्याकडे रवाना झाली. गाडी येताच किल्ल्याचे प्रचंड दरवाजे उघडले गेले.

''माझा पुतण्या इंग्लंडहून आला का रे?'' त्यांनी गाडीतून उतरताच नोकराला विचारले.

एका प्रशस्त दिवाणखान्यात त्यांच्या नाश्त्याची संपूर्ण व्यवस्था तयार होती. दिवाणखान्याची सजावट मोठी आकर्षक होती. तीवरून सरदार साहेबांच्या वैभवाची कल्पना येत होती. त्यांची मुद्रा एकाएकी कठोर बनली आणि ते खिडकीतून बाहेर पाहू लागले.

''ते काय आहे? झडप उघड पाहू!'' त्यांनी खानसाम्याला हुकूम दिला. खानसाम्याने संपूर्ण खिडकी उघडून बाहेर पाहात म्हटले, ''सरकार, बाहेर तर झाडाशिवाय काहीच दिसत नाही!'' एवढ्यात घोडागाडीच्या चाकांचा आवाज ऐकू आला आणि त्यांचा पुतण्या किल्ल्यात येऊन दाखल झाला. अल्पावधीतच त्याने चुलत्याच्या खोलीत प्रवेश केला.

इंग्लंडमध्ये चार्लस् डार्ने म्हणून ओळखला जाणारा माणूसच आत आला होता. तोच सरदार साहेबांचा पुतण्या होता.

चुलता हसरी मुद्रा करून म्हणाला, ''बराच काळ आपण येणार येणार म्हणून ऐकत होतो, तो योग आज आला म्हणायचा!'' पण यापलीकडे या उभयतांनी आपल्या नात्याची जवळीक दाखविणारी कोणतीच हालचाल केली नाही. पुतण्याही अगदी जुजबीपणाने उत्तरला, ''होय काका, आज जरा सवड मिळाली, म्हणून सरळ इकडे आलो झालं!''

''पण मला वाटतं, या प्रवासाचा आपला बेत दीर्घकाळ चालला होता, नाही!''

''होय, पण काही ना काही कारणाने येणे लांबणीवर पडे!''

''तसं काही तरी असणारच म्हणा!''

एव्हाना नोकर बाहेर निघून गेला होता. चुलते-पुतणेच काय ते खोलीत होते. एखाद्या मुखवट्याप्रमाणे निर्विकार दिसणाऱ्या काकाच्या चेहऱ्याकडे पाहात पुतण्या म्हणाला, ''मी एकाच गोष्टीचा काही तलास लागतो का ते पाहायला परत आलो आहे. या प्रकरणी प्रत्यक्ष मृत्यूला तोंड द्यायचा प्रसंग आला, तरी माझी तयारी आहे. काकाजी, मला वाटतं, माझ्या हालचालींवर संशयाचं आवरण चढवून, मला मृत्यूच्या जबड्यात लोटायचं कारस्थान तुम्हीच केलं असावं!''

''छेऽऽ! मुळीच नाही.'' काका अत्यंत नम्रतेने म्हणाले.

''काही का असेना, माझ्या कामात तुम्ही कोणत्या ना कोणत्या उपायाने व्यत्यय आणल्याशिवाय राहाणार नाही, याची मला खात्री आहे.'' पुतण्या कमालीचा संशय व्यक्त करीत म्हणाला.

आपल्या चेहऱ्यावरील क्रौर्याची छटा कमालीची स्पष्ट करीत चुलता तुसडेपणाने म्हणाला, ''अरे, हे तर मी तुला पूर्वीच सांगितलं आहे.''

''मला वाटतं फ्रेंच दरबारात तुम्हाला आता कवडीचीही किंमत राहिली नाही, नाही तर तुम्ही राजाचा एखादा हुकूम आणून मला कायमचंच कुठल्यातरी तुरुंगात डांबलं असतंत!''

''शक्य आहे.'' चुलता म्हणाला. ''पण अलीकडे जरा

काळ फिरला आहे, आमच्या मालमत्तेवरील आश्रितांचा जीवन-मृत्यूही आज आमच्या हाती राहिला नाही. आमच्या सत्तेला जरा मर्यादा पडली आहे आणि बाळ, म्हणूनच तुझी वटवट चालू आहे!''

''आपण केलेला सत्तेचा दुरुपयोग पाहून मला वाटतं, आख्ख्या फ्रान्समध्ये आपला बदलौकिक झाला आहे. माझ्या वडिलांनी व त्यांच्या जुळ्या भावाने, म्हणजे आपण, आपल्या सुखाआड येणाऱ्या प्रत्येकाचा अनन्वित छळ केला आहे. तुम्ही उभयता बंधूंनी केलेल्या अन्यायाचं थोडंफार परिमार्जन करावं, म्हणून माझी धडपड चालू आहे. माझ्या आईला मी तसं वचन दिलं आहे नि मला ते पूर्ण करायचं आहे!''

चुलत्याने पुतण्याकडे एकदा क्रूर नजरेने पाहिले आणि तो म्हणाला, ''अरे, आम्ही जे केलं, करीत आहोत नि करणार आहोत, तेच करीत आम्ही मरणार आहोत. तुझे वडील वारले, मी अद्यापि जिवंत आहे, पण आज ना उद्या मरणारच आहे. ही अवाढव्य मालमत्ता आमच्या कृत्यांनी निर्माण झाली, तिचा वारसा....''

''मिळाला तरी मला नको!''

''तो तुला मिळणं अशक्य...''

''मला तो नको आहे आणि मिळाला तरी मी ती सारी मालमत्ता देऊन टाकणार आहे!''

''मग जगणार कसा?''

''काबाडकष्ट करून निढळाच्या घामाने!''

''कुठे?''

''इंग्लंडात!''

''तुझ्या दुर्दैवाने तुला तेच करावं लागणार आहे म्हणा! पण काय रे तिथे कोणी फ्रेंच डॉक्टर आहे म्हणे? माहीत आहे तुला तो?''

''हो!''

''त्याला एक मुलगी आहे?''

''आहे!''

''ठीक आहे. तू आता दमला असशील. जा. विश्रांती घे जा!'' त्याने पुतण्याकडे पाहून मान किंचित् लवविली व मोठे गूढ स्मित केले. ''सकाळी आपण भेटूच.'' असे म्हणून चुलता दुसऱ्या एका दालनात निघून गेला.

रात्री आपल्या बिछान्यावर पडल्या पडल्या चुलता दिवसातील घटनांचा विचार करीत होता. सर्व किल्ल्यात प्रगाढ शांतता नांदत होती. सरदारसाहेब केव्हा निद्राधीन झाले हे त्यांचे त्यांनाच कळले नाही.

सकाळच्या प्रहरी किल्ल्यात एकदम गडबड उडाली. सर्व खेडेच्या खेडे किल्ल्यात गोळा झालेले दिसत होते. माणसे घाबऱ्या-घाबऱ्या एकमेकांना काही सांगत होती, कुजबुजत होती. सरदारसाहेब बिछान्यात मरून पडले असल्याची वार्ता सर्वत्र एखाद्या वणव्याप्रमाणे पसरली होती.

सरदारसाहेब बिछान्यावर उताणे पडले होते. त्यांच्या छातीत एक भला मोठा खंजीर पार मुठीपर्यंत आत खुपसलेला होता. मुठीत एक कागद अडकवलेला होता. त्यावर लिहिले होते, ''हकाल गाडी जलदीने, अपुल्या थडग्याकडे! -जॅक्विस!''

■ ■ ■

सरदारसाहेबांच्या मृत्यूला आता एक वर्ष होऊन गेले होते. डार्ने इंग्लंडमध्ये स्थायिक झाला होता. फ्रेंच भाषेचा शिक्षक म्हणून त्याने चांगला लौकिक संपादन केला होता. एखाद्या विश्व विद्यालयात फ्रेंच भाषेचा प्राध्यापक म्हणून त्याची नियुक्ती होण्याची शक्यताही आता निर्माण झाली होती. तो स्वत: जात्याच कष्टाळू असल्याने खूप काम करून त्याने प्रसिद्धी व संपत्ती यांची चांगली जोड मिळविली होती. आरोपी म्हणून कोर्टात उभा असल्या दिवसापासून तो ल्यूसीवर अव्याहत निर्व्याज प्रेम करीत आला होता. तिच्या सौंदर्याबद्दल, तिच्या गोड स्वभावाबद्दल, त्याला विलक्षण आकर्षण होते. पण याबद्दलची वाच्यतामात्र त्याने कोणापाशी वा कधीच

केली नव्हती!

वसंत ऋतूतील एका सकाळी तो डॉक्टर मॅनेटना भेटण्यासाठी आला. ल्यूसी त्यावेळी प्रासबाईबरोबर बाहेर गेलेली असणार, याची त्याला कल्पना होती! डॉक्टर एका खिडकीपाशी वाचीत बसले होते. डॉक्टर खूप काम करीत, वाचन करीत, झोप फारच थोडा वेळ घेत. पण मोठ्या मजेत, आनंदात कालक्रमणा करीत. डार्नेला पाहाताच त्यांनी पुस्तक खाली ठेवले. हस्तांदोलन करायला आपला हात पुढे केला. ''चार्लस् डार्ने, तुम्हाला पाहून मला मोठा आनंद होतो. मला वाटतं, ल्यूसी कुठेतरी बाहेर गेली असावी.'' ते म्हणाले. ''आता एवढ्यात ती परत येईल म्हणा!''

डॉक्टरसाहेब, ते मला माहीत आहे आणि म्हणूनच आपल्याशी एकांतात बोलता यावं म्हणून मी आता आलो आहे.''

बराच वेळ शांततेत गेल्यानंतर डॉक्टर म्हणाले, ''हं! मग बोला ना काय ते!'' काय बोलावे हेच बराच वेळ डार्नेला सुचेना. मग मोठ्या मिनतवारीने तो म्हणाला, ''डॉक्टर मॅनेट, आज सुमारे दीड वर्षं मी आपल्या परिचयात आहे आणि मला वाटतं, मी आता काय बोलणार आहे, याची काही कल्पना आपल्याला आली असावी!''

''आपण ल्यूसीबद्दल काही बोलणार आहात काय?''

''होय.''

''मग तिच्याबद्दल बोलताना आपल्याला तिऱ्हाइताप्रमाणे बोलण्याचं कारण काय?''

''डॉक्टर मॅनेट, ल्यूसीबद्दल मला वाटणारा आदरभाव, प्रेम व्यक्त करताना मला संकोच वाटतो. आपल्या कन्येवर मी मन:पूर्वक प्रेम करत आलो आहे आणि माझ्याबद्दल आपण तिला काही बोलावे, एवढीच माझी इच्छा आहे.'' थोडा वेळ थांबून डॉ.मॅनेट म्हणाले, ''तुमच्या प्रेमाबद्दल मला शंका नाही, चार्लस् डार्ने!''

''आपण याबाबत तिच्याशी काही बोलला काय?''

''नाही! मला ती दुरावेल या भीतीने मी ही गोष्ट टाळलेली नाही, पण माझ्या हातून ती गोष्ट घडली नाही, हे मात्र खरं.''

डार्ने आदरपूर्वक म्हणाला, ''तुम्ही आणि तुमची कन्या यांचं एकमेकांविषयीचं प्रेम असामान्य आहे. ती लहानपणी मातृप्रेमाला आंचवली, मातृप्रेमाला दीर्घकाळ मुकली. आपला नि तिचा वियोग व्हावा, अशी माझी इच्छा नाही, डॉक्टर!''

डॉक्टर मॅनेट स्तब्ध बसून ऐकत होते. त्यांनी मान खाली घातली होती. त्यांचा श्वास किंचित् जलद चालू होता. अन्यथा ते शांत दिसत होते.

''आपल्या भावना ओळखून मी आजपर्यंत या गोष्टीचा उल्लेख टाळला होता, डॉक्टर! ती दुरावेल अशी आपल्याला भीती वाटत असेल, तर यापुढेही मी माझ्या प्रेमाचा उच्चार करणार नाही. पण माझ्या प्रेमाने आपले प्रेमसंबंध अधिक चिरस्थायी होतील, अशी आपली भावना असली, तर मात्र या गोष्टीचा विचार व्हावा, असं मला वाटतं.''

''चार्लस डार्ने, तुझ्या भावना आणि तुझी भाषा तुझ्या उमदेपणाला साजेशीच आहे. माझ्याकडून तुला काही अभिवचन व साह्य हवं आहे काय?''

''आपल्या संमतीखेरीज मी काहीच करू शकत नाही. आपल्या सहानुभूतीचा एक शब्द इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा मला अधिक आहे!'' डार्ने दृढपणे म्हणाला. ''पण आपला शब्द मिळावा, म्हणून मी दडपणमात्र आणणार नाही.''

''मला त्याची कल्पना आहे, डार्ने! ल्यूसी माझं सारसर्वस्व आहे. प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने तिच्या जीवनातल्या एखाद्या दु:खद घटनेला आपण कारणीभूत होऊ नये, यासाठी मी जपत असतो. निदान तिच्यावर प्रेम करणाऱ्या माणसाकडून तरी तिला दु:ख होण्याचा प्रसंग येऊ नये, यापलीकडे मी कशाला जपणार?'' एवढे

बोलून डॉक्टर मॅनेट स्तब्ध झाले. त्याची मुद्रा गंभीर दिसू लागली. त्यांच्यात झालेला हा बदल पाहून डार्ने एकदम चपापल्यागत झाला.

एवढ्यात मंदस्मित करून डॉक्टर मॅनेट म्हणाले, ''तुम्हाला आणखी काही सांगायचं आहे?''

''माझं सध्याचं नाव, ''डार्ने बोलू लागला, ''हे किंचित् बदललेलं नाव आहे. माझ्या आईच्या घराण्याकडून घेतलेलं नाव आहे ते. माझं स्वत:चं नाव नव्हे. मी इंग्लंडात का आलो, हेही मला तुम्हाला सांगायचं आहे. आपल्यापासून कोणतीच गोष्ट मला लपवून ठेवायची नाही.''

''थांबा!'' आपले दोन्ही हात कानावर ठेवीत डॉक्टर ओरडले.

●●●

## ७. भाषा तसा माणूस

ल्यूसी घरी आली तेव्हा वडिलांच्या खोलीतून ठोकाठोकीचा मंद आवाज तिच्या कानी आला. तिचे रक्त एकदम गोठल्याप्रमाणे झाले. ती धावतच पुढे गेली आणि तिने वडिलांना हळूच हाक मारली. लगेच आवाज थांबला आणि डॉक्टर खोलीबाहेर आले आणि घरभर येरझारा घालू लागले. बरीच रात्र झाली, तरी त्यांचा हा कार्यक्रम चालूच होता. ल्यूसीही त्यांच्याबरोबर चिंतातुरपणाने खाली मान घालून वावरत राहिली.

क्वचित् प्रसंगी सिडने कार्टन डॉक्टर मॅनेट यांच्या घराला भेट देई, पण तो आला, म्हणजे विचारमग्न स्थितीतच बसून राही. कधी बोलला, तर मात्र व्यवस्थित बोले. त्याच्या एकंदर स्वभावात असणारी बेपर्वाई दूर झाली असेल, असे मानायला मात्र फारशी जागा नसे. तो नेहमीच उदासपणे वावरे. मद्यप्राशन करतानासुद्धा तो कधी खुशीत दिसत नसे.

ऑगस्ट महिन्यातील एके दिवशी तो डॉक्टर मॅनेट यांच्या घरी आला. तेव्हा ल्यूसी एकटीच माडीवर काम करीत बसली होती. त्याच्या सहवासात ल्यूसीला नेहमीच अस्वस्थ वाटे, पण आज त्याच्यात काहीतरी बदल झाला आहे, हे तिच्या ध्यानात आले. ''कार्टन, आज आपली प्रकृती बरी नाही की काय?'' तिने जरा भीतभीतच विचारले.

''तसं काही नाही, पण माझं आयुष्य ज्या पद्धतीने चाललंय, त्याचा विचार करता, मला कधी चांगली प्रकृती लाभेल, असं वाटत नाही!''

''हे तुम्हाला कळतं ना? मग तुम्ही चांगल्या पद्धतीने का राहात नाही?'' तिने सौम्यपणाने विचारले. पण एकदम तिची मुद्रा कष्टी झाली. सिडने कार्टनच्या डोळ्यात अश्रू उभे राहिलेले तिला दिसले.

''आता वेळ निघून गेल्यावर प्रकृतीत बदल तो काय होणार?'' त्याचा आताचा हा हळूवारपणा पाहून तिची मन:स्थिती मोठी चमत्कारिक झाली. कार्टनला तिची ही अवस्था जाणवल्याशिवाय राहिली नाही. तो म्हणाला, ''ल्यूसी मॅनेट, मला क्षमा करा. माझ्या बोलण्याचा आपल्यावर इतका परिणाम होईल, असं मला वाटलं नव्हतं. पण आता मात्र माझं सारंच बोलणं ऐकून घ्या!''

''तुमचं मन उघडं केल्याने तुम्हाला समाधान वाटणार असेल, तर मीही मोठ्या आनंदाने ते ऐकायला तयार

आहे.''

''तुमच्या चांगुलपणाबद्दल देव तुमचं भलं करो! एका वाया गेलेल्या माणसाबद्दल तुमच्या मनात काही दयाबुद्धी आहे, हे पाहूनच मला मोठा आनंद होतोय. तुमच्या मनात पूर्वी माझ्याबद्दल कधीच ओलावा नव्हता, हे मी जाणून होतो आणि तो असावा अशी माझी अपेक्षाही नव्हती; पण आज तुमच्याकडून जी सहानुभूती मिळाली, तीबद्दल तुमचं कसं उतराई व्हावं, हेच मला समजत नाही.''

''क्षमा करा, कार्टन. माझ्याकडून तुम्हाला काही साह्य होण्यासारखं आहे का?'' ती अत्यंत विनयाने म्हणाली, ''तुम्ही कधीच कुणाच्या सहानुभूतीची अपेक्षा करीत नाही, तुम्हाला तशी आवश्यकताही भासत नाही, हे मला ठाऊक आहे.''

''ल्यूसी मॅनेट, माझ्यासाठी जे काही करायचं, ते तुम्ही आधीच केलं आहे. तुम्ही आणि तुमचे वडील यांच्या दर्शनाने मी उत्तेजित झालो आहे. एका उदात्त अशा स्वप्नसृष्टीत वावरू लागलो आहे. भूतकाळाची विस्मृती व्हावी, अशी इच्छा बळावू लागली आहे.'' कार्टनने आपले तोंड दोन्ही हातांनी झाकून घेतले. तो जायला निघाला, पण दारापर्यंत जाताच परत वळून म्हणाला, ''ल्यूसी, मृत्यूसमयी तुझंच नाव माझ्या तोंडात राहील. कारण माझे अपराध, माझी दु:खं, माझी बेपर्वाई, यांच्याबद्दल तुझ्या मनात दया आहे, या दोषांकडे सहानुभूतीने पाहाण्याइतकी सहृदयता आहे. मला आज फारच समाधान वाटतंय्. हृदयावरील एक दडपण दूर झाल्यासारखं हलकं, हलकं वाटतंय्.''

कार्टनचे हे सारेच वागणे अनपेक्षित होते. त्याला अशा हळव्या मन:स्थितीत पूर्वी कधीच न पाहिल्यामुळे ल्यूसीला त्याची अवस्था अनुकंपनीय वाटली. तिच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. आणि ते पाहून कार्टन म्हणाला, ''या सहानुभूतीला मी पात्र नाही, ल्यूसी! मी तुला एकच सांगतो, की मी तुझ्या सुखासाठी प्राणार्पण करायलाही मागेपुढे पाहाणार नाही!'' एवढे बोलून कार्टन बाहेर पडला.

▪ ▪ ▪

''छा ऽ ऽ! आजची हवा अगदीच बेकार आहे!'' गुत्त्यात प्रवेश करता करता दफार्ज आत बसलेल्या गिऱ्हाइकांना उद्देशून बोलला. आत जमलेले लोक भकास मुद्रा करून आळसात आपला वेळ दवडीत होते.

''आज योगायोगाने रस्ता -मजूर जॅक्विस इथे आलेले दिसतात, त्यांना मद्याचा एक झकासपैकी ग्लास द्या बाईसाहेब!'' दफार्ज आपल्या पत्नीला उद्देशून म्हणाला. दफार्जबाईने तत्काळ एक ग्लास भरून तो त्या रस्तामजुरापुढे आणून ठेविला. तेथे बसलेले दुसरे तिघेजण उठले आणि एकामागून एक मुकाट्याने बाहेर पडले. त्या रस्ता-मजूरांबरोबर दफार्जनेही मद्यप्राशन केले. आणि मद्यपान संपताच तो म्हणाला, ''चला, ज्या खोलीबद्दल मी बोललो, तीच तुम्हाला दाखवतो!''

ते उभयता गुत्त्यातून बाहेर पडून त्या जुन्या जिन्याने वर गेले आणि डॉक्टर मॅनेट यांना ठेवलेल्या खोलीत दाखल झाले. गुत्त्यातून आधी बाहेर पडलेले तीन असामीही त्या ठिकाणी आधीच हजर झाले होते. दफार्जने काळजीपूर्वक खोलीचा दरवाजा बंद केला आणि हलक्या आवाजात तो म्हणाला, ''रस्तामजूर जॅक्विस, तुम्हाला काही सांगायचं आहे?''

रस्ता-मजूराने जे काही सांगितले त्याचा मथितार्थ एवढाच होता, की एके दिवशी सरदारसाहेबांच्या गाडीला लटकून आलेल्या एका लंबाट्याने त्यांचा मुडदा पाडला. सरकारी अधिकाऱ्यांनी या लंबूचा कसून शोध करून त्याला पकडले. कारण त्याला छपविणे अशक्य झाले. तो मजूर पुढे सांगू लागला, ''मी टेकडीच्या बाजूला रस्त्यावर काम करीत होतो, त्यावेळी त्या उंच माणसाला घेऊन सहा शिपाई चालले होते. मी त्या माणसाला ओळखलं, पण तसं कोणाला भासू मात्र दिलं नाही. एक शिपाई दुसऱ्याला म्हणत होता, 'हाकला बेट्याला लवकर.

याला लवकरच थडग्यात गाडायचाय्.' त्याच्या पायाला मारहाणीने इजा झाली असल्याने त्याला भरभर चालता येत नव्हतं. त्याला सारखी मारझोड चालू होती. तो खाली पडताच शिपाई दात काढीत. त्याच्या चेहऱ्यावरून रक्ताचे ओघळ वाहात होते. त्याला खेड्यातल्या तुरुंगात डांबलंय्. आम्ही सगळं पाहात आहोत, ऐकत आहोत, पण करू मात्र काहीच शकत नाही!''

ती तीन माणसे व दफार्ज ही हकीकत ऐकून एकमेकांकडे क्रुद्ध नजरेने पाहात होते. ''पुढे सांग, जॅक्विस!'' दफार्ज म्हणाला. लोकांनी राजाकडे अर्ज केलाय् म्हणे. मुलाच्या मृत्यूमुळे वेडापिसा होऊन त्याने त्या लहरीत सरदारसाहेबांचा खून केला असल्याने त्याला माफी मिळावी, अशी त्या अर्जात मागणी केली आहे.'' जॅक्विस क्रमांक तीन म्हणाला, ''असा अर्ज करणाऱ्यांनी आपल्याही जिवाला एक प्रकारचा धोका निर्माण करून ठेवलाय.''

''होय, तसंच झालंय्. हा अर्ज करणाऱ्यांची हाडं नरम करायचं, त्यांना ठेचून काढायचं काम आता चालू झालंय! त्या लांब टांग्याला हाल हाल करून मारणार आहेत म्हणे. त्याच्यासाठी गावाबाहेर चाळीस फूट उंचीचा वधस्तंभ उभारायचं कामही चालू झालं आहे. भयंकर! फारच भयंकर!'' असे म्हणून त्या मजूराने आपले डोळे वर केले. जणू काही त्या वधस्तंभाचे प्रत्यक्ष दर्शनच त्याला होत होते.

त्या खोलीत बराच वेळ उदासवाणी शांतता पसरली.

नंतर जॅक्विस क्रमांक एक म्हणाला, ''ठीक आहे, तू आता खाली जाऊन थांब.''

तो जाताच दफार्ज आणि उरलेले तिघेजण काही खलबत करीत बसले. जॅक्विस क्रमांक एक म्हणाला, ''या अपराधाबद्दल प्रत्येकाला मृत्यूचीच सजा दिली पाहिजे. त्या किल्ल्यातील प्रत्येक कुटुंबियाची नोंद झालीच पाहिजे.''

''झाडून सारे ठारच केले पाहिजेत!'' दफार्ज म्हणाला.

''आपली नोंदवही सुरक्षित आहे ना?'' जॅक्विस क्रमांक दोनने विचारले.

''इतरांना तिचा मागमूसही लागता उपयोगी नाही.''

''होय! ही नोंदवही म्हणजे माझ्या बायकोची स्मरणशक्ती! तिच्या स्मरणातून एकही नाव सुटणं शक्य नाही. आपलं वीणकाम चालू ठेवताना त्याच्या प्रत्येक टाक्यागणिक तिने अपराध्यांची नोंद केली आहे. आणि ती तिच्या स्मरणातून कधीही जाणं शक्य नाही! तिच्या वीणकामात गुंतलेलं नाव पुसलं जायची शक्यताच नाही!'' दफार्ज अभिमानाने म्हणाला.

दुसऱ्या दिवशी दफार्ज पती-पत्नीने त्या रस्ता-मजूराला गाठून, राजा आणि त्याचे दरबारी यांच्या प्रत्येक हालचालीवर सक्त नजर ठेवायची सूचना दिली. त्यांच्या संपत्तीचा अंदाज काढून, आपल्या गरिबीशी त्याची तुलना करायला सांगितले. उद्देश एवढाच, की त्यामुळे मजूरांची असूया, मत्सर जागृत व्हावा.

थोड्या वेळाने ती उभयता सेंट अँतोन विभागातील आपल्या गुत्त्यात येऊन दाखल झाली. आत येताच दफार्जबाई पतीला उद्देशून म्हणाली, ''रक्षक दलातला जॅक्विस काय सांगत होता?''

''आपल्या या विभागात आणखी एक हेर आलेला आहे. इतरही बरेच हेर इथे वावरत असतील, पण त्याला मात्र या एकाचीच माहिती दिसते!''

''मग आपल्याला त्याचेही नाव नोंदलं पाहिजे!'' त्याची पत्नी किंचित् काळजीच्या स्वरात म्हणाली, ''काय आहे हो त्याचं नाव?''

''जॉन बरसाड!'' दफार्ज म्हणाला. ''तो इंग्रज माणूस आहे!''

''बरसाड? आणि तो दिसतो कसा?''

''वय असेल चाळीस; उंची असेल पाच फूट नऊ इंच; काळेभोर केस; सुंदर उभट चेहरा; पाणीदार डोळे!''

''मग याचं नाव नोंदून ठेवूयाच!'' दफार्जबाई म्हणाली.

दफार्जबाई गुत्त्यातील गल्ला मोजून, तपासून पाहाण्यात गुंतली असावी, पण नजरेने ती दुकानातील शिलकी मालाचाही अंदाज घेत असावी. दफार्ज आपली चिलीम फुंकीत, उगीच येरझारा घालीत होता. हवेत बराच उकाडा असल्याने गुत्त्यात सगळीकडे रम्, ब्रँडी, वगैरे मद्यांचा वास दरवळला होता.

''आज आपण जरा थकलेले दिसता?'' दफार्जबाईने नवऱ्याला विचारले.

''होय; आज बराच त्रास पडलाय! आपल्याला फार वेळ ताटकळावं लागतंय्!''

''ताटकळावं लागतंय्, पण सूडाची संधी अशी तडकाफडकी कधीच येत नसते! सूडाची गती मंद असते.''

''असा तडाखा विद्युतगतीने नि दणक्यानेच द्यायचा असतो. त्याला विलंब नाही लागता कामा!''

''पण जरूर तेवढी विद्युतशक्ती जमा व्हायला वेळ हा लागणारच!'' दफार्ज विचारात पडल्याप्रमाणे दिसला. पत्नीच्या बोलण्यात काही सत्यांश आहे, हे मानणे त्याला भाग होते.

मादाम दफार्ज पुढे म्हणाली, ''आक्रमक पवित्रा घेऊन टोला हाणायला आपल्याला वेळ लागतोय खरा, पण त्या दिशेने आपली सतत आगेकूच चालूच आहे की! जॅक्विस नावाखाली वावरणाऱ्या आपल्या माणसांनी जनतेच्या संतापाला कसं उधाण आणलंय्, याची तुम्हाला कल्पना नाही का? जनतेचा हा संताप घटकोघटकी उग्र स्वरूप धारण करतोय आणि त्याचा आता केव्हातरी स्फोट होणारच!''

''त्याबद्दल मला मुळीच शंका नाही. पण जो विलंब होतोय त्यामुळे ही घटना आपल्या हयातीत घडते की नाही, एवढीच माझी शंका आहे!''

''या घटनेला चालना देण्यात आपलाच हात आहे, आणि माझी मनोदेवता मला सांगते आहे, की आपला विजय आपण याचि देही याचि डोळा नक्कीच पाहणार!'' करकरा दात ओठ खात दफार्जबाई म्हणाली.

दुसऱ्या दिवशी दफार्जबाई गुत्त्यात बसून आपले नेहमीचे वीणकाम करीत होती. जवळच तिच्या बाजूला गुलाबाचे एक फूल पडलेले दिसत होते. एवढ्यात दारात आलेल्या कोणातरी व्यक्तीची सावली दफार्जबाईच्या अंगावर पडली. येणारी व्यक्ती नवीन आहे, हे तिने केवळ सावलीवरून ओळखले. हातातील वीणकाम थांबवून, तिने शेजारचे गुलाबाचे फूल उचलून आपल्या केसात खोविले व आत येणाऱ्या माणसाकडे एक भेदक नजर टाकली. दफार्जबाईच्या केसात फूल दिसताच आत बसलेली माणसे एकामागून एक बाहेर पडली. आत येणारा नवा माणूस म्हणाला, ''नमस्कार बाईसाहेब!''

''नमस्कार!'' बाई तारस्वरात म्हणाली व झपाट्याने वीणकाम करू लागली. ती मनात म्हणत होती, ''वय अंदाजे चाळीस, उंची पाच फूट नऊ इंच, केस काळेभोर, चेहरा उभट...'' आलेल्या माणसाने ब्रँडीची मागणी केली व तो म्हणाला, ''बाईसाहेब, वीणकामात हातखंडा दिसतोय तुमचा! वीणकामाची तऱ्हाही मोठी आगळी दिसते!''

''तुम्हाला खरंच असं वाटतं?'' मंदस्मित करीत दफार्जबाई म्हणाली. एवढ्यात दोन माणसे आत आली, पण दफार्जबाईच्या केसात गुलाबाचे फूल दिसताच त्याच पावली परत फिरली, तरीही जाताना आपण कोणाला तरी शोधायलाच आलो होतो, असा आविर्भाव करायला ते दोघे विसरले नाहीत. आत आलेल्या हेराची नजर सर्व घटनांवर खेळत होती, पण आपले कशात लक्ष नाही, असे तो भासवीत होता.

''सध्या आपला धंदा जरा मंद दिसतो, नाही?'' त्याने विचारले.

''भलताच मंद! लोक दारिद्र्याने गांजून गेले आहेत!''

''लोक दारिद्र्याने गांजले आहेत, जुलमाखाली भरडून निघताहेत, असंच तुमचं म्हणणं ना?''

''माझं नाही, तुमचंच!'' आपले वीणकाम पुढे चालवीत दफार्जबाई म्हणाली.

''पण तुम्हालासुद्धा असंच वाटतं ना?''

''वाटतं की! पण दुकानात मला आणि माझ्या पतींना इतकं काम आहे, की इतरांच्याबद्दल काही वाटायला आम्हाला फुरसतच कुठे आहे?'' आत आलेला हेर वस्तुत: काही माहिती हाती लागते का, हे पाहण्यासाठी आला होता. पण त्या बाबतीत त्याची निराशाच झाली. तरीही मुद्रेवर मात्र त्याने निराशेचे कोणतेच चिन्ह दर्शविले नाही.

''गस्पाडचा मृत्यू ही एक भयंकर घटनाच झाली; नाही का?'' त्याने विचारले.

''लोकांना मारण्यासाठी लोक जर सर्रास सुऱ्या-खंजिराचा उपयोग करू लागले, तर त्याबद्दल त्यांना प्रायश्चित मिळणारच!''

''मला वाटतं, या प्रकरणी इथल्या जनतेत बराच असंतोष पसरला आहे, नाही? आपली तुमच्या आमच्यातली भाषा!'' तो हेर हळूच म्हणाला.

''मला तरी बाई काही कल्पना नाही! हे आलेच बघा. त्यांनाच विचारून पाहा.'' आणि इतक्यातच दफार्ज आत आला.

त्याच्याकडे पाहून स्मित करीत हेर म्हणाला, ''नमस्कार जॅक्स!'' त्याच्याकडे निरखून पाहात दफार्ज उद्गारला, ''जॅक्स? कोण जॅक्स? आपली काही तरी चूक होतीय. माझं नाव आहे अर्नेस्ट.''

काहीच घडले नाही असे दाखवीत तो हेर म्हणाला, ''मग माझ्या ऐकण्यात काहीतरी चूक झालेली दिसते. काय हो, डॉक्टर मॅनेट यांची सुटका झाल्यानंतर ते आपल्या आश्रयाखाली होते का?''

''हं!'' अगदी एकाच शब्दात उत्तर आले.

''डॉक्टर मॅनेट व त्यांची मुलगी यांना लॉरी नावाच्या माणसाने आपल्याच साह्याने इंग्लंडला नेलं हे खरं का?''

''बरोबर.''

''मग अलीकडची त्यांची काही वार्ता?''

''सुखरूप पोचल्याची त्यांची पत्रे एकदा आली खरी; पण नंतरची अलीकडची अशी काही वार्ता आपल्याला तरी नाही.''

''त्या मुलीचा काही विवाह ठरला काय?''

''खरोखर ती इतकी सुंदर आहे, की तिचा विवाह यापूर्वीच व्हायला हवा होता. पण तुम्ही इंग्रज लोक अगदीच थंड प्रकृतीचे, त्यामुळे काहीच सांगता येत नाही!'' दफार्जबाईने मध्येच तोंड घातले.

''अरे वा! मी इंग्रज आहे, हे तुम्हाला माहीत आहे तर?''

''तुमची भाषाच ते सांगते आहे. जशी भाषा तसा माणूस!''

तिचा हा शेरा त्या हेराला आवडला नाही, तरी तसे न भासविता तो पुढे म्हणाला, ''ल्यूसी मॅनेटचे लग्न ठरलं आहे, पण चमत्कार असा झाला आहे, की ते त्या खून झालेल्या सरदाराच्या पुतण्याबरोबर ठरलं आहे आणि बिचाऱ्या गस्पाडला तर या खुनाच्या पायी फाशी जावं लागलं. आता पुतण्याला सरदारकी मिळेल म्हणा! पण सध्या तर स्वारी आईच्या माहेरघरचं नाव लावून, इंग्लंडात चार्लस डार्ने म्हणून वावरत आहे!''

दफार्जबाईंचे वीणकाम संथपणे चालू होते; दफार्ज मात्र चांगलाच विचलित झालेला दिसला. काही का उद्देश असेना, पण एवढी हकीकत त्या दोघांना ऐकवून, त्या हेराने आपले ब्रँडीचे पैसे चुकते केले व गुत्ता सोडला.

''ल्यूसीबद्दलची ही वार्ता खरी असेल का?'' दफार्जने विचारले.

''आणि खरी असली तर?'' बाई पुटपुटली.

''जर का आम्ही विजयी झालो, तर निदान ल्यूसीच्या

भल्यासाठी तरी त्याने फ्रान्स देशात पाऊल टाकता उपयोगी नाही. सरदाराचं घराणं समूळ नष्ट करायचा निर्धार केलाय लोकांनी. त्यात त्या बिचारीची आहुती पडायला नको!''

''तिचा नवरा कुठेही राहो आणि कसाही राहो, त्याच्या नशिबी जसा त्याचा शेवट ठेवला असेल, तसाच तो होणार, एवढं मला कळतं!'' दफार्जबाई शांतपणे पण अत्यंत कठोर स्वरात म्हणाली.

▪ ▪ ▪

ल्यूसी डार्ने विवाहाच्या आदल्या रात्री आपल्या वडिलांबरोबर खाली बागेत बोलत बसली होती. मंद चांदणे सगळीकडे पसरले होते.

''बाबा, माझ्या लग्नामुळे तुम्ही खरंच सुखी व्हाल ना?'' तिने विचारले.

''मी अगदी आनंदात आहे पोरी. तुम्हा उभयतांचं परस्परांवर अत्यंत प्रेम आहे.''

''पण माझ्या विवाहामुळे तुमच्यापासून एक दोन गल्ल्या का होईना, पण दूर जावं लागेल, याचंच वाईट वाटतं मला!''

डॉक्टर मॅनेट मोठ्या प्रसन्न मुद्रेने कन्येला म्हणाले, ''ल्यूसी, माझा भविष्यकाळ मोठा उज्ज्वल आहे. तुमच्या विवाहामुळे तर तो अधिकच उज्ज्वल होणार आहे. केवळ माझ्यासाठी तुला विवाहसुखाला पारखी करणं कसं शक्य आहे. कोणता पिता हे मान्य करील? माझ्या घनदाट काळ्या भूतकाळाची छाया तुझ्या सुखावर पडू नये, एवढीच माझी इच्छा आहे.''

डॉक्टर मॅनेट आपल्या कैदेबद्दल ल्यूसीशी यापूर्वी कधीच बोलले नव्हते. पण आता मात्र त्यांनी आपले मनोगत उघडे केले. ते म्हणाले, ''तुझ्या बालपणी तुला प्रत्यक्ष पाहायचा योग मला आला नाही. तू कशी दिसत असशील? कुठे असशील? याची कल्पनाचित्र रंगवीत मी अंधारकोठडीत बसून रात्रीच्या रात्री जागून काढल्या आहेत.'' डॉक्टर मॅनेट बोलू लागले, पण त्यांना अधून मधून अडखळल्यासारखे होई. काही विसरलो तर नाही ना, अशी शंका येई. कथासूत्राचा धागा पुन्हा जोडून घेऊन, पुन्हा ते बोलू लागत. त्यांची ही सारी हकीकत ऐकत असताना ल्यूसी अगदी थिजल्याप्रमाणे होऊन गेली. पित्याबद्दलचे प्रेम व आदरभाव यांना उधाण आले. डॉक्टरांनी आपली हकीकत संपविली आणि मग ती उभयतांही मोठ्या प्रसन्नतेने घरात गेली. रात्री खूप उशीरा ल्यूसीने वडिलांच्या खोलीत डोकावून पाहिले. ते अगदी शांत व प्रफुल्ल मुद्रेने निद्राधीन झाले होते.

●●●

## ८. पुन्हा चर्मोद्योग

विवाहाचा दिवस उजाडला. त्या दिवशी आकाश अगदी निरभ्र होते. सर्वत्र सुंदर सूर्यप्रकाश पसरला होता. पक्ष्यांची किलबिल चालू होती. प्रासबाई व लॉरी डॉक्टर मॅनेट यांच्या खोलीच्या बंद दरवाज्यापाशी उभी होती. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे होते. डॉक्टर मॅनेट खोलीत डार्नेशी काही गुजगोष्टी करण्यात गढले होते. ल्यूसीच्या जीवनात उजाडलेला हा दिवस अत्यंत आनंदाचा होता. तिच्या विवाहाच्या कल्पनेने सगळी सुखावल्यागत झाली होती.

''ल्यूसी, तू डॉक्टरांची मुळीच काळजी करू नकोस. मी आणि प्रासबाई त्यांची सर्व काळजी घेऊ. तू आणि तुझा पती आठ-पंधरा दिवस आराम प्रवासासाठी जाणार

आहात, म्हणून काळजी करायचं काहीच कारण नाही. तुम्ही परत याल, त्यावेळी तुम्हाला असं दिसेल, की डॉक्टरांची काळजी आम्ही पुरेपूर घेतली आहे.'' लॉरी ल्यूसीला हे सांगत होता, एवढ्यात डॉक्टर मॅनेट डार्नेसह खोलीबाहेर आले. पण यावेळी मात्र डॉक्टरांचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. आत जाताना त्यावर असलेली प्रसन्नता आता अजिबात दिसत नव्हती. डॉक्टर वरून अगदी शांत असल्याचे भासवीत होते, पण त्यांच्या मनात कसल्यातरी जबरदस्त भीतीने घर केलेले दिसत होते. लॉरीला तर ते चांगलेच जाणवले. डॉक्टरांनी आपल्या कन्येचा हात धरला आणि नंतर सगळी मंडळी शेजारच्या चर्चमध्ये गेली. त्या ठिकाणी चार्लस् डार्ने व ल्यूसी मॅनेट यांचा विवाह समारंभ पार पडला. या समारंभाला निकटवर्तीयांखेरीज अन्य कोणी उपस्थित नव्हते. घरी परत आल्यानंतर, छोटीशी मेजवानी झाली आणि नंतर ल्यूसीने आपल्या प्रेमळ पित्याचा निरोप घेतला.

हा वियोग दीर्घकाळासाठी नसला, तरी तो उभयतांनाही जाणवल्याशिवाय राहिला नाही. डॉक्टर मॅनेट वरकरणी मोठा उल्हास दाखवीत म्हणाले, ''चार्लस्, ल्यूसी आता तुझी झाली आहे. तू तिला खुशाल घेऊन जा! ज्याची वस्तू त्याच्याकडे असणंच चांगलं!''

गाडीच्या खिडकीतून उभयता पती-पत्नींनी हात बाहेर काढून सर्वांचा निरोप घेतला आणि गाडी चालू झाली.

कुमारी प्रास, लॉरी आणि डॉक्टर मॅनेट ही मंडळी कितीतरी वेळ गाडीच्या दिशेने पाहात होती. नंतर सगळी घरात गेली. दिवाणखान्यात गेल्यानंतर डॉक्टरांच्यामध्ये काहीतरी विलक्षण फरक पडत आहे, याची जाणीव लॉरीला झाली. पॅरिसमधील खोलीत असताना त्यांच्या मुद्रेवर जी अवकळा दिसत होती, तीच आता पुन्हा दिसू लागली होती.

लॉरी हळूच प्रासबाईला म्हणाला, ''आपण आता त्यांच्याशी अधिक बोलायच्या भरीस पडू नये. मला आता टेलसन बँकेत जायचंय. मी थोड्या वेळात परत येतो. मग आपण त्यांना घेऊन कोठेतरी बाहेर फिरायला जाऊ. भोजनही तिकडेच करू, म्हणजे त्यांना जरा बरं वाटेल!''

टेलसन बँकेतील आपले काम आटोपून सुमारे दोन तासांनी लॉरी परत आला. जिना चढत असतानाच, कोणीतरी हळूवारपणे काही ठोकाठोकी करीत असल्याचा आवाज त्याच्या कानी आला. एवढ्यात प्रासबाई घाबऱ्या घाबऱ्या धावतच खाली आली आणि त्याला जिन्यातच गाठून म्हणाली, ''सर्व काही खलास झालं आहे! आता ते मला तर ओळखत नाहीतच, पण जोडे शिवायचं त्यांचं कामही त्यांनी पूर्ववत् चालू केलं आहे!''

लॉरीने काहीतरी बोलून तिची समजूत काढली व तो डॉक्टरांच्या खोलीत गेला. डॉक्टरांनी ते बसके बाकडे उजेडात घेतले होते व मोठ्या एकाग्रतेने त्यांनी जोडे शिवण्याचे काम चालू ठेविले होते.

''डॉक्टर तुम्ही हे काय चालू केलं आहे?'' लॉरीने विचारले.

डॉक्टरांनी क्षणभर मान वर करून पाहिले आणि पुन्हा मुकाट्याने आपल्या कामाला सुरुवात केली. त्यांनी आपल्या शर्टच्या गुंड्या घातल्या नव्हत्या. त्यांच्या चेहऱ्यावर बुद्धिभ्रंशाची ती पूर्वीची छटा आली होती. शरीर थकल्याप्रमाणे दिसत होते.

''डॉक्टर मॅनेट, माझ्याकडे पहा! हे काही तुमचं काम नाही!'' लॉरी फिरून काकुळतीने म्हणाला. आपले काम बंद न करता डॉक्टरांनी पुन्हा एकदा वर पाहिले, पण ते एक अक्षरही बोलले नाहीत.

लॉरीला आता आशेचा एकच किरण दिसत होता आणि तो म्हणजे, कोणीही हाक न मारता डॉक्टर अधून मधून प्रश्नार्थक मुद्रेने वर पाहात असत एवढाच!

लॉरीने व प्रासबाईने एवढंच ठरविले की, ल्यूसीपासूनच काय, पण डॉक्टरांना ओळखणाऱ्या प्रत्येकापासून ही गोष्ट अगदी गुप्त ठेवायची. डॉक्टरांची प्रकृती बरी नसल्याने ते काही दिवस कोणासच भेटणार नाहीत, असे त्यांनी संबंधितांना सांगूनही टाकले. ल्यूसीला एका पत्रात त्यांनी लिहिले, ''डॉक्टरांच्या एका रुग्णाइताचे दुखणे विकोपास गेल्यामुळे त्याच्यावर उपचार करण्यात डॉक्टर गढले आहेत. त्यामुळे त्यांना अलीकडे फुरसत अशी फारशी मिळतच नाही.''

या उभयतांची कल्पना अशी होती की, ल्यूसी परत येईपर्यंतच्या काळात डॉक्टरांची प्रकृती मूळ पदावर येईल

आणि मग सारे ठाकठीक होऊन जाईल. डॉक्टरांच्या लक्षात न येईल अशा बेताने लॉरीने त्यांच्यावर रात्रंदिवस सक्त नजर ठेवली होती. आयुष्यात प्रथमच त्याने टेल्सन बँकेच्या कामाची उपेक्षा केली होती. डॉक्टरांच्या खोलीच्या खिडकीसमोरच तो सतत बसून असे. डॉक्टरांशी बोलण्यात तर आता काहीच अर्थ राहिला नव्हता. कारण बोलायला लागले, तर ते अधिकच गांगरून जात.

लॉरी त्या खिडकीपाशी लिहीत-वाचीत बसे. आपली खोली म्हणजे तुरुंगाची कोठडी नव्हे, हे डॉक्टरांच्या मनावर ठसविण्याचा त्याचा प्रयत्न सारखा चालू असे. अंधार पडला आणि डॉक्टरांना काम करणे अशक्य झाले, म्हणजे तो त्यांना म्हणे, ''डॉक्टर, चला, आपण आता जरा फिरायला जाऊन येऊ!'' डॉक्टर फक्त जमिनीकडे पाहात बसत. बाहेर जाणे का नको, हे सांगणे त्यांना जमत नसे. बाहेर जायला ते तयारच नसत. क्वचित प्रसंगी ते स्वत:शी एवढेच पुटपुटत, ''नको! का नको? का नको?'' झोपी जाण्यापूर्वी बराच वेळपर्यंत ते लांबलचक येरझाऱ्या घालीत. बिछान्यावर पडताच त्यांना गाढ झोप लागे, पण सकाळी लवकर उठून ते आपल्या चर्मोद्योगाला लागत.

एके दिवशी प्रासबाई व लॉरी डॉक्टरांना माहीत असलेल्या एका गोष्टीबद्दल मुद्दाम त्यांच्याशेजारीच बोलत बसली. डॉक्टर अधून मधून मान वर करून ऐकल्यासारखे करीत, पण विशेष प्रतिक्रिया अशी दाखवीत नसत.

अशा रितीने आठ-दहा दिवस गेले आणि डॉक्टरांचे चर्मविद्येतील कौशल्य वाढताना दिसू लागले. त्यांच्यात बदल व्हायचे काहीच लक्षण दिसेना. लॉरी आणि प्रासबाई यांना अधिकच चिंता वाटू लागली.

●●●

## ९. जुने सहकारी

डॉक्टरांच्या हालचालीवर नजर ठेवता ठेवताच एका रात्री लॉरीचा तेथेच खिडकीपाशी डोळा लागला आणि सकाळी सूर्याची कोवळी किरणे अंगावर येताच तो खडबडून जागा झाला. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. त्याने डोळे चोळून पाहिले. आपण जागे आहोत, की स्वप्नात आहोत, अशी शंका त्याला येऊ लागली. लगबगीने तो डॉक्टरांच्या खोलीत शिरला.

डॉक्टरांनी आपली चर्मोद्योगाची सारी हत्यारे अडकवून ठेवली होती आणि ते खिडकीत बसून एक ग्रंथ वाचत होते. त्यांनी कपडेही आपले नेहमीचे घातले होते. त्यांचा चेहरा फिकट दिसला, तरी शांत आणि विचारी वाटत होता. त्यावरील स्मृतिभ्रंशाची कळा नष्ट झाली होती.

लॉरीने धावतच जाऊन ही वार्ता प्रासबाईला दिली. त्या दोघांनीही न्याहारीची वेळ होईपर्यंत गप्प बसायचे ठरविले आणि जणू काही घडलेच नाही अशा रितीने डॉक्टरांशी खोलीत जाऊन बोलायचा बेत केला. ते भूतकाळातून खरोखरच वर्तमानकाळात आले आहेत की नाही, हे समजून घेण्यासाठी, त्यांच्याशी गेल्या काही दिवसांतील घडामोडींबद्दल बोलून, त्याची काय प्रतिक्रिया दिसते ती पाहायची, हा त्यांचा उद्देश होता. पण न्याहरीच्या वेळी असे दिसले, की डॉक्टर आपल्या कन्येचा म्हणजे ल्यूसीचा विवाह जणू काही काल झाल्याप्रमाणे बोलत आहेत. तिच्या लग्नाच्या तारखेचा उल्लेख होताच मात्र ते बुचकळ्यात पडलेले दिसले.

न्याहरी आटोपताच लॉरी त्यांना म्हणाला, ''डॉक्टर, एका चमत्कारिक रोग्याबद्दल तुम्हाला मला काही विचारायचंय्. आपल्याला त्याच्याबद्दल काही सांगता

येईल का?''

डॉक्टर मॅनेट म्हणाले, ''आपल्या रोग्याची व्यथा मानसिक आहे का शारीरिक आहे, हे कळल्याशिवाय मी काय सांगणार?''

डॉक्टर मॅनेटनी आपल्या प्रश्नाचा रोख लक्षात घेतला आहे, हे पाहून लॉरीला बरे वाटले. मग काहीच आडपडदा न ठेवता तो म्हणाला, ''डॉक्टर, तुम्ही पॅरिसहून आल्यानंतर सर्व काही ठाकठीक होतं, पण गेल्या आठ-दहा दिवसांत तुमचं मन वर्तमानकाळ विसरून पुन्हा भूतकाळात भरकटलं, हा काय चमत्कार?''

शांत नि हलक्या आवाजात डॉक्टरांनी विचारले, ''पण गेल्या काही दिवसांतली माझी अवस्था ल्यूसीच्या कानावर तर गेली नाही ना?''

''नाही! मुळीच नाही!''

लॉरीचे हे उद्गार ऐकून डॉक्टरांच्या मनावरील दडपण खूपच कमी झालेले दिसले. लॉरी पुन्हा कळकळीने म्हणाला, ''डॉक्टर, मध्यंतरी आपली जी चमत्कारिक अवस्था झाली, ती पुन्हा तर होणार नाही ना? तशी झालीच तर त्यावर उपचार तरी काय करायचा हे मला कळलं, तर फार बरं होईल, नाही का?''

''मला वाटतं, होऊ घातलेल्या त्रासाची भीती मनात सारखी डाचत राहाते आणि मग एखाद्या दिवशी तसला प्रकार घडतो खरा.''

''पण आपल्याला वाटणाऱ्या चिंतेत जर कुणी भागीदारी पत्करली, तर तिची तीव्रता काहीशी कमी होऊ शकेल का?''

''एरव्ही ते शक्य आहे, पण माझ्या बाबतीत मात्र ते आता अशक्य आहे, कारण माझ्या तुरुंगवासातील हालअपेष्टांचं दु:ख कुणीच हलकं करू शकणार नाही. त्याच्या नुसत्या आठवणीनेही माझं मन भीतीग्रस्त होतं नि माझ्या मनाचा तोल सुटून काहीतरी चमत्कारिक घडतं. पुढील आयुष्यात तसं घडणारच नाही, असं कुणी सांगावं?''

थोड्या वेळाने डॉक्टर पुन्हा म्हणाले, ''भविष्यकाळाबद्दल मी तसा आशावादी आहे. स्मृतिभ्रंशाच्या झटक्यातून ज्या अर्थी मी लवकरच मुक्त झालो, त्या अर्थी आता माझ्या जीवनात असा प्रसंग येणार नाही, असं वाटू लागलं आहे.''

''छान! फारच छान!'' लॉरी अत्यानंदाने जवळजवळ ओरडलाच. ''लॉरी, तुमच्या या आस्थेबद्दल मी तुमचे किती आभार मानू?'' डॉक्टर पुटपुटले.

मग लॉरीने हळूहळू, डॉक्टर बिचकणार नाहीत अशा बेताने, त्यांच्या चर्मविद्येचा विषय काढला आणि म्हटले, ''मला वाटतं, ही तुमची चर्मविद्येची साधनं एकदा दूर केली, म्हणजे तुमच्या मनात उठणारं ते भयंकर विचारांचं वादळ शांत झाल्याशिवाय राहणार नाही!''

डॉक्टर मॅनेट किंचित् अस्वस्थ होऊन म्हणाले, ''या गोष्टीचा उलगडा करणं मोठं कठीण काम आहे. जोडे शिवायच्या या छंदाने मला एकेकाळी मोठंच समाधान दिलं आहे आणि पुन्हा या छंदाची गरज पडेल की काय, अशी मला भीती वाटते.''

''पण ही साधनंच दृष्टिआड केली, तर ती भीती नाहीशी व्हायची शक्यता आहे!''

मग बराच वेळ शांतता पसरली. कोणी काहीच बोलले नाही. नंतर डॉक्टर म्हणाले, ''ही साधनं म्हणजे माझे जुने सहकारी आहेत.'' त्यांच्या आवाजात कंप होता. पण तिकडे दुर्लक्ष करून लॉरी दृढ आवाजात म्हणाला, ''पण ती साधनं जवळ ठेवावीत असं मला वाटत नाही. त्यातून काही चांगलं निर्माण होईलसं दिसत नाही. निदान ल्यूसीसाठी तरी आपण त्यांचा त्याग करावा.'' काही काळ डॉक्टरांच्या मनात वादळ उठल्याप्रमाणे झाले; पण शेवटी लॉरीच्या भिडेखातर त्यांनी त्या गोष्टीस संमती दिली.

ल्यूसीला व तिच्या पतीला भेटण्यासाठी डॉक्टर

जातील, त्यावेळी या गोष्टीचा निकाल लावावा, असे लॉरीने ठरविले. पुढे एके रात्री लॉरीने किंचित् अपराधी मनाने त्या बाकड्यासुद्धा सर्व साधनांचा निकाल लावला. प्रासबाई मेणबत्तीच्या प्रकाशात हा प्रकार पाहात होती. जणू काही एखाद्या अंधाऱ्या रात्री आपण एखादे दुष्कृत्य करीत आहोत, परंतु ते कोणाच्या तरी भल्यासाठी करीत आहोत, अशी त्यांची दृढ भावना होती.

●●●

## १०. वादळाची लक्षणे

काही दिवसांनी ल्यूसी आणि तिचा पती चार्लस् आपला आराम प्रवास संपवून घरी परत आली. त्यांचे अभीष्टचिंतन करायला सगळ्यांच्या अगोदर सिडने कार्टन हजर झाला. त्याच्या वागण्यात वा रंगरूपात कोणताच बदल झालेला दिसत नव्हता. पण त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा रांगडा जिव्हाळा नव्यानेच दिसू लागला होता. त्याने डार्नेला जरा बाजूला बोलावून घेऊन अगदी हलक्या आवाजात म्हटले, ''डार्ने, आपण आता मित्र झालं पाहिजे. बरं का!''

''आपण मित्र आहोतच की!''

''मला नुसती भाषेची मखलाशी नको आहे. मला खरोखरच तुमचा मित्र बनायचंय्. तुम्हाला आठवतं? त्या दिवशी मी नेहमीपेक्षा खूपच अधिक प्यायलो होतो.''

''होय, मला चांगलंच आठवतं. त्यावेळी तुमच्या आग्रहाखातर मी तुम्हाला 'तुम्ही दारुडे आहात!' असं म्हटलं होतं.''

''असं म्हणवून घ्यायचे प्रसंग माझ्यावर नेहमीच येतात. पण तुम्ही मात्र आता ते सर्व विसरून जावेत. त्यावेळी तुम्ही कदाचित् माझ्यावर खूपच रागावले असाल, पण आता ती भावना राहू नये, अशी माझी इच्छा आहे.''

''मी तर ते सारे केव्हाच विसरून गेलोय.!''

''झाली पुन्हा तुमची मखलाशी सुरू. मला तर असली गोष्ट कधीच विसरता येणार नाही. तुमच्या या उडवा-उडवीच्या उत्तराने तर नक्कीच नाही.''

''माझं बोलणं तुम्हाला उडवा-उडवीचं वाटत असेल, तर मी क्षमा मागतो! त्या दिवशी तुम्ही माझ्यासाठी काय करायचं ठेवलंत? आणि ते कसं बरं मी विसरू?''

''जाऊद्यात त्या जुन्या गोष्टी. मी कधीच काही चांगलं न केलेला, न करणारा असा हलकट माणूस आहे, हे काय आपण जाणत नाही? अशा माणसाने वेळी-अवेळी आपल्याकडे हक्काने यावं हे कदाचित् तुम्हाला रुचणारही नाही. पण माझं आगमन तुम्हाला दु:सह होत नाही, एवढं जरी कळलं, तरी त्यात मला आनंद आहे!''

''मग तुम्ही वारंवार येऊन तर पहा!''

''म्हणजे माझ्या म्हणण्याला तुमचा दुजोरा आहे तर?'' कार्टन हसून म्हणाला. नंतर त्याने प्रेमभराने डार्नेशी हस्तांदोलन केले व तो एकदम तेथून निघून गेला.

त्या दिवशी संध्याकाळी बैठकीत कार्टनबद्दल बोलणे निघाले असता डार्ने सहज म्हणाला, ''सिडने कार्टन हा निष्काळजीपणाचा आणि बेदरकार जीवनाचा एक उत्कृष्ट नमुना आहे. तो बोलतो, दिसतो, तसा अंत:करणशून्य प्राणी मात्र मुळीच नाही!''

हा विषय ल्यूसीच्याही मनात घोळत असेल, याची त्याला मुळीच कल्पना नव्हती, पण रात्री ज्यावेळी ल्यूसीची आणि त्याची कार्टनबद्दल चर्चा झाली, त्यावेळी ती म्हणाली, ''लोक त्याच्याबद्दल काहीही बोलोत, मला तर तो अंत:करणाने मोठा मृदू व उमदा माणूस वाटतो.'' पुढे ती डार्नेला उद्देशून म्हणाली, ''आपणही त्याच्याशी सौजन्याने नि सहृदयतेने वागलं पाहिजे. त्याचे काही दोष आहेत, उणिवा आहेत, पण त्यासाठी त्याच्याशी

कठोरपणाने, तुसडेपणाने वागायचं काहीच कारण दिसत नाही. त्याच्या मनाचे काही चांगले पैलूही आहेत. सद्भावना आहे. काही भव्यदिव्य करून दाखवण्याचं सामर्थ्य आहे.''

''ल्यूसी, तुझा काहीतरी गैरसमज झालाय. कार्टनबद्दल तुला जे वाटतं, त्याहून काकणभर अधिक मला वाटतं! त्याला दुखावणं माझ्या हातून कदापि होणार नाही! आपण अत्यंत सुखी आहोत, पण तो दुर्दैवी आहे! नाही तर त्याच्या चांगुलपणाला तोड नाही. मला त्याच्याबद्दल सदैव आदरभावच आहे ल्यूसी!'' डार्ने उद्गारला.

डॉक्टरांच्या त्या शांत, निवांत निवासस्थानात सर्वांचे दिवस मोठ्या सुखासमाधानात जात होते. वर्षांमागून वर्षे चालली होती. डार्नेची भरभराट होत होती. तो आनंदात होता. डॉक्टरांची चलती होती. प्रासबाईला आणखी एक छोटी ल्यूसी सांभाळायला मिळाल्याने ती खुशीत होती. हे सारे कुटुंब जणू सुवर्णाच्या एका सुंदर व नाजूक धाग्याने एकत्र पटवले गेले होते. डार्ने वारंवार ल्यूसीला म्हणे, ''या साऱ्या मंडळींना असं एकत्र गुंतवून ठेवणारी कोणती जादू तुझ्याकडे आहे, ते कळत नाही.''

क्वचित प्रसंगी कार्टनची पावले तिकडे वळत. तो कधीतरी सटीसहामाही संध्याकाळचा येई. निवांतपणे गप्पागोष्टी करीत बसे. पण तेथे येताना मद्यप्राशन न करण्याची दक्षता त्याने घेतलेली असे. ल्यूसीची मुलगी कार्टनची विशेष लाडकी झाली होती. ती चिमुकली पोर तो येताच अत्यानंदाने त्याच्याकडे झेप घेई.

लवकरच होणाऱ्या एका प्रचंड नि भयानक वादळाची लक्षणे दूरवर दिसू लागली होती, त्याची या बिचाऱ्यांना काहीच जाणीव नव्हती. त्या वादळाचा तडाखा या सुखी निष्पाप कुटुंबाला बसेल, याची स्वप्नातही कल्पना येणे शक्य नव्हते.

छोट्या ल्यूसीचा सहावा वाढदिवस आला, त्या सुमारास फ्रान्समध्ये असंतोषाचा वणवा झंझावाती वेगाने पसरू लागला होता. फ्रान्समध्ये उठलेल्या या वादळाचे ध्वनी-प्रतीध्वनी या कुटुंबातही उमटू लागले.

१७८९ च्या जुलै महिन्यातील एका रात्री उशीरा लॉरी टेलसन् बँकेतून घरी आला, तो थेट ल्यूसी आणि डार्ने यांच्याजवळ जाऊन बसला. दिवस भलताच उकाड्याचा होता. ''मला वाटतं आज सारी रात्र बँकेत बसून काढावी लागणार!'' लॉरी म्हणाला.

'' का बरं?'' डार्नेने विचारले.

''पॅरिस शहरी कमालीची अस्वस्थता माजली आहे. तिथल्या आमच्या खातेदारांना, आपल्या मालमत्तेची सुरक्षितता वाटत नाही, त्यामुळे ते ती सारी हलवायच्या नादात आहेत.''

''हे जरा गंभीर प्रकरणच दिसतंय्!''

''त्यात शंकाच नाही. पण डॉक्टर मॅनेट कुठे आहेत?''

''मी तर इथेच आहे!'' खोलीत प्रवेश करता करता डॉक्टर मॅनेट म्हणाले.

''तुम्ही घरी आहात हे पाहून मला हायसं वाटलं. माझा आजचा सर्व दिवस चिंतेत काळजीत गेला आहे. पण आता आपण कुठे बाहेर तर जाणार नाही ना?''

''नाही! मुळीच नाही, मी घरीच राहणार आहे!''

''छान! पण हे काय? ल्यूसी एवढ्यात कुठे गेली? ती व तिची मुलगी दोघीही झोपल्या की काय?''

''होय! दोघीही आताच अगदी आरामात झोपी गेल्या आहेत.''

''ठीक, ठीक. मग आपण आता जरा शांतपणे बोलत बसू. फ्रान्स देशात काय घडतंय् याची तुम्हाला पुसट कल्पना आहे का? फ्रान्स देशात भयानक वादळ उठलं आहे नि त्याचा तडाखा कुणाला नि केव्हा बसेल, याचा काहीच नेम राहिलेला नाही.'' लॉरी चिंतातूरपणे उद्गारला.

डार्ने आणि डॉक्टर मॅनेट दोघेही दिङ्मूढ होऊन, कान टवकारून ऐकत होते. फ्रान्स देशात राजकीय वादळ धुमसत होते. स्फोट केव्हा होईल याचा नेम नव्हता.

लॉरीच्या बोलण्याने त्याचा उलगडा झाला. वादळ चालू झाले होते. त्यातून कोण सुटतात, कोण वाचतात, एवढाच प्रश्न शिल्लक होता.

●●●

## ११.पॅरिस गाठण्याचा निश्चय

पॅरिस नगरीच्या सेंट अँतोन विभागात आज एकच दंगल उसळली होती. जिवंत बुजगावण्यांप्रमाणे दिसणारी तेथील कंगाल. कळाखाऊ माणसे, हजारोंनी रस्त्यारस्त्यांतून गोळा झाली होती. आरडाओरड करीत होती. त्यांच्या हातात हरतऱ्हेची हत्यारे दिसत होती. भाले, कुऱ्हाडी, बंदुका, तलवारी, लाठ्या, दगडधोंडे, जे मिळेल ते हत्यार आज त्यांनी हाती घेतले होते. सगळ्या हत्यारांचा मनसोक्त वापर करायची आज त्यांची तयारी झाली होती. हत्यारे कोठून आली? कशी आली? कोणी आणून दिली? काही कळायला मार्ग नव्हता. पण मरावे अगर मारावे हा  निश्चय मात्र प्रत्येकाच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होता.

या सर्व धमाल गर्दीच्या मध्यभागी उभा राहून हत्यार वाटपाचे काम गुत्तेवाला दफार्ज करीत होता. ''जॅक्विस क्रमांक तीन, माझ्याजवळ उभा राहा; जॅक्विस क्रमांक एक व दोन, तुम्ही देशभक्तांच्या मोर्चाचं नेतृत्व करा!'' दफार्ज ओरडून म्हणाला; नंतर त्याने विचारले, ''माझी पत्नी कुठे आहे?''

''मी तर इथेच आहे. अगदीच कसं लक्ष नाही तुमचं?'' दफार्जबाई अगदी शांतपणे म्हणाली. आज तिच्या हातात वीणकाम दिसत नव्हते. तिच्या उजव्या हातात कुऱ्हाड होती, तर डाव्या हातात भयानक सुरा होता. ''आत्ता मी तुमच्याबरोबर येते, पण नंतर मात्र स्त्रियांच्या मोर्चाचं नेतृत्व करीन!'' ती ओरडली.

''मग चल तर!'' दफार्ज गुरगुरला,. नंतर त्याने गर्जना केली, ''लोकहो! तय्यार! सरळ सरळ बॅस्टील तुरुंगावर धडक मारूया!'

भयंकर गर्जना करीत फ्रान्समधला तो खवळलेला जनसागर बॅस्टील तुरुंगाच्या दिशेने धावला. बॅस्टील तुरुंगाभोवतालचे खोल खंदक त्यांनी अनेक युक्त्याप्रयुक्त्यांनी पार केले. प्रेतांचा खच पडत होता. तोफा बंदुकांच्या धुमधडाक्याने सारे आसमंत दणाणून गेले होते. धुराने वातावरण झाकळून गेले होते. दफार्ज सारखा गर्जत होता, ''चला! घुसा पुढे!'' त्याची बायको ओरडत होती, ''बायांनो या इकडे! पुरुषांच्या बरोबरीने आपणही कत्तल करू शकतो, हे दाखवून देऊया! आणि मग भुकेने, सूड भावनेने चवताळलेला तो असंख्य स्त्रियांचा घोळका दफार्जबाईच्या मागोमाग बॅस्टील तुरुंगावर तुटून पडला.

अवघ्या दोनच तासांच्या चकमकीनंतर बॅस्टीलचा किल्लावजा तुरुंग क्रांतिवाद्यांनी हस्तगत केला. लोकांचा अथांग जमाव आत घुसला. तुरुंगाचा कानाकोपरा धुंडाळून त्यांनी राजकीय बंद्यांची मुक्तता केली. कैदी, कागदपत्रे, गुप्त कोठड्या, तळघरे या सर्वांची सर्रास झडती चालू झाली. या इमारतींची आजपर्यंतची दहशत जनतेने धुळीला मिळविली होती. ''कैदी! कैदी!!'' एकच आरडाओरडा चालू होता. एवढ्यात दफार्जचे लक्ष एका पहारेवाल्याकडे गेले. तत्काळ त्याच्यावर झडप घालून, त्याची मानगूट पकडीत तो म्हणाला, ''बोल! उत्तर मनोरा म्हणजे काय? कुठे आहे तो?''

''दाखवतो! पण शपथेवर सांगतो की, तिथे आता कुणी कैदी नाही!''

'''एकशे पाच उत्तर मनोरा' याचा अर्थ काय?''

''ती एक कैदी ठेवायची कोठडी आहे!''

''चल, दाखव मला ती!''

दफार्ज त्या माणसामागून चालला. अनेक कोठड्या ओलांडीत ते चालले होते. त्या कोठड्या म्हणजे अंधारी गुहाच होत्या. त्यांमध्ये सूर्यप्रकाशाने कधीच प्रवेश केला नसावा. शेवटी पहारेवाला एका कोठडीपाशी येऊन उभा राहिला. त्याने कोठडीचे प्रचंड कुलूप काढून तिचा लहानसा दरवाजा उघडला. त्या उभयतांना खाली वाकूनच आत प्रवेश करावा लागला. आत मशाल दाखविल्याशिवाय काही दिसणे शक्यच नव्हते. दफार्जने मशाल आणविली व तिच्या प्रकाशात खोलीची कसून तपासणी केली. एके ठिकाणी आपली नजर बारकाईने रोखून त्याने भिंतीवर खरडलेला मजकूर वाचला -'अलेक्झांडर मॅनेट -गरीब बिचारा डॉक्टर!' त्याने तिथल्याच एका गजाने त्या टेबल, खुर्ची वगैरे साहित्याचा विध्वंस केला. सर्वत्र ठोकाठोकी करून,

कसून तपासणी चालू केली. त्याच्या पाठोपाठ आलेल्या जॅक्सि क्रमांक तीनने आपल्या प्रचंड सुऱ्याने कोठे काही सापडते का हे पाहण्यासाठी खोदाखोद चालू केली. एके ठिकाणी चुन्याचा एक ढलप ढासळून आत पोकळी तयार झाली. दफार्जने आपला हात त्या पोकळीत घालून चाचपडून पाहिले, पण त्यात गवताच्या काड्यांखेरीज काहीच सापडले नाही. नंतर सर्वजण त्या कोठडीतून बाहेर पडले.

बाहेर दंगलखोरांनी एकच धुमाकूळ घातला होता. दफार्जने तुरुंगाधिकाऱ्याला खेचून, नगरचौकात नेऊन, त्याची जाहीर चौकशी करण्याची कल्पना काढली. अनेक गोरगरीब लोकांवर गोळीबार करून, त्यांना ठार मारल्याबद्दल, त्याची जाहीर चौकशी होणे आवश्यक होते. लोकांनी त्या म्हाताऱ्या तुरुंगाधिकाऱ्याला बाहेर खेचले. त्याच्यावर लाथाबुक्क्या, टपला यांचा एकच भडिमार केला. त्याला जवळ जवळ ठोकरीतच त्यांनी त्याची नगरचौकाकडे धिंड काढली. पण म्हातारा तेथपर्यंत पोचू शकला नाही. असह्य अपमान व मारहाण यांनी बेजार होऊन त्याने वाटेतच प्राण सोडला. तत्काळ दफार्जबाई पुढे आली. तिने आपल्या प्रचंड सुऱ्याने त्याचे मस्तक धडावेगळे केले. एका काठीच्या टोकावर ते मस्तक नाचवीत त्यांनी शहरभर हैदोस घातला.

बॅस्टीलमधून मुक्त झालेले कैदी या हैदोस धुल्ल्यात मोठ्या हिरीरीने सामील झाले होते. फ्रान्सच्या जुलमी राजाने लोकांच्या अंगावर भीतीने काटा उभा करण्यासाठी निर्माण केलेली बॅस्टील तुरुंगाची प्रचंड यंत्रणा आज कोलमडून पडली होती. तो प्रचंड तुरुंग आज ढासळला होता. त्याची अवजड कड्या कुलपे पॅरिसच्या रस्त्यात धूळ खात पडली होती. ते करडे तुरुंगाधिकारी, पहारेकरी गोगलगाय बनून गेले होते. जनतेच्या पायाखाली चिरडले भरडले जात होते. आज पॅरिसच्या नागरिकांना सत्तेची व रक्ताची चटक लागली होती. अद्यापि त्यांच्या पोटात भूक होती. त्यांचे कपडेलत्ते फाटून चिंध्या झालेले होते, वरचा देखावा तोच होता, आतला माणूसही तोच होता, पण आज मन बदलले होते. आजपर्यंत निरुद्योगी राहिलेले हात, ते रोडके हात, आपण तडाखा देऊ शकतो, या जाणिवेने वळवळू लागले होते. बॅस्टीलच्या पाडावानंतर एकच आठवडा गेला असेल नसेल, पण त्याने जनतेच्या परिवर्तनात मोठीच भर टाकली होती. जनतेत झालेला हा बदल दफार्जबाई मोठ्या आनंदाने, उत्साहाने पाहात होती.

तिच्या मुद्रेवरील मूळची कठोरता दिवसेंदिवस अधिकच उग्र स्वरूप धारण करू लागली होती. तिच्याच शेजारी आज एक गिड्डी पण जाडजूड बाई बसली होती. तिच्या भयानक कृत्यामुळे तिला सर्वत्र 'सूडबया' या नावानेच ओळखीत होते.

''ऐका! कुणीतरी येतंय!'' सूडबया म्हणाली, ''दफार्जच येतोय. गप्प बसा!'' दफार्ज बाई म्हणाली.

दफार्ज घाईघाईने धापा टाकीतच तेथे आला. त्याने हुकूम सोडला, ''आपला तो जुना शत्रू, तो थेरडा मंत्री शहरात आला आहे. सर्वजण त्याच्या मागावर राहा!'' तत्काळ दफार्जबाईने आपला सुरा कमरपट्ट्यात लटकावला. 'सूडबया' भयानक आरडाओरडा करीत, घराघरातील बायकांना बाहेर पडण्यासाठी पाचारण करू लागली.

मग त्या बायांनी म्हाताऱ्या मंत्र्याची अगदी ससेहोलपट करून टाकली. पिसाळलेल्या लांडग्या मोकाट सुटाव्यात, त्याप्रमाणे त्यांनी पॅरिस शहराची गल्ली न् गल्ली पिंजून पिंजून काढली. त्या मंत्र्याच्या जावयाला त्यांनी त्याच्या निवासस्थानातून खेचून बाहेर काढले. त्याचे शिर धडावेगळे केले आणि ते काठीवर टोचून साऱ्या शहरभर नाचविले. शहरात अंधारगुडूप होईपर्यंत हा सारा धुडगूस चालू होता.

भुकेने कासावीस होऊन, घरोघरी आक्रोश करणाऱ्या मुला-बाळांचे भानही या बायांना राहिले नव्हते. त्यांना खून चढल्याप्रमाणे झाले होते. रक्ताची रंगपंचमी खेळण्यात ही माणसे इतकी दंग झाली होती, की त्यांना कशाचेच भान राहिले नव्हते. रात्री त्यांना मुला-बाळांची, जेवणाखाणाची शुद्ध आली.

दफार्जने आपल्या शेवटल्या गिऱ्हाइकाला मद्याचा प्याला भरून दिला. तेव्हा जवळ जवळ उजाडले होते. मग गुत्त्याचे दरवाजे बंद करता करता दफार्ज आपल्या बायकोला म्हणाला, ''शेवटी एकदा आपल्या विजयाचा दिवस उजाडला म्हणायचा!''

''होय!'' त्याची बायको मोठ्या समाधानाने म्हणाली.

पॅरिस शहरात उसळलेले वादळ हळू हळू, क्रमाक्रमाने फ्रान्सच्या ग्रामीण भागालाही ग्रासू लागले. भयानक, दहशतवादी कृत्यांनी धुंद झालेली माणसे पॅरिसमधील घटनांची रसभरित वर्णने करीत ग्रामीण भागात संचार करू लागली होती. सरदारसाहेबांच्या त्या खेड्यातील रस्ता-मजूराला असाच एक अवलिया भेटला व म्हणाला, ''काय जॅक्सि, कसं काय चाललं आहे?''

''उत्तम! जॅक्सि!''

''उत्तम! किती दिवस उपाशी आहेस?''

''अगदीच उपाशी नाही. जेमतेम एक वेळची न्याहरी मिळते!'' भुकेलेला मजूर म्हणाला.

''सध्या सगळ्यांनाच एक वेळच्या न्याहरीवर भागवावं लागतंय. पोटभर जेवण कुणालाच मिळत नाही. सध्याचा हा न्यायच झाला आहे भाई!'' नंतर त्याने एक मळकट, चिलीमवजा नळकांडे बाहेर काढले व त्यात काहीतरी टाकून ते शिलगावले. भऽक्कन धुराचा एकच भपकारा बाहेर आला आणि मग तत्काळ उभयतांनी खो खो हसतच हस्तांदोलन केले. दोघांनाही अंतरीची खूण पटली असावी.

''मग काय, आज रात्री?'' मजूराने विचारले.

''आजच रात्री!'' ते चिलीमवजा नळकांडे तोंडात धरीत तो माणूस म्हणाला. त्याने मग तेथेच एका झाडाखाली ताणून दिली आणि मजूर आपल्या कामाला लागला.

सूर्यास्ताच्या सुमारास मजूर घरी जायला निघाला, तेव्हा त्याने जाता जाता त्या माणसास जागे केले. शेताशेतातून वाट काढीत तो माणूस कोणीकडे तरी पांगला; दिसेनासा झाला.

रस्तामजूर दिवस बुडता बुडता घरी गेला, पण जाताना तो वाटेत भेटणाऱ्या खेड्यातील प्रत्येक माणसाच्या कानाला लागत होता, कुजबुजत होता. खेड्यातील प्रत्येकाने आपले रात्रीचे दरिद्री खाणे आटोपले, तरी झोपी जाण्याची तयारी मात्र कोणीच केली नाही. जो तो जागा होता. घराबाहेर पडून किल्ल्याकडे पाहात उभा होता. गॅबेल, करवसुली अधिकारी, तो तबलेवाला, अशी सरदारांच्या आश्रयाची खास माणसे मात्र चांगलीच अस्वस्थ झाल्याचे दिसत होते. रात्र गहिरी होत चालली. सोसाट्याचा वारा घोंघावू लागला. एखादा प्रचंड काळाकभिन्न ढग उठावा, त्याप्रमाणे त्या काळोख्या रात्री तो किल्ला भासत होता. नंतर एकाएकी तो काळोख जणू फाडीत एक प्रकाश शलाका उफाळलेली दिसली. अल्पावधीतच किल्ल्याच्या दारा-खिडक्यांत लाल भडक ज्वाला उफाळताना दिसू लागल्या. अग्निनारायणाने हां हां म्हणता रौद्रस्वरूप धारण केले व त्याच्या धडाडत्या ज्वाळांत किल्ल्याची वास्तू भस्मसात होऊ लागली.

सरदारसाहेबांच्या मृत्यूनंतर किल्ल्यात जे थोडेफार लोक उरले होते, त्यांनी घोडेस्वार होऊन, जीव घेऊन, खेड्याच्या दिशेने पळ काढला. ''मदत करा! आम्हाला कोणीतरी मदत करा!'' असा त्यांचा दीनवाणा आक्रोश सारखा चालू होता, पण त्यांना मदत करायचे तर दूरच, उलट त्यांच्याविरुद्ध चिथावणी मात्र दिली जात होती.

खेड्यातील प्रत्येक माणूस, कसलीही हालचाल न करता, त्या अग्निप्रलयाकडे निर्विकारपणे पाहात होता. किल्ल्यातून घोडदौड करीत बाहेर पडलेला एक माणूस, गावातील तुरुंगापाशी येऊन धडकला. तेथे काही शिपाई उभे होते. पण कोणीही त्याच्याशीच काय, आपसांतही बोलेनात. हा डोंब वाजवी आहे, असेच प्रत्येकाचा चेहरा सांगत होता. त्या अग्निज्वाळा उफाळताना पाहून खेडूत मात्र चवताळले. पोटातील भुकेच्या आगीबरोबर प्रार्थनामंदिरातील घंटेचा अवेळी होणारा पण सूचक घणघणाट ऐकून, त्यांना आणखी चेव चढला. शिपायांचा थंडपणा जुनी सत्ता कोलमडल्याचे जणू जाहीर करीत होता. खवळलेले खेडूत करवसुली अधिकारी गॅबेल याच्या घरावर चालून गेले.

ते पाहून गडबडलेला गॅबेल धडपडतच घरात शिरला व त्याने दरवाजा घट्ट बंद करून घेऊन, छपराच्या वाशाचा आश्रय केला. लोकांनी दरवाजा मोडून आत प्रवेश केलाच, तर त्यांच्या माथ्यावर झेप घेऊन एकदोघांचा तरी बळी घ्यायचाच, असा त्याचा निश्चय होता. या साहसात आपला मात्र बळी पडेल, हे त्याने गृहीत धरले होतेच.

ती काळरात्र कशीबशी उलटली. उजाडताच रात्रभर दबा धरून बसलेले खेडूत पांगले. रात्रभर वाशावर बसून

ताटकळलेल्या गॅबेलच्याही जिवात जीव आला, पण त्याच्यासारखे दुसरे कित्येक लोक मात्र दुर्दैवी ठरले. रात्रीच अनेकांचे मुडदे पडले. खेडोपाडी असलेले मोजके रक्षक दल अपुरे पडले, अगर दंगलखोरांना सामील तरी झाले; त्यामुळे ग्रामीण सत्तास्थाने हां हां म्हणता ढासळली. सत्तेने माजलेली माणसे खवळलेल्या जनतेने चिरडून टाकली. क्रांतीचा वणवा भडकतच चालला होता. पूर्वी सत्तास्थानांवर असलेल्या कोणाचीच गय करायची, कोणालाच दयामाया दाखवायची, जनतेची तयारी नव्हती. आख्खा फ्रान्स देश दशदिशांनी पेटला होता. अराजक माजून आता जवळ जवळ तीन वर्षांचा काळ लोटला होता. पण हे पेटलेले राष्ट्र विझण्याचे कोणतेच चिन्ह दिसेना.

डॉक्टर मॅनेट यांच्या लंडनमधील निवासस्थानी या कल्लोळाचे ध्वनी-प्रतिध्वनी वारंवार उठत. काय अघटित जादू झाली होती, कोण जाणे, पण फ्रान्समधील झाडून सारे नागरिक जणू हिंस्र पशूंत रूपांतर झाल्यासारखे वागत होते. जुन्या राजवटीतले सारे दरबारी पळून गेले होते. खुद्द राजा-राणी आपल्याच प्रासादात कैद होऊन पडली होती. राजसत्ता केव्हाच संपुष्टात आली होती. मोठमोठे सरदार-सरंजामदार परागंदा झाले होते. परराष्ट्र वकिलांनी तर केव्हाच आपापला गाशा गुंडाळला होता.

लंडनमधील टेलसन् बँक ही फ्रेंच निर्वासितांचे एक महत्वाचे आश्रयस्थान बनली होती. फ्रान्समध्ये घडणाऱ्या घटनांची सविस्तर व विश्वसनीय बातमी फक्त टेलसन् बँकेतच मिळू शके. जुन्या ठेवीदारांना मदत करणे आपले कर्तव्य आहे, अशी या बँकेची धारणा असल्याने, फ्रान्समध्ये कफल्लक बनून भुकेकंगाल झालेली कित्येक बडी बडी धेंडे आज येथे आश्रयाला आली होती. फ्रान्समधल्या वावटळीची ज्यांना साधारण पूर्वकल्पना आली होती, त्यांनी आपली सर्व मालमत्ता व चीजवस्तू टेलसन् बँकेच्या लंडन शाखेत आणून टाकली होती आणि यामुळेच टेलसन् बँक ही फ्रेंच निर्वासितांचा एक अड्डाच बनून गेली होती.

एके दिवशी दुपारी लॉरी बँकेत आपल्या टेबलाशी बसला होता. डार्ने त्याच्या टेबलावर ओणवा होऊन त्याच्याशी हळूहळू काही बोलण्यात गढला होता. ''तुम्हाला म्हातारा कोण म्हणेल? तुमची धडाडी तर तरुणालाही लाजवणारी आहे!'' तो लॉरीला म्हणत होता, ''आणि म्हणून तर मी...''

''आणि म्हणूनच तर मी बँकेच्या कामासाठी पॅरिसला जायची तयारी दर्शवली आहे!'' हसत हसत लॉरी मध्येच म्हणाला.

''रस्ते खराब, सध्याचं एकंदर वातावरण खराब, शहरात सर्वत्र अंदाधुंदी, अशा परिस्थितीत आपण ही भलतीच जबाबदारी जाणून-बुजून का पत्करीत आहात?''

''माझ्यासारख्या ऐंशीच्या घरात आलेल्या म्हाताऱ्याला तिथे कोण काय करणार आहे?''

''एका काळी पॅरिस म्हणजे अगदी सुरक्षित शहर होतं, पण आज मात्र सारंच असुरक्षित, अस्थिर आहे, असं दिसतं.''

''पण बँकेला आज अनुभवी व विश्वासू माणूस तिथे पाठवणं आवश्यक वाटतं, मग माझ्याशिवाय दुसरा कोण जाणार? इतका दीर्घ काळ नोकरी केल्यानंतर टेलसन्साठी काही तसदी घ्यायचा प्रसंग आल्यास ती घेणं आवश्यक आहे, नव्हे भाग आहे!''

डार्ने काहीसा अस्वस्थ होऊन म्हणाला, ''मग मीसुद्धा तुमच्याबरोबर यावं म्हणतो!''

''तू जन्माने, वारशाने फ्रेंच असल्यामुळे अशा प्रसंगी तिथे जाणं मूर्खपणाचं ठरेल. फ्रेंच लोकसत्तेने परागंदा नागरिकांविरुद्ध काही कायदे केल्याची वदंता आहे. त्यामुळे तू गोत्यात येशील. मी इंग्रज, बँकेचा नोकर, माझी गोष्ट निराळी आहे!'' लॉरी समजावणीच्या स्वरात म्हणाला.

''मी फ्रेंच आहे, म्हणूनच तर माझ्या मनात फ्रान्सला जायचे विचार सारखे घोळतात. तेथील गरीब जनतेबद्दल मला सहानुभूती आहे. त्या लोकांना भूतदया बाळगण्याबद्दल काही सांगावं, शिकवावं अशी माझी मनापासून इच्छा आहे. पण अद्यापि ते घडत मात्र नाही!'' डार्ने स्मित करीत म्हणाला.

''तेच ठीक आहे. तिथे येणाऱ्या अडचणी नि धोके यांची तुला कल्पना नाही. मला जाणं भाग आहे, कारण आमची काही महत्वाची कागदपत्रे जर कुणाच्या हाती लागली, तर बऱ्याच लोकांना धोका पोचायचा संभव

आहे.''

''मला या तुमच्या धडाडीचं मोठं कौतुक वाटतं; पण तुम्ही एकटेच जाणार की आणखी कुणाला बरोबर घेऊन जाणार?''

''मी माझ्याबरोबर बहुतेक जेरी क्रंचरला घेऊन जाईन. कारण गेली कित्येक वर्षं तो माझा शरीररक्षक म्हणून वावरत आहे. तो मोठा इमानी आहे आणि फ्रान्समध्ये त्याचा संशयही कुणी घेणार नाही!''

लॉरी पूर्वी टपालगाडीने ज्यावेळी लंडनहून डोव्हरला गेला, त्यावेळी त्याच्याकडे निरोप घेऊन आलेला दूत जेरी तो हाच होय.

फ्रेंच सरदार-सरंजामदारांची बँकेतील ये-जा अद्यापि चालू होती. त्यांच्या वर्दळीतच डार्ने व लॉरी यांचे हे संभाषण चालू होते. त्या वर्दळीतला प्रत्येक माणूस लंडनमधील टेलसन् बँकेच्या सुरक्षित आवारात वावरताना, फ्रेंच क्रांतिकारकांचा नायनाट करण्याच्या बढाया तावातावाने मारीत होता. या पोकळ व बाष्कळ वल्गना करणाऱ्या प्रतिष्ठितांनाही काही सुनवावे, असा मोह डार्नेला होत होता, पण त्याने तो मोठ्या कष्टाने आवरला होता.

या लोकांची ही वटवट ऐकण्यापेक्षा बँकेतून बाहेर पडलेले बरे अशा विचारात डार्ने असतानाच लॉरीच्या पुढे टेबलावर पडलेल्या एका पत्रावर त्याचे लक्ष गेले. पत्रावर लिहिले होते, 'मार्किस-सेंट, एव्हरमाँद.' पत्रावर 'तातडीचे' असा शेराही होता.

विवाह समारंभाच्या दिवशीच सकाळी, डॉक्टर मॅनेटनी डार्नेला एकांतात अशी सूचना दिली होती, की त्याने आपल्या खऱ्या नावाचा उच्चार वा रहस्यस्फोट कोणापाशीही करू नये. त्यामुळे चार्ल्स् डार्नेचे खरे नाव 'एव्हरमाँद' आहे, हे खुद्द ल्यूसीलाही माहीत नव्हते. लॉरीने ते पत्र बँकेत नेहमी येणाऱ्या-जाणाऱ्या काही फ्रेंच निर्वासितांना दाखविले. त्याबरोबर त्यांची तोंडे चालू झाली. ''हा बहुधा त्या खून झालेल्या सरदाराचा पुतण्या असावा. सरदार मोठा रंगेल, गुलहौशी प्राणी होता, पण हा पुतण्या काही आपल्या पाहाण्यात किंवा ऐकिवात नाही!''

''पुतण्या कसला दळभद्री लेकाचा!'' दुसरा म्हणाला. ''तो स्वत:ला मोठा क्रांतिकारक समजतो. फुकटात मिळालेली चुलत्याची मालमत्ता लोकांना वाटून मोठेपणा मिरवू पाहातोय. पण एकदा का लोकांच्या तावडीत सापडला म्हणजे कळेल त्याला काय ते!''

डार्ने हलक्या आवाजात लॉरीला म्हणाला, ''मला हा माणूस माहीत आहे!'' थोड्याच वेळापूर्वी कडवटपणाने शेरे मारणारा तो फ्रेंच हे ऐकून म्हणाला, ''त्या माणसाशी आपला परिचय असावा, ही मोठ्या दु:खाची गोष्ट आहे.''

आता बँक बंद होण्याची वेळ झाली होती. लॉरी आणि डार्नेच काय ते फक्त बँकेत होते. लॉरीने विचारले, ''या माणसाचा पत्ता तुला माहीत आहे? हे पत्र त्याला तू पोचवशील का?''

''जरूर! तुम्ही इथूनच परस्पर पॅरिसला जाणार का?''

''होय! इथून रात्री आठला निघावं म्हणतो.''

''मी तुम्हाला निरोप द्यायला येईन!'' एवढे बोलून डार्ने बाहेर पडला व अत्यंत अस्वस्थपणे भटकत एका निर्मनुष्य गल्लीत आला. तेथे एके ठिकाणी उभे राहून त्याने ते पत्र वाचले.

ॲबे पॅरिस तुरुंग
महाशय,

गेले कित्येक दिवस माझे जीवित धोक्यात आहे. आता मी येथे पॅरिस शहरी तुरुंगात आहे आणि कदाचित् लवकरच प्राणालाही मुकेन! एका परागंदा सरदाराचा इमानी नोकर म्हणून ही आपत्ती मजवर आली आहे. येथे आपल्या हुकुमाप्रमाणे काम करीत राहिलो. कोणालाही छळले नाही. उलट कुळांना आपल्या सांगण्याप्रमाणे सूटच दिली. आपल्या काकांची नोकरी गेली पण आता सूड उगवला जात आहे. आपण येथे येऊन काही खटपट केलीत, तरच मी वाचण्याची शक्यता आहे, नाहीतर एव्हरमाँद घराण्याची नोकरीच माझा घात करणार आहे. मला मारणे अगर तारणे आता केवळ आपल्या हाती आहे.

आपला दुर्दैवी इमानी नोकर
गॅबेल

पत्र वाचून डार्नेचे मन भलतेच अस्वस्थ झाले. आपल्या जुन्या इमानी नोकरावर संकट आले आहे आणि तेही आपल्या

घराण्याची सेवा बजावल्याबद्दल, या गोष्टीचे त्याला मनस्वी वाईट वाटले. ल्यूसीवरील प्रेम, काकांचा झालेला भीषण खून, काकांच्या किल्ल्याबद्दल व वर्तनाबद्दल त्याला आलेली चीड, यामुळे घाईघाईने त्याने फ्रान्सचा त्याग केला होता. त्याच्या या अचानक प्रयाणामुळे तिथल्या अनेक गोष्टी अपुऱ्याच राहिल्या होत्या. आता काही आवराआवर करावी म्हटले, तरी अशक्यच होते. आता खूपच उशीर झाला होता. परिस्थिती आटोक्याबाहेर गेली होती. त्याच्या मालमत्तेचा संपूर्ण कबजा क्रांतिकारकांनी घेतला होता. त्यामुळे तिची विल्हेवाट लावण्याचा प्रश्नच उरला नव्हता.

तो स्वत: कधीच कोणाशी दुष्टाव्याने वागला नव्हता. किंवा कोणालाच त्याने बंदीत टाकले नव्हते. कोणाकडूनही त्याने सक्तीने खंड वसूल केला नव्हता. स्वत:चा चरितार्थही तो काबाडकष्ट करूनच चालवीत होता. गॅबेलने त्याच्या चुलत्याच्या खुनानंतर त्याच्याच आदेशाप्रमाणे अनेक कुळांना सूट दिली होती. आणि यामुळेच गॅबेलच्या संकटकाळी स्वत:च्या बचावासाठी दूर राहाणे त्याला अजिबात पटेना. त्याने पॅरिस गाठण्याचे ठरविले.

आपला देश नालायक माणसांच्या ताब्यात गेला आहे, याबद्दल त्याला फारच चिंता वाटत होती. त्यांनी आपले दुष्ट हेतु साधण्यासाठी अनेक घालमेली चालू केल्या होत्या. त्यांना अकारण रक्तपातापासून परावृत्त करून दया, क्षमा, शांती धारण करण्यास सांगावे, शिकवावे, असे त्याला अगदी मनापासून वाटत होते. क्रांतीच्या आगीत प्रवेश करून काही चांगले, भव्य, दिव्य निर्माण करावे, काही उदात्त घडवून आणावे, यासाठी फ्रान्सला जाण्याचा बेत त्याने पक्का केला.

ल्यूसी अगर तिचे वडील या दोघांनाही आपल्या या बेताचा थांगपत्ता लागू न देण्याची दक्षता मात्र त्याने घेतली. ल्यूसीला विरह जाणवू नये नि तिच्या पित्याला आपल्या भीषण भूतकाळाची आठवण होऊ नये, हाही एक उद्देश ही गुप्तता राखण्यात होता. बराच वेळ त्याने भटकण्यात घालविला आणि शेवटी लॉरीला निरोप देण्याची वेळ होताच तो टेलसन् बँकेत गेला.

बँकेच्या दारातच एक घोडा-गाडी तयार होती. तिच्या शेजारीच जेरी उभा होता. ''आपण दिलेलं पत्र मी त्या माणसाला पोचतं केलंय.'' डार्ने लॉरीला म्हणाला, ''पॅरिसमधल्या एका माणसाला आपण माझा निरोप सांगणार का?''

''जरूर. पण त्यात काही धोका नसला तर!'' लॉरी उत्तरला.

''नाही. त्यात धोक्याचा काही संबंध नाही. पॅरिसमधील ॲबेच्या तुरुंगात एक इसम कैदेत आहे, त्याचं नाव गॅबेल. त्याला जाऊन सांगायचं, की तुझं पत्र योग्य माणसाला जाऊन मिळालंय् नि तो एक-दोन दिवसांत यायला निघतोय्.''

''छे! हे काम भलतंच अवघड आहे. पण तरीही प्रयत्न करीन!''

त्या उभयतांनी एकमेकांचा निरोप घेतला. त्याच रात्री डार्नेने दोन पत्रे लिहिली. एकात त्याने ल्यूसीला लिहिले, ''मी काही महत्वाच्या कामासाठी पॅरिसला जात आहे. आता तिथे तसा काही धोका उरलेला नाही. काम आटोपताच तातडीने परत येत आहे.'' दुसऱ्यात त्याने डॉक्टर मॅनेटना ल्यूसीची व तिच्या मुलीची काळजी घेण्याबद्दल विनंतीपूर्वक लिहिले होते. अर्थात् पॅरिसच्या मुक्कामात आपली खुशाली वारंवार कळविण्याची हमीही त्याने दिली होती.

प्रत्यक्ष निघेपर्यंत आपले गुपित राखण्यात त्याला कल्पनातीत कष्ट पडले. पत्नीचा व मुलीचा निरोप घेताना तर त्याने असे भासविले, की आपण केवळ काही दिवसांसाठी इंग्लंडमध्येच प्रवासाला जात आहोत.

तो रात्री घरातून बाहेर पडला, तेव्हा सर्वत्र दाट धुके पसरले होते. रस्त्यात कोठे चिटपाखरूही दिसत नव्हते. त्याचे अंत:करण जड व विषण्ण झाले होते. लिहिलेली पत्रे रवाना करण्याची व्यवस्था करून तो घोड्यावर स्वार झाला आणि त्याने डोव्हरच्या दिशेने दौड चालू केली. आपण एका न्याय्य व उदात्त कामासाठी जात आहोत या जाणिवेने त्याच्या मनाला धीर दिला. सर्व प्रेमबंध, मोह झुगारून तो फ्रान्सच्या वाटेला लागला.

●●●

## खंड तिसरा-वादळ

### १३. नवा-कायदा

फ्रान्समधील रहदारीचे प्रमुख रस्ते कित्येक दिवस दुरुस्ती नसल्याने कमालीचे खराब होऊन निरुपयोगी झाले होते. अशा या खडतर मार्गाने डार्नेचा पॅरिसच्या दिशेने प्रवास चालू होता. रस्तोरस्ती लोकांनी अडथळे निर्माण केले होते. आणि रानगट माणसे तांबड्या टोप्या घालून वाटसरूंची एकसारखी अडवणूक करीत होती. प्रश्नांची सरबत्ती करून त्यांना हैराण करून सोडीत होती. या सर्व विघ्नांमुळे डार्नेचा जेथे-तेथे सारखा खोळंबा होऊ लागला. तो जरा पुढे होताच त्याला पुन्हा बोलावून घेत आणि त्याच प्रश्नांची फेरसरबत्ती करीत. या सर्व प्रकारांनी त्याची खात्री झाली, की पुरा फ्रान्स देश म्हणजे एक तुरुंगच बनला असून, दैव जोरावर असले, तरच या कचाट्यातून सुटण्याची काही शक्यता आहे.

पॅरिसपासून दूर असलेल्या एका खेड्यात तो रात्री मुक्कामासाठी असता, त्याला ऐन मध्यरात्रीच लोकांनी बिछान्यातून खेचून बाहेर काढले. तांबडी टोपी घातलेला एक माणूस त्याला गुरकावून म्हणाला, ''तू परागंदा इसम आहेस. म्हणून आम्ही तुला आमच्या बंदोबस्तानिशी पॅरिसला धाडतो आहोत.''

''मी फ्रेंच नागरिक आहे; परागंदा नाही; मी पॅरिसलाच चाललोय् नि मला तुमच्या बंदोबस्ताची जरूर नाही!''

''खामोष! सरदारके बच्चे! तुझ्यावर या रक्षकांची सक्त नजर तर राहीलच, पण त्यांचा सगळा खर्चही द्यावा लागेल!'' त्या माणसाची उद्दाम वागणूक व उर्मट भाषा ऐकून तो चांगलाच वरमला. त्या रक्षकांच्या खर्चासाठी त्यांनी त्याच्याकडून भरमसाट रक्कम वसूल केली आणि पहाटे तीनच्या सुमारास त्याची भर पावसा-पाण्यातून पॅरिसच्या दिशेने हकालपट्टी झाली.

डार्नेची आणि त्याच्या त्या तीन रक्षकांची अविश्रान्त रखडपट्टी चिखलापाण्यातून सतत दोन दिवस चालू होती. त्याचे ते रक्षक रात्रंदिवस दारू पिऊन धुंद असत. आपल्या शस्त्रास्त्रांबद्दल तर ते इतके बेपर्वा असत, की डार्नेला केव्हा काय घडेल, याची सदैव भीती वाटे. वाटेतील एका शहरात घडलेल्या त्या प्रसंगाने तर त्याच्या काळजाचे पाणी पाणी झाले. असंख्य लोक त्याला पाहून एकमुखाने गर्जत होते, ''परागंदा देशद्रोह्यांचा नि:पात करा!''

एका तबेल्यापाशी ते घोडे बदलण्यासाठी थांबले असता, तेथील एक घिसाडी आपला हातोडा सरसावीत धावून आला. तो ओरडत होता, ''परागंदा बदमाष! सरंजामी अवलाद!'' तबेल्याचा मालक त्याला शांत करण्याच्या उद्देशाने म्हणाला, ''थांब, बाबा, थांब! पॅरिसला त्याचा काय तो न्यायनिवाडा होईलच!''

''न्यायनिवाडा?'' तो घिसाडी ओरडून म्हणाला, ''देशद्रोही म्हणून याला इथेच चेचलं पाहिजे!'' लगेच जमलेल्या गर्दीने गर्जून त्याची री ओढली.

''दोस्तहो! मी देशद्रोही नाही!'' डार्ने ओरडला.

''झूट! साफ झूट!! नव्या कायद्याने तो आता देशद्रोही ठरला आहे, आता जनता त्याची मालक आहे. त्याचा तो मालक राहिलेला नाही.'' घिसाडी ओरडला.

जमावाचा आता डार्नेवर चढाई करायचा इरादा दिसताच, तबेलावाल्याने झटकन् पुढे होऊन तबेल्याचे फाटक धाडदिशी बंद केले. मग मात्र विशेष काही न घडता तो प्रसंग निभावून गेला. डार्नेने तबेल्याच्या मालकाचे आभार मानून त्याला विचारले, ''हा कसला नवा कायदा झाला आहे हो? काय भानगड आहे ही?''

जे लोक परागंदा झाले आहेत, त्यांची मालमत्ता जप्त करायचा आणि त्यांना कायमचे हद्दपार करायचा हुकूम क्रांतिकारी सरकारने काढला आहे. जे परागंदा लोक परत येतील, त्यांना मृत्यूची सजा ठेवलेली आहे. तो घिसाडी जे म्हणत होता, त्याचा अर्थ हाच!'' तबेला मालकाने खुलासा केला.

त्याच रात्री डार्नेने ते शहर सोडले. मार्गात डार्नेच्या लक्षात आणखी एक गोष्ट आली. ती म्हणजे, फ्रान्समधील जनता आपली झोपच विसरली होती, ही होय. रस्त्यावर गस्त घालणारे देशभक्तांचे जथेच तेवढे जागे होते असे नाही, तर खेड्यांतील आम जनताही रात्रीच्या रात्री जागून काढीत

होती.

एके दिवशी सकाळी ते पॅरिस शहराच्या तटबंदीपाशी येऊन पोचले. एका मेढेकोटापाशी त्यांना थबकावे लागले. तेथे बंदोबस्त फार कडक होता. तेथील एक अधिकारी करड्या आवाजात म्हणाला, ''या कैद्याचा दाखला कुठे आहे?'' डार्नेने त्याला खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. आपण फ्रेंच नागरिक असल्याने प्रवास करायला आपल्याला मज्जाव असायचे कारण नाही; बरोबर असलेले रक्षक आपले पगारी नोकर आहेत; आपण कैदी नाही; वगैरे गोष्टी त्याने सांगितल्या. पण तो अधिकारी कशाकडेच लक्ष द्यायला तयार नव्हता. त्याने आपलाच प्रश्न विचारण्याचा धोशा सारखा चालू ठेवला होता. शेवटी डार्नेने गॅबेलचे पत्र काढून त्याच्या हाती दिले. पत्र वाचून होताच तो अधिकारी आश्चर्ययुक्त मुद्रेने डार्नेकडे पाहू लागला. नंतर डार्नेला तेथेच उभा करून तो आत एका खोलीत गेला. पॅरिसचे दरवाजे सैनिकांनी रोखले असून, शहरात प्रवेश करणे सोपे नाही, हे एव्हाना डार्नेला कळून चुकले होते.

सुमारे अर्ध्या तासाने तो अधिकारी परत आला. त्याने डार्नेचे रक्षक व घोडे यांची रवानगी करून दिली. नंतर त्याने डार्नेला एका खोलीत नेले. त्या ठिकाणी अनेक शिपाई व क्रांतिवादी देशभक्त मद्यप्राशनाने बेहोष होऊन लोळत होते. डार्नेला आत घेऊन आलेला अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याला म्हणाला, ''काय हो दफार्ज, परागंदा एव्हरमाँद, तो हाच काय?''

''होय, हाच!'' दफार्ज म्हणाला.

''एव्हरमाँद, तुमची पत्नी कुठे आहे?''

''इंग्लंडात!'' डार्ने उत्तरला.

''ठीक आहे. एव्हरमाँद, आम्ही आपली रवानगी लॉफोर्सच्या तुरुंगात करतो आहोत.''

''कोणत्या कायद्याने? कोणत्या गुन्ह्यासाठी? मी या ठिकाणी आलोय् तो केवळ माझ्या एका देशबांधवाने विनंती केली म्हणून!''

तो अधिकारी कठोर स्मित करीत म्हणाला, ''आता कायदे नवे आले आहेत. गुन्ह्यांची नवी सदरं चालू झाली आहेत. परागंदा लोकांना आता कोणतेच अधिकार राहिलेले नाहीत!'' दफार्जने पुढे होऊन डार्नेला आपल्याबरोबर चलण्यास खुणेने फर्मावले. मग त्याने त्याला हळूच विचारले, ''एके काळी बॅस्टीलच्या तुरुंगात असलेले डॉ.मॅनेट यांचे आपण जामात काय?''

''होय!''

''माझं नाव दफार्ज, पूर्वी कधी तुम्ही माझं नाव ऐकलं आहे का?''

''माझी पत्नी आपल्या वडिलांना न्यायला तुमच्याकडेच आली होती ना?'' डार्नेच्या तोंडातून पत्नी हा शब्द निघताच दफार्ज एकदम अधिरेपणाने म्हणाला, ''आपण उगाच फ्रान्स देशात आलात . याचं पर्यवसन काही भयंकर झालं नाही म्हणजे मिळवली!''

''मी का आलो हे तुम्ही ऐकलंत ना? त्यावर तुमचा विश्वास नाही की काय?'' ''तुम्ही सांगता ते कदाचित् खरं असेल, पण ते सत्यच तुमचा घात करण्याची शक्यता आहे. कदाचित् तुम्हाला आत खेचायसाठी कुणीतरी हे कारस्थानही रचलं असेल!'' दफार्ज भयंकर मुद्रा करीत म्हणाला. ''खरंच मी या ठिकाणी भयंकर संकटात सापडलोय्?'' डार्नेने हताश होऊन विचारले, ''मला आपण काही मदत कराल का?''

''नाही! ते अशक्य आहे!!'' ''निदान माझी एक विनंती तरी आपण मानाल का?''

''कोणती?''

''आपण लॉरीना माझा एक निरोप पोचवाल का?''

''आपल्या हातून असलं काही होण्याजोगं नाही!''

डार्नेचा स्वाभिमान चांगलाच दुखावला गेला. गॅबेलचे पत्र हा बनाव असावा, अशीही शंका त्याला आल्याने, तो त्यावर काहीच बोलला नाही.

करड्या पाहाऱ्यात तो आता पॅरिसच्या रस्त्यातून लॉफोर्सच्या तुरुंगाकडे चालला होता. सडकेने चाललेला कैदी हा आता काही विशेष नवलाईचा प्रकार नव्हता. पॅरिसच्या रस्त्यांत दिसणारे ते एक दैनंदिन सामान्य दृश्य झाले होते. रस्तोरस्ती कानी येणाऱ्या संभाषणावरून डार्नेला कळून चुकले, की पॅरिसमधील सर्व परराष्ट्रीय वकील आपापला गाशा गुंडाळून निघून गेले आहेत.

इंग्लंडमध्ये आपल्याला ज्याची अजिबात कल्पना

आली नाही, अशा एका भयानक संकटात आपण सापडलो आहोत, याची जाणीव आता डार्नेला झाली होती; पण अद्यापि आपणावर कोसळलेले संकट फारसे घातक आहे, असे मात्र त्याला वाटत नव्हते. क्रांतिकारकांना जास्तीत जास्त भयानक अशी कोणती दुष्कृत्ये सुचतील, याची कल्पना डार्नेच्या सुसंस्कृत मनाला येण्याची शक्यता नव्हती. क्रांतिकालात आतापर्यंत झालेल्या अत्याचारापलीकडे आणखी निराळे ते काय होणार? असेच त्याला वाटत होते.

''आणखी किती कैदी यायचे आहेत?'' लॉफोर्सच्या तुरुंगाधिकाऱ्याने डार्नेला आणणाऱ्या अधिकाऱ्याला विचारले. पुढे तो म्हणाला, ''आमच्या कोठड्या आधीच भरून गेल्या आहेत!'' डार्नेला त्यांनी अनेक अंधाऱ्या जागांतून व कुबट वासाने कोंदटलेल्या कोठड्यांतून हिंडविले. पूर्वी चांगल्या स्थितीत वाढलेली, कैक खानदानी कुटुंबात वावरलेली अनेक माणसे या कोठड्यांतून कोंडलेली दिसत होती. स्त्रिया, पुरुष, मुले, कशाचाच विधिनिषेध नव्हता. या वातावरणात सुंदर स्त्री-पुरुषांना पिशाच्चांची अवकळा आलेली होती.

शेवटी डार्नेला त्यांनी एका लहानशा अंधार कोठडीत ढकलून दिले. धाडकन् दार लावल्याचा आवाज झाला. आपण आता जिवंत असूनही मृतवत् झालो, याची जाणीव त्या आवाजाने डार्नेला करून दिली. त्या एवढ्याशा खोलीतल्या गुडुप अंधारात डार्नेला आपल्या सासऱ्याची -डॉ.मॅनेटची आठवण झाली. त्या म्हाताऱ्याने सतत अठरा वर्षे अशा जागेत कशी काढली असतील? नुसत्या कल्पनेनेच त्याच्या अंगावर काटा उभा राहिला.

●●●

## १४. संकटाला आमंत्रण

पॅरिसमधील टेलसन् बँकेची शाखा एका भव्य प्रासादाच्या एका विभागात होती. या प्रासादापुढे विस्तीर्ण अंगण असून त्याच्या सभोवती मजबूत तटबंदी होती. एके काळच्या कोणाएका सरंजामदाराचा हा प्रासाद आता देशभक्तांच्या अग्रणींचे निवासस्थान बनल्यामुळे त्याला चांगलीच सुरक्षितता लाभली होती. लॉरी या प्रासादामधील टेलसन् बँकेच्या आश्रयाने यासाठीच राहिला होता. आपण ज्या ठिकाणी नोकरी करतो, तिथेच वास्तव्य केल्याने, जबाबदारी सांभाळणे अधिक सोयीचे पडते, हाही विचार त्यात होताच. रात्रीच्या वेळी लॉरी खिडकीतून पाहात बसे. रस्त्यावरच्या कर्णकटु किंकाळ्या-आरोळ्या सारख्या कानांवर पडत. त्यांनी त्याच्या जिवाचा थरकाप होई. आपले कोणी आप्तइष्ट या शहरात नाहीत, या विचाराने त्याला समाधानही वाटे; तो परमेश्वराचे यासाठी आभारही मानी.

एकाएकी दरवाजावरील घंटी वाजली. काही कोलाहलही ऐकू आला. थोड्याच वेळात दार बंद केल्याचा आवाज झाला आणि गलकाही थांबला. बँकेच्या सुरक्षिततेची चिंता रात्रंदिवस वाटत असल्याने, लॉरीने पहारेकऱ्यांची योजना केली होती. इतके असूनही एवढ्या अपरात्री बँकेच्या आवारात कोण आले असावे, या विचाराने तो जरा बुचकळ्यात पडला. पण आलेली माणसे दृष्टीस पडताच तो आश्चर्याने थक्क झाला. ''कोण? ल्यूसी मॅनेट! डॉक्टर मॅनेट!'' तो आश्चर्याने ओरडला, ''तुम्ही इकडे कुणीकडे?''

''माझे पती...?''

''कोण? चार्लस् डार्ने? त्याचं काय?''

''तीन-चार दिवस झाले! आपल्या एका जुन्या सेवकाला वाचवायला ते इथे आले आणि लॉफोर्सच्या तुरुंगात डांबले गेले.'' ल्यूसीने एका दमात सर्व काही सांगून टाकले. ते ऐकून लॉरी थक्कच झाला, दिङ्मूढ झाला.

एवढ्यात दारावरील घंटा पुन्हा घणघणली आणि मोठा जमाव आत घुसल्याची चाहूल लागली.

''ल्यूसी, तू कशाला तिकडे लक्ष देतेस?'' विचलित झालेल्या ल्यूसीला लॉरी म्हणाला.

डॉक्टर मॅनेट अगदी धीटपणे व शांतपणे स्मित करीत म्हणाले, ''या शहराने आज मला अगदी मंत्रमुग्ध केलं आहे. मी बॅस्टीलच्या तुरुंगात अठरा वर्षे काढली असल्याने कुणीही देशभक्त माझ्या केसालादेखील धक्का लावणार नाही. उलट इथले लोक माझा जयजयकारच करतील. मी काढलेल्या हालअपेष्टांमुळे या नव्या जमान्यात मला डार्नेचा थांगपत्ता सहज लावता येईल! पण ही गडबड कसली आहे?''

''तिकडे आपण लक्ष देऊ नका!'' लॉरी गडबडीने म्हणाला. लगेच ल्यूसीला तो म्हणाला, ''ल्यूसी, तू आधी झटदिशी त्या मागील बाजूच्या खोलीत जाऊन बस पाहू. ही सर्व गडबड अगदी शांत होईपर्यंत तू अजिबात इकडे येऊ नकोस!''

''ठीक आहे. मी जाते आत. कारण मला त्यापेक्षा अधिक काही करताच येणार नाही.'' ल्यूसी निराशेने म्हणाली. लॉरीने जेमतेम तिला त्या खोलीत लपविले मात्र, आणि कपडे रक्ताने भरलेल्या विक्राळ स्त्री-पुरुषांचा एक लोंढा आत घुसला.

''तुम्ही लोक म्हणजे कैद्यांचे खून करायच्या कामावर नेमलेली नुसती भुतावळ आहे! तुमच्या अंगात खरोखरच जर काही खास सामर्थ्य असलं, तर ते आताच वापरून ताबडतोब लॉफोर्स गाठा नि डार्नेची सुटका करायचा काही मार्ग काढा. पाठीमागून काही उपयोग होणार नाही. दुसऱ्या कैद्यांबरोबर एकदा का तो या नरपिशाचांच्या हाती लागला, तर मग त्याची शंभर वर्षे भरलीच म्हणून समजा!'' लॉरीने इशारा दिला.

डॉक्टर मॅनेट घाईघाईने अंगणात येऊन दाखल झाले. त्यांचे पांढरे शुभ्र केस, त्यांचा लक्षात राहाण्याजोगा रेखीव चेहरा, पांढरी दाढी, या साऱ्या गोष्टींचा परिणाम त्या घोळक्यावर झालेला दिसला. ते सरळ त्या घोळक्याच्या मध्यभागी जाऊन उभे राहिले. आणि मग काय चमत्कार झाला कोण जाणे! लोकांनी त्यांना उचलून खांद्यावर घेतले. 'बॅस्टीलचा कैदी चिरंजीव होवो!' अशी लोकांनी गर्जना केली. 'लॉफोर्समधील त्यांच्या नातेवाईकाला मुक्त करा!' त्यांनी घोषणा दिली आणि मग डॉक्टर मॅनेट यांना मिरवीत तो जमाव बाहेर पडला.

नंतर लॉरी ल्यूसीकडे येऊन म्हणाला, ''डॉक्टर मॅनेटना चार्लस्‌चा पत्ता काढण्यात नक्कीच यश मिळेल. त्यात त्यांना क्रांतिकारकांचं मोठंच साहाय्य मिळेलसं दिसतं.'' ल्यूसीबरोबर तिची मुलगी व प्रासबाई या दोघीही आल्या होत्या. रात्र बरीच झाली तरी दंगलखोरांचे जमाव अधून-मधून जा-ये करीत होते. पण डॉक्टर मॅनेट मात्र अद्यापि परतले नव्हते.

ल्यूसी एका परागंदा गृहस्थाची पत्नी असल्याने तिला टेलसन् बँकेत आश्रय देणे, म्हणजे जणू संकटालाच आमंत्रण देणे, हे लॉरीला जाणवत होते. ल्यूसीसाठी आणि तिच्या मुलीसाठी आणखी एखादी सुरक्षित जागा पाहायचे काम लॉरीने दुसऱ्या दिवशी सकाळीच उरकले! त्याला हवी होती तशी जागा मिळताच, त्याने तत्काळ ल्यूसी, तिची मुलगी व प्रासबाई यांना नव्या जागी हलविले. अधिक दक्षता म्हणून त्याने जेरीलाही त्यांच्या दिमतीला दिले.

दुपार टळली होती. आता पुढे काय करावे या विचारात लॉरी आपल्या खोलीत बसून होता. इतक्यात जिन्यावर कोणाची तरी पावले वाजली. काही क्षणातच एक माणूस खोलीत आला व लॉरीकडे निरखून पाहू लागला. ''तुम्ही मला ओळखता का?'' त्या माणसाने विचारले. ''मला वाटतं मी तुम्हाला तुमच्या गुत्त्यात पाहिलं होतं.'' लॉरी उत्तरला.

''बरोबर! मी डॉक्टर मॅनेट यांच्याकडून आलो आहे.'' असे म्हणून दफार्जने डॉक्टर मॅनेटचे एक पत्र लॉरीच्या हातात दिले. पत्रात लिहिले होते,

''चार्लस् सुरक्षित आहे. या माणसापाशी ल्यूसीसाठी एक पत्र दिलं आहे. याची आणि तिची भेट करवून द्यावी!''

पत्र वाचून लॉरीच्या मनावरील ओझे बरेच कमी झाले. त्याने दफार्जला म्हटले, ''चला, ल्यूसी डार्नेला भेटायला येता ना?''

''हो!'' दफार्ज उद्गारला. दफार्ज एखाद्या चेतनाशून्य, भावनाशून्य लाकडी ठोकळ्यासारखा वागत आहे, हे लॉरीच्या लक्षात आले. लॉरी त्याला घेऊन खाली आला.

तेथे दोन स्त्रिया वीणकाम करीत उभ्या असलेल्या त्याला दिसल्या.

''दफार्जबाई पण आपल्याबरोबर येणार की काय?'' लॉरीने विचारले.

''होय. या दोघींनाही त्यांची ओळख करून घ्यायचीय्!''

किंचित् अस्वस्थ होऊन लॉरीने दफार्जकडे एकदा संशयाने पाहिले. मग तो त्या सर्वांना घेऊन ल्यूसीच्या बिऱ्हाडाकडे निघाला.

ल्यूसी एकटीच आपल्या बिऱ्हाडी अश्रू ढाळीत बसली होती, पण चार्लस् सुरक्षित असल्याची वार्ता ऐकताच तिला फार आनंद झाला. तिने दफार्ज पती-पत्नींचे आभार मानले. पण दफार्जबाईंच्या कठोर मुद्रेकडे लक्ष जाताच ती भयचकित झाली. ''ल्यूसी, दफार्जबाईंना तुम्हा मंडळींना भेटायचं होतं. तुमच्या संरक्षणाबाबत काही करायचं झालं, तर ही माणसं परिचयाची झाली पाहिजेत!'' लॉरी म्हणाला. पण तो एकाएकी थबकला. दफार्ज उदासपणे पण काहीशा संशयाने आपल्या पत्नीकडे पाहात होता. एवढ्यात प्रासबाई छोट्या ल्यूसीला घेऊन तेथे आली. दफार्जबाई व तिच्या बरोबर आलेली ती दुसरी बाई, त्या दोघींकडे निरखून पाहू लागल्या. या बायांबद्दल प्रासबाईचे मत मुळीच चांगले झाले नाही. ''हीच ती मुलगी काय?'' छोट्या ल्यूसीकडे बोट दाखवीत दफार्जबाईने विचारले. या दोन बायांची कृष्णछाया त्या मायलेकींवर पडली होती. प्रासबाईला ही घटना मोठी अशुभ वाटली. ''ठीक आहे. या दोघींना आम्ही नीट पाहून घेतलं आहे, आता इथून जायला हरकत नाही.'' दफार्जबाई खोचकपणे म्हणाली. तिच्या बोलण्यातील उर्मट खोचकपणा ल्यूसीला चांगलाच जाणवला. तिच्या काळजात धस्स झाले. ''एक पत्नी व एक माता म्हणून मी आपल्याला विनवते, की माझ्या पतीवर व लेकरावर दया करा!'' कमालीच्या काकुळतीने ल्यूसी म्हणाली. दफार्जबाईने अगदी थंडपणाने तिच्याकडे पाहिले आणि आपल्याबरोबर आलेल्या दुसऱ्या बाईकडे वळून ती म्हणाली, ''अनेक स्त्रिया आणि माता आतापर्यंत पाहिल्या आहेत. दारिद्र्य, भूक, रोगराई आणि वरिष्ठ समाजाकडून झालेली उपेक्षा यांमुळे त्यांची ही मुलं-बाळं पिचून गेली आहेत.'' ती दुसरी बाई तिच्या क्रौर्यामुळे क्रांतिकालात 'सूडबया' म्हणूनच प्रसिद्धीला आली होती. ती दात-ओठ खात म्हणाली, ''आतापर्यंत त्या बिचाऱ्यांच्या नशिबी दुसरं काहीच आलं नाही! खूप हाल काढले आहेत त्यांनी!''

''एखाद्या पत्नीची अगर मातेची कदर करून आता चालणार नाही!'' दफार्जबाई ताडकन् म्हणाली व त्या दोघीही बाया तावातावाने बाहेर पडल्या. त्यांची अशुभ कृष्णछाया या घरावर पडल्याने, लॉरी दारूण शंकेने भयभीत झाला. डॉक्टर मॅनेट चार दिवसांनी परत आले. ल्यूसीने स्वत:ला घरात कोंडून घेतले होते. आणखी एक फार मोठा उठाव झाल्याची वार्ता सर्वत्र पसरली होती. डॉक्टर मॅनेट प्रथम टेलसन् बँकेत आले. स्वत: पाहिलेल्या काही भयानक घटनांच्या हकिकती त्यांनी लॉरीला निवेदन केल्या. चार दिवसांत सुमारे अकराशे कैद्यांची कत्तल झालेली होती. खुनशी लोकांचे न्यायालय चालू झाले होते. या न्यायालयापुढे कैद्यांना हजर करीत आणि तत्काळ त्यांची कत्तल करायचा निकाल होई. क्वचित् प्रसंगी कोणाची सुटका होई, तर कोणाची पुन्हा तुरुंगात रवानगी होई.

याच न्यायालयापुढे डार्नेला आणल्याचे डॉक्टर मॅनेटनी पाहिले होते; पण काही अनपेक्षित कारणाने विलंब झाल्यामुळे त्याची पुन्हा तुरुंगात रवानगी झाली. त्याची सुटका काही होऊ शकली नाही. दंगलखोर लोकांच्या सुरामारीपासून त्याचा बचाव व्हावा, एवढीच दक्षता डॉक्टर मॅनेटना घेता आली होती. या भयानक न्यायालयात ज्या गोष्टी घडत, त्याचे सविस्तर वर्णन करणे अशक्य होते. लॉरीला अशी भीती वाटू लागली, की डॉक्टरांचे जुने दुखणे नव्याने डोके वर काढणार की काय! पण तसे काहीच घडले नाही. या साऱ्या भयानक कोलाहलामध्ये डॉक्टर आपले मनोधैर्य टिकवून होते. गरीब, श्रीमंत, बरा, वाईट यांचा काडीमात्र विचार न करता, त्यांनी आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा फायदा सर्वांना करून देऊन मोठीच लोकप्रियता संपादन केली होती आणि त्यामुळेच त्यांना तीन तुरुंगातील कैद्यांची वैद्यकीय तपासणी करण्याचे काम मिळाले होते. त्यात लॉफोर्स तुरुंगाचाही समावेश असल्याने त्यांना वारंवार डार्नेची भेट घेणे जमत होते आणि त्याचे एकूण एक निरोप ल्यूसीला पोचवायची कामगिरीही बजावता

येत होती. मात्र कोणतीही चिठी-चपाटी न देण्या-घेण्याची दक्षता ते घेत. निष्कारण कोणताही धोका पत्करण्याची त्यांची तयारी नव्हती. परागंदा लोकांकडे फार मोठ्या संशयाने पाहाण्याची सर्वांची प्रवृत्ती होती.

डॉक्टरांचा हा नवा जीवनक्रम काहीसा धोकेबाज असला, तरी त्याचा त्यांना अभिमान वाटत होता. आपण भोगलेल्या दीर्घ यातनांमुळेच आज आपल्याला लोकप्रियता लाभली आहे, हे ते जाणून होते. या लोकप्रियतेचा उपयोग डार्नेच्या सुटकेसाठी कसा करावा, एवढाच त्यांच्यापुढे प्रश्न होता. डार्नेची सुटका व्हावी, किमान त्याला न्यायालयापुढे यायला मिळावे, अशा अनेक खटपटी-लटपटी त्यांनी केल्या, पण परागंदा लोकांबाबतचा लोकक्षोभ एवढा भयानक होता, की अधिक काही करण्याने सारेच बारगळायची भीती होती.

राजा, राणी या उभयतांचाही शिरच्छेद झाला. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही नव्या लोकराज्याची घोषणा होती. अन्यथा मृत्यू ठेवल्यासारखा होता. सर्व युरोपशी झुंज देण्याची तयारी क्रांतिकारकांनी केली होती. या रगाड्यात फुरसतीला वाव नव्हता. दयेला जागा नव्हती. शांततेची भाषा नव्हती. वेळेला मोजमाप नव्हते. निराधार कायदे, दुष्ट, भावनाविहीन न्यायालये, कैद्यांनी ओतप्रोत भरलेले तुरुंग, अशा या भयंकर कोलाहलात भर टाकणारे एक नवे शस्त्र निर्माण झाले. 'गुलेटिन!' या भयानक शस्त्राने एकाच वेळी पन्नास-साठ लोकांचा शिरच्छेद करता येत होता!

या साऱ्या भयानक धामधुमीत डॉक्टर मॅनेट संथपणे, शांतपणे मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत होते. यातून ल्यूसीच्या पतीला आपण खास वाचवू, असा आत्मविश्वास त्यांना वाटत होता.

चार्लस्‌ला तुरुंगात जाऊन आता एक वर्ष लोटले होते. या कालावधीत क्रांतीचा उद्रेक शमण्याऐवजी अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करीत होता. क्रांतिकारकांच्या दुष्टाव्याला उधाण आले होते. डिसेंबरच्या सुमारास नदीत फेकलेल्या प्रेतांमुळे नदीची मुखे चोंदायची पाळी आली. शेकडो लोकांना धडाधड गोळ्या घालायचे सत्र चालू होते. या साऱ्या उद्वेगजनक प्रकारांकडे दुर्लक्ष करून, डॉक्टर मॅनेट मरणारा व मारणारा या उभयतांवरही समदृष्टीने उपचार करीत होते. त्यांचा हा सेवाभाव व त्यांचा पूर्वेतिहास यांमुळे त्यांच्या हालचालींबद्दल क्रांतिकारक कधीच शंका घेत नव्हते.

आपल्या पतीला 'गुलेटिन' खाली मान द्यावी लागेल की काय, या शंकेने ल्यूसी मात्र बेचैन झाली होती. तिची झोप उडाली होती. अशुभ शंकांनी नि विचारांनी मनाचा तोल जाऊ नये, म्हणून छोट्या ल्यूसीच्या सरबराईत आपले मन रमविण्याचा तिचा प्रयत्न चालू होता. चेहऱ्यावर ती समाधान दाखविण्याचा प्रयत्न करी, पण खंगू लागलेले शरीर आणि फिका पडलेला चेहरा, तिच्या मनोव्यथेची साक्ष देत होता.

एके दिवशी तिच्या वडिलांनी तिला एक खूशखबर दिली, की ''डार्नेच्या कोठडीला एक खिडकी आहे. तीमधून एक गल्ली दिसते. तू जर दुपारी तीनच्या सुमारास त्या गल्लीतील एका विशिष्ट ठिकाणी उभी राहिलीस, तर तुम्हा उभयतांची निदान नजरभेट तरी होईल.''

''मग बाबा, मला ते ठिकाण दाखवा ना! मी त्या ठिकाणी रोज जाऊन उभी राहीन!'' ल्यूसी आतुरतेने म्हणाली.

ती एक अगदीच आडवळणी आणि घाणेरडी गल्ली होती. त्या ठिकाणी अनेक गलिच्छ झोपड्या होत्या. त्यात एका सुताराचे बिऱ्हाडही होते. ल्यूसीला वारंवार या ठिकाणी येताना पाहून, त्या सुताराला शंका आली आणि तो बारकाईने लक्ष ठेवू लागला.

एके दिवशी ल्यूसी तेथे असतानाच मोठा कोलाहल झाला. अनेक स्त्री-पुरुष विजयनृत्याच्या नावाखाली धांगडधिंगा घालीत, आरडत-ओरडत मिरवणुकीने येत होते. मिरवणुकीच्या अग्रभागी तो सुतार व ती 'सूडबया' ही उभयता होती. हा धिंगाणा पाहून ल्यूसी घाबरून गेली आणि तिच्या मुखातून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली; पण एवढ्यात तिचे लक्ष त्या ठिकाणी उभ्या असलेल्या आपल्या वडिलांकडे गेले. डॉक्टर मॅनेट तिच्यापाशी येऊन तिला हळूच म्हणाले, ''भिऊ नकोस! हे लोक तुला काही करणार नाहीत.''

''मला माझीही भीती वाटत नाही, पण या भयंकर लोकांच्या तावडीत सापडलेल्या डार्नेची काय अवस्था

होणार, याची मात्र मला चिंता वाटू लागली आहे.''

''या चिंतेतून तुला मुक्त करण्यासाठी माझे पराकाष्ठेचे प्रयत्न चालू आहेत.''

एवढ्यात मांजरीच्या पावलाने तेथे आलेली दफार्जबाई म्हणाली, ''नमस्कार बाईसाहेब!''

''नमस्कार!'' दचकून ल्यूसी म्हणाली.

दुसऱ्या दिवशी चार्लस्‌ला न्यायालयात उभे करणार असल्याची बातमी डॉक्टरांनी मुलीच्या कानावर घातली. या वार्तेने तर ल्यूसीला चांगलाच धक्का बसला. तिला घेऊन डॉक्टर मॅनेट लॉरीला भेटण्यासाठी टेलसन् बँकेकडे निघून गेले.

थोड्या वेळाने ती उभयता टेलसन् बँकेच्या आवारात येऊन पोचली. शहरात सर्वत्र एकच घोषणा घुमत होती, ''स्वातंत्र्य, समता, बंधुता, नाही तर मृत्यू!''

ती उभयता आली आणि त्यांना तिथल्या खुर्चीवर एक अपरिचित कोट ठेवलेला दिसला. कोणीतरी नवीन प्रवासी बँकेत आला असावा. तो कोण असावा याचे मात्र उभयतांना कोडे पडले.

●●●

## १५. डार्ने मुक्त

त्या भयानक न्यायालयाचे कामकाज रोज चालू होते. रोज सायंकाळी न्यायालयाचे निर्णय बाहेर पडत. ते कैद्यांना वाचून दाखविण्याचा कार्यक्रम होई. सरते शेवटी एव्हरमाँद उर्फ चार्लस् डार्ने याचा खटला चालू झाला. डार्नेचे नाव येण्यापूर्वी सुमारे दीड तासात पंधरा लोकांना शिरच्छेदाची शिक्षा झाली होती. डार्नेचा निवाडा देणारा न्यायाधीश पिसांची टोपी घालून एका बाकड्यावर बसला होता. ज्यूरीचे लोक तांबड्या टोप्या घालून बसले होते. प्रत्येक निर्णयागणिक लोक टाळ्या वाजवून आरडा-ओरडा करीत. न्यायालयात आहेत म्हणून त्यांना कोणतेच बंधन नव्हते, शिस्त नव्हती.

डार्नेला पाहाताच लोक ओरडले, ''याचं डोकं मारा! हा लोकराज्याचा शत्रू आहे!'' डार्नेचा निवाडा ऐकण्यासाठी जमलेल्या लोकांत दफार्ज, त्याची पत्नी दफार्जबाई, डॉक्टर मॅनेट, लॉरी, वगैरे मंडळी होती.

मग तथाकथित न्यायमूर्तींनी स्वत: डार्नेला काही प्रश्न विचारले, ''आपण फार काळ इंग्लंडात राहात होता काय?''

''होय, महाराज! माझ्या सरदारकीचा त्याग करून मी उपजीविकेसाठी इंग्लंडला जाऊन राहिलो होतो!'' त्याने आपले साक्षीदार म्हणून गॅबेल व डॉक्टर मॅनेट यांचा उल्लेख केला.

''आपण इंग्लंडमध्ये लग्न केलं आहे काय?''

''होय, पण माझी पत्नी फ्रेंच नागरिक असून, प्रख्यात डॉक्टर मॅनेट यांची ती मुलगी आहे.''

''डॉक्टर मॅनेट झिंदाबाद!'' लोकांनी एकच गिल्ला केला.

''मग आपण फ्रान्स देशात तत्काळ परत का आला नाहीत?''

''फ्रान्स देशात माझ्या चरितार्थाचं काहीच साधन शिल्लक राहिलं नाही म्हणून. इंग्लंड देशात फ्रेंच भाषा व वाङ्मय यांचे पाठ देऊन मला चांगला पैसा मिळे. तरीही एका फ्रेंच नागरिकाचे प्राण वाचवावेत म्हणून मी मुद्दाम आलो.''

डॉक्टर मॅनेटनी आपल्या पुराव्यात असे नमूद केले, की डार्ने फार काळ इंग्लंडमध्ये राहात असल्याने, तो पूर्वीच्या राजेशाही सरकारशी कोणत्याच अर्थाने संबंधित नव्हता. डार्नेच्या बाजूने एकूण पुरावा चांगला झाल्याने व लोकमतही त्याच्या बाजूने आता झुकू लागल्याने त्याला मुक्त करण्याचा आदेश न्यायमंडळाने दिला. तो ऐकताच अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. अनेकांनी डार्नेचे इतके उत्साहाने स्वागत केले, की त्याचा जीव गुदमरायची पाळी आली. घटकेपूर्वी त्याला ओरबाडून खायला सज्ज असलेले

लोक, आता प्रेमाचा अचाट वर्षाव करताना पाहून, डार्ने भयचकित झाला. त्याला त्यांनी आदराने एका खुर्चीवर बसविले, त्याच्या हाती एक लाल झेंडा दिला आणि त्याला मिरवीत त्याच्या घराकडे नेले.

चार्लस् डार्नेला घरी पोचवून लोक आरडा-ओरडा करीत, बेहोष नृत्य करीत तिथून निघाले. ल्यूसी या अनपेक्षित प्रकाराने अगदी बधिर होऊन गेली. ''ल्यूसी! मी अगदी सुखरूप घरी आलो.'' डार्ने म्हणाला, ''त्यासाठी तुझ्या वडिलांनी जे प्रयत्न केले, त्यांना तोड नाही!'' त्याच्या कृतज्ञतापूर्ण उद्गारांनी डॉक्टर मॅनेटना धन्यता वाटली, तरी ल्यूसीच्या मनात घर करून बसलेली भीती मात्र दूर होईना. हे सारे वातावरण फारच अनिश्चित होते. कित्येक निरपराधी, निरुपद्रवी लोकांचे बळी पडत होते.

कडक हिवाळ्याचे दिवस असल्याने दिवसासुद्धा अंधार भासू लागला आणि वेळी अवेळी होणाऱ्या अनेक धुमाकुळांनी शहराचे वातावरण अधिकच गढूळ बनू लागले.

मॅनेट कुटुंबाची राहाणी अगदीच साधी होती. अगदी जरूर तेवढेच जिन्नस ते बाजारातून खरेदी करून आणीत. बाजारहाट करण्याची कामगिरी बहुधा प्रासबाईकडे असे. प्रासबाईला फ्रेंच भाषा येत नसे, पण चालचलाऊ व्यवहारापुरते मोडकेतोडके फ्रेंच बोलणे तिला जमे. ती ल्यूसीला म्हणाली, ''मला वाटतं, आज रात्रीसाठी थोडं मद्य आणावं; पण सध्या तरी या शहरात खून आणि गुन्हे करायलाच मद्याचा वापर होतोय् म्हणून मन घेत नाही.''

''एऽ बया, जरा हळू बोल!'' ल्यूसीने सूचना दिली.

''होय, तेही खरंच! एकदा डॉक्टर मॅनेटना सांगून आपण या भयानक शहरातून आपली सुटका करून घेतली पाहिजे.''

''मला नाही वाटत ते इतक्यात शक्य होईलसं. शिवाय त्यात धोकाही आहे.''

''मग दम काढायलाच हवा.'' एवढे बोलून प्रासबाई बाजारहाटीसाठी बाहेर पडली. डॉक्टर मॅनेट नातीला एक परीकथा सांगण्यात गुंतले होते. शेजारी ल्यूसीही जरा विचारमग्न अवस्थेत बसली होती. एकाएकी दचकून ती ओरडली. डॉक्टर म्हणाले, ''तू आता क्षुल्लक गोष्टींना भिऊ लागली आहेस. तुला धीट झाल्याशिवाय गत्यंतर नाही ल्यूसी!'' इतक्यात जिन्यावर कोणाच्या तरी पावलांचा चमत्कारिक आवाज येऊ लागला आणि लगेच कोणीतरी दारही ठोठावले. ''कोण आहे बरं? आपण चार्लस्‌ला लपवून ठेवूया.'' ती घाबरेपणाने म्हणाली. ''माझ्याजवळ तो सुरक्षित आहे,'' असे म्हणून डॉक्टर मॅनेट पुढे झाले व त्यांनी दार उघडले. त्याबरोबर चार सशस्त्र रानदांडगे आत घुसले. ''एव्हरमाँद, तुम्ही फ्रेंच लोकसत्तेचे कैदी आहात!'' त्यापैकी एकजण ओरडला.

''का? कशासाठी?'' डार्नेने विचारले.

''आधी तुरुंगात चला. का, कशासाठी, याचा तपास तिथे करा!''

डॉक्टर मॅनेट एखाद्या पुतळ्याप्रमाणे थंडगार पडले होते. त्यांनी त्या लोकांना उद्देशून कसेबसे विचारले, ''तुम्ही मला ओळखता ना?''

''हो! तुम्हाला ओळखत नाही, असं कोण आहे?''

''मग हे कसं घडलं हे मला सांगता का?''

''सेंट अँतोना विभागाचा त्यांच्यावर आरोप आहे, यापलीकडे आम्हाला काही सांगता यायचं नाही. दुसरं म्हणजे, एक देशभक्त या नात्याने तुम्हीही काही त्याग करावा, अशी लोकसत्तेची अपेक्षा दिसते.''

''पण त्यांच्यावर आरोप केला तरी कुणी?''

''हे सांगणं नियमाला सोडून असलं तरीही मी सांगतो. दफार्जने नि आणखी एकाने हे आरोपपत्र दाखल केलं आहे.''

''हा आणखी कोण?''

''याचं उत्तर तुम्हाला उद्या मिळेल.''

●●●

## १६. सॉलोमन ऊर्फ बरसाड

प्रासबाई आणि जेरी यांना घरी काय घडले आहे, याची कल्पना नसल्याने, ती उभयता मद्य खरेदी करायला बाजारात गेली. मद्याची खरेदी चालू असता, मद्य पिण्यास आलेला एक इसम बाहेर जाण्यासाठी निघाला. त्याचा चेहरा दृष्टीस पडताच प्रासबाई एकदम आश्चर्याने ओरडली. पिण्यासाठी आलेली अनेक माणसे तिच्या ओरडण्याने एकदम खडबडून उठली. काहीतरी भांडणतंटा, गडबड-गोंधळ पाहायला मिळणार, अशी त्यांची अटकळ होती, पण तसे काहीच घडले नाही. प्रासबाईसमोर एक सत्प्रवृत्त लोकशाहीवादी उभा होता आणि ती उभयता एकमेकांकडे आश्चर्याने पाहात होती. भांडणाचा प्रश्नच नव्हता.

''अरेऽ बाबा सालोमन!'' प्रासबाई म्हणत होत्या, ''किती दिवसांनी अगदी अनपेक्षित गाठ-भेट होते आहे रे आज तुझी इथे?''

तो मनुष्य भयंकर भ्यायल्याप्रमाणे करून हळूच म्हणाला, ''एऽ बया! माझी बहीण असलीस तरी इतकी सलगी करू नकोस! जीभ आवरून धर आणि काही बोलायचंच असलं, तर बाहेर येऊन बोल! नाही तर तुला नि तुझ्याबरोबर मलाही स्वर्गाची वाट धरावी लागेल. आणि हा कोण?''

''जेरी क्रंचर!'' प्रासबाई साश्रू नयनांनी म्हणाली.

''हा काय मला पिशाच्च समजतोय की काय?'' जेरीच्या चेहऱ्यावरून त्याचा प्रश्न रास्त असावासे दिसले. मद्याचे पैसे चुकते करून ती उभयता बाहेर पडली. गुत्त्यात बसलेल्या इतरांचे कसेबसे समाधान करून बाहेर आल्यावर तो बहिणीला म्हणाला, ''बोल बया, काय हवंय तुला?''

''वाऽरे भाऊ! इतक्या दिवसांनी भेटलास नि असलं तुसडं स्वागत करतोस?''

''हे बघ, माझा जीव जर धोक्यात घालायचा नसेल, तर माझ्यापासून दूरच राहा कशी. लोकसत्ताक सरकारचा मी एक अधिकारी आहे. आता कुठे जरा जम बसलाय् नि बरं चाललंय्, तेवढ्यात काहीतरी गोता आणशील नाहीतर!''

''माझा भाऊ नि अशा बदमाश लोकांचा अधिकारी? पण हे बघ, जरा, सरळ प्रेमाने वागलास, तर काही बिघडेल का?''

बंधुराज काहीतरी बोलणार एवढ्यात जेरीने मध्येच तोंड घातले. तो म्हणाला, ''काय हो! तुम्ही सॉलोमन जॉन, की जॉन सॉलोमन? मघाशी तुम्हाला कोणीतरी जॉन म्हणून हाक मारलेली ऐकली, म्हणून विचारतो! खाडी ओलांडताना आपण 'प्रास' नाव समुद्रात बुडवून, नवं नाव धारण केलेलं दिसतंय्. ओल्ड बेली न्यायालयात साक्षीला आलात ते बरसाड म्हणून, नाही का?''

''काय बरसाड, इकडे कुणीकडे?'' जेरीचे भाषण संपताच कोणीतरी विचारले आणि हे विचारणारा माणूस जेरीपाशी येऊन थडकलाही. तो सिडने कार्टन होता. ''भिऊ नकोस प्रासबाई, मी कालच इथे आलोय् नि लॉरीकडे उतरलोय. आत्ता तुझ्या भावाबरोबर बोलायला इथे आलोय. इथेही हे महाराज हेरगिरी नि चहाडखोरी करीत आहेत वाटतं?''

प्रासबाईचा भाऊ कार्टनच्या या झपाट्याने पांढरा फटफटीत पडला. तो उसने अवसान आणायचा प्रयत्न करीत होता, एवढ्यात कार्टन त्याला म्हणाला, ''एक तासापूर्वी मी तुला तुरुंगातून बाहेर येताना पाहिलं. चेहरे माझ्या चांगले स्मरणात राहतात. मी तुझ्या मागावर होतोच. तू काय बोलतोस हे ऐकत होतो. मी तुला चांगला ओळखून आहे. चल माझ्याबरोबर टेलसन् बँकेत!''

''काय म्हणून?''

''हे बघ, केवळ तुझ्या बहिणीसाठी म्हणून मी तुझ्याशी सभ्यतेने बोलतोय. नाहीतर तुला समजावायची दुसरी भाषा माझ्याजवळ आहे. मग बऱ्या बोलाने येणार आहेस की नाही?''

''येतो, येतो.'' सॉलोमन ऊर्फ बरसाड लाचारीने म्हणाला.

''ठीक आहे. अगोदर तुझ्या बहिणीला सुखरूप पोचती कर नि मग जाऊ!''

प्रासबाईला डॉक्टर मॅनेट यांच्या घरी पोचविल्यानंतर

कार्टन तिच्या भावाला घेऊन लॉरीच्या बिऱ्हाडी आला. लॉरी एका शेगडीपाशी शेकत बसला होता. कार्टनबरोबर कोणी नवीन माणूस आलेला पाहून तो जरा आश्चर्यचकित झाला. कार्टन आत येताच म्हणाला, ''हे प्रासबाईंचे बंधू बरसाड.''

''बरसाड! मला वाटतं हे नाव मी कधी तरी ऐकलंय.'' म्हातारा लॉरी उद्गारला.''चेहराही पाहिल्यासारखा वाटतो!'' नंतर थोडा वेळ थांबून तो पुन्हा म्हणाला, ''हा डार्नेच्या खटल्यातला बनावट साक्षीदार तर नव्हे?''

''प्रासबाई याला भाऊ म्हणून ओळखत असली, तरी मी त्याला हेर म्हणूनच चांगला ओळखतो. जाऊद्या. पण वाईट बातमी म्हणजे डार्नेला पुन्हा अटक झाली आहे.'' आपले मन विचलित होऊ न देता लॉरी शांतपणे ऐकू लागला. ''मला वाटतं डॉक्टर मॅनेट यांच्या नावाचा उपयोग कालच्यासारखा पुढेही होऊ शकेल.'' कार्टन बोलू लागला.

''पण त्याला पकडलं त्यावेळी डॉक्टर मॅनेट तिथे होते ना?'' लॉरीने विचाले.

''होते. पण त्यावेळी तरी ते काही करू शकले नाहीत!''

''मग पुढे तरी ते काय करणार? आता जरा कठीणच दिसतं.''

''आताच तर खरी आणीबाणीची वेळ आहे. जे काही करायचं ते तातडीनेच केलं पाहिजे.'' नंतर तो बरसाडला म्हणाला, ''बरसाड, तुरुंगातल्या माझ्या एका मित्रासाठी मला काही करता येईल का?''

''डाव पद्धतशीर नि युक्तीने टाकता आला तर नक्कीच करता येईल.'' बरसाड उत्तरला.

त्याच्याकडे बारकाईने पाहात कार्टन बोलू लागला. ''बरसाड, तू क्रांतिवाद्यांचा हेर म्हणून काम करीत आहेस. तू जन्माने इंग्रज. त्यामुळे स्थानिक उलाढालींशी तुझी श्रद्धा निगडित असायचं काहीच कारण नाही. एके काळी इंग्रज सरकारचा हेर म्हणूनही तू काम केलं आहेस. कदाचित् अद्यापि तू तेच काम करीत असावास. मग तुझं हे स्वरूप तुझ्या नव्या फ्रेंच सरकारपुढे मी उघडं करावं काय?''

बरसाडची अवस्था केविलवाणी झाली. सेंट अँतोन विभागात आपण हेरगिरी करीत होतो, याची आठवण त्याला झाली. दफार्जबाईकडे आपली नोंद झाली असण्याची शक्यता त्याला जाणवली. तो इंग्लंडला परत जाऊ शकत नव्हता आणि फ्रान्समध्ये सुरक्षित नव्हता. अशा स्थितीत कार्टनने काही हालचाल केल्यास आपला शिरच्छेद व्हायला वेळ लागणार नाही, याची त्याला खात्री होती. त्याचा चेहरा पडला.

कार्टनने त्याला जरा दरडावूनच विचारले, ''काय रे? मग तू माझ्यासाठी डाव टाकणार की नाही?''

बरसाडने लॉरीचा आश्रय घ्यायचा प्रयत्न केला, पण लॉरीने त्याला मुळीच दाद दिली नाही. कार्टनने पुन्हा त्याला दरडावले, ''तू ज्याच्या बरोबर बोलत होतास, तो कोण?''

''तो एक फ्रेंच माणूस होता, पण तो विशेष महत्वाचा नाही!''

''त्याची फ्रेंच भाषा मोडकी-तोडकी होती. तो परकीय होता. तो क्ले होता. खरं की नाही? डार्नेच्या खटल्यातला तो दुसरा साक्षीदार! तुझा जोडीदार!''

बरसाड या सरबत्तीने पुरा चीत झाला. तरी पण निर्लज्जपणे म्हणाला, ''नाही! तुमची काहीतरी चूक होतेय!''

''ठीक आहे. मग मी तुला सांगतो ऐक. तू दुसऱ्या एका इंग्रज हेराशी बोलत होतास! तुला माझ्या योजनेत सामील व्हायचं नसेल, तर तुझ्यासाठी वधस्तंभ केव्हाही तयार आहे.''

''नको! नको!! मी सामील व्हायला तयार आहे.'' बरसाड गयावया करीत म्हणाला. नंतर थोडा वेळ थांबून पण जरा विचार केल्यासारखे करून त्याने विचारले, ''ठीक आहे. आता मला इथे फार वेळ थांबता येणार नाही. मला दुसऱ्या एका कामासाठी गेलंच पाहिजे! पण तुम्हाला माझ्याकडून काय हवं आहे ते तर सांगा.''

''ज्या तुरुंगात डार्ने कैदेत आहे, तिथे तू द्वाररक्षक आहेस की नाही? आत बाहेर जा-ये करणं तुला शक्य आहे की नाही?''

''ते खरं आहे. पण तिथून एखाद्याची सुटका करणं अशक्य आहे!''

''ते मी तुला विचारीत नाही. चल त्या खोलीत. मला तुझ्याशी काही बोलायचं आहे.''

काही वेळाने कार्टन आणि बरसाड बाहेर आले. त्याचे

काय खलबत झाले, ते कळायला काहीच मार्ग नव्हता. त्याला निरोप देताना कार्टन म्हणाला, ''आपली योजना आता ठरली आहे. माझी भीती बाळगायचं तुला मुळीच कारण नाही?''

बरसाड निघून गेल्यावर लॉरीने विचारले, ''तुमची काय योजना ठरली आहे?''

''मी एकदा डार्नेची भेट घेणार आहे.'

पण त्यामुळे त्याचे प्राण कसे वाचणार आहेत?'' लॉरी पाणावलेल्या डोळ्यांनी म्हणाला.

''मग असं रडत बसून वाचणार आहेत होय? तुमच्या या रडवेपणानेच मला तुमच्याबद्दल आदर वाटेनासा झाला आहे.'' कार्टनच्या स्वभावाची ही उदात्त बाजू पाहून लॉरी भारावून गेला. त्याने कार्टनचा हात प्रेमाने दाबला.

कार्टन पुढे म्हणाला, ''मी डार्नेला भेटणार आहे याचा थांगपत्ता ल्यूसीला मात्र लागू देऊ नका. मी तिला इतक्यात भेटणार नाही, फक्त तिला मदत कशी करणं शक्य आहे, एवढंच पाहाणार आहे. तुम्ही आता ल्यूसीकडे जाणार आहात वाटतं?''

''होय! मी आत्ताच जावं म्हणतो!''

''छान! तुमच्याबद्दल तिला फार आदर आहे. आता ती कशी काय आहे?''

''फार दु:खी आहे!'' लॉरीने सोडलेला सुस्कारा जवळ जवळ हुंदकेवजा होता.

''या शहरातलं तुमचं काम संपलं का?'' कार्टनने विचारले.

''माझं इथलं सर्व काम मी बहुतेक आवरलं आहे. इथून निघायची माझी तयारीही पूर्ण होत आली आहे. पण ही मंडळी सुरक्षित आहेतसं पाहून मगच माझा निघायचा विचार आहे.''

नंतर काही वेळ स्तब्धतेत गेला. जराशाने कार्टन म्हणाला, ''मी तुम्हा सर्वांना दीर्घायुरारोग्य चिंतितो. ल्यूसी व तिची कुटुंबीय मंडळी यांना न भेटल्यामुळे मात्र मला जरा चुकल्या-चुकल्यासारखं वाटतंय.''

''बरोबर आहे. तुम्ही त्यांना भेटायला हवं होतं.''

कार्टनने शेगडीवर आपले हात जरा शेकले. मग तो अगदी सहज लॉरीला म्हणाला, ''तुम्हाला आपलं बालपण आपल्यापासून फार दूर गेलं असं कधी वाटतं का?''

त्याच्या आवाजातील कोमलता व प्रश्नांतील सहृदयता पाहून लॉरी स्तिमित झाला. हा माणूस आज त्याला काही वेगळाच भासू लागला.

''मी माझ्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर येऊन ठेपलो असलो, तरी माझं बालपण माझ्यापासून दूर गेलं आहे, असं मला कधीच वाटत नाही. बालपणीच्या कित्येक सुखद आठवणी अद्यापि माझ्या मनात तरंगत असतात.''

''म्हणूनच तुम्ही आजही तारुण्यातला हुरूप टिकवून आहात!''

कार्टन उठला आणि त्याने लॉरीचा कोट त्याच्या अंगावर चढवायला मदत केली.

''आपण लगेच बाहेर पडायचं का?'' लॉरीने विचारले.

''हो ना! मीही तुमच्याबरोबर ल्यूसीच्या घरापर्यंत येणार आहे. माझ्या चंचल स्वभावाची तुम्हाला चांगली कल्पना आहे.''

''पण तुम्ही न्यायालयात जाणार आहात ना?''

''हो. जाणार आहे. पण मोठ्या नाखुशीने!''

''मीही तिथे जमावातला एक म्हणून हजर राहावं म्हणतो.''

▪ ▪ ▪

ल्यूसीच्या घरापाशी येताच लॉरीला सोडून कार्टन पुढे निघाला. रस्त्यावरील एका दिव्याखाली उभे राहून त्याने एक चिटोरे खरडले. नंतर बरीच आडवळणे घेत तो एका औषध विक्रेत्याच्या दुकानापुढे येऊन उभा राहिला. औषध विक्रेता 'अष्टावक्र' दिसत होता. कार्टनने आत जाऊन ते चिटोरे दुकानदारापुढे ठेवले. हलके हलके शीळ घालीत तो कुबडा दुकानदार म्हणाला, ''हे तुमच्यासाठी हवंय् का?''

''होय. माझ्यासाठीच!''

''हे पाहा, या दोन्ही वस्तू अलग अलग ठेवायची खबरदारी घ्या. मिसळल्या तर काय होतं ते तुम्हाला माहीत असेलच!''

नंतर दुकानदाराने दोन लहान लहान पाकिटे सिडने कार्टनच्या हाती दिली. सिडनेने ती कोटाच्या आतल्या खिशात नीट ठेवून दिली. मग पैसे चुकते करून तो बाहेर पडला. ''आता उद्यापर्यंत तरी काही काम नाही, तेव्हा

झोपेची आराधना करावी.'' तो स्वत:शी पुटपुटला. त्याचा चेहरा अगदी शांत व निर्विकार दिसत होता.

बऱ्याच वर्षांपूर्वी आपल्या मृत पित्याच्या थडग्यापाशी कार्टन शोक करीत बसला असताना त्याचे सांत्वन करताना कोणी तरी म्हणाले होते, ''जो परमेश्वरावर विश्वास ठेवतो, त्याला चिरजीवन मिळतं. त्याला मृत्यू स्पर्श करीत नाही!'' पॅरिस नगरीच्या भयानक वातावरणातून तो चालला होता. कोठेतरी जाऊन थोडा वेळ विश्रांती घ्यायचा त्याचा विचार होता. पण ते शब्द मात्र त्याच्या कानात सारखे घुमत होते. या शहरात रात्रंदिवस जीवन-मृत्यूचा संग्राम चालू होता. विचारात असतानाच त्याने नदी ओलांडली. तो शहराच्या जरा शांत भागात आला होता. रात्र बरीच झाली होती. तसे वातावरणही शांत होत होते!

पहाट झाली तरी तो नदीकिनारीच उभा होता. सूर्याचे कोमल किरण सर्वत्र पसरले. त्यामुळे नदीचे पाणी चमकू लागले. त्या प्रकाशाच्या उबेने त्याला पेंग येऊ लागली. थोडा वेळ डुलकी घेऊन तो भानावर आला, तेव्हा त्याला चांगलीच हुशारी वाटू लागली.

कार्टन परत आला तेव्हा लॉरी कुठे बाहेर गेला होता. त्याने थोडी कॉफी घेतली, स्नान केले, कपडे बदलले आणि तो न्यायालयाकडे जाण्यास बाहेर पडला. सर्वत्र एकच गडबड उडालेली होती. डॉक्टर मॅनेट, ल्यूसी, लॉरी वगैरे मंडळी आधीच न्यायालयात येऊन दाखल झाली होती. डार्नेला जेव्हा न्यायालयात आणले, तेव्हा ल्यूसीने त्याच्याकडे अशा प्रेमाने व धैर्याने पाहिले की, डार्नेला दुप्पट बळ चढल्यासारखे वाटले. त्याच्या डोळ्यात एक निराळेच तेज दिसू लागले.

या न्यायालयात काही शिस्त नव्हती. येथे न्यायदानासारखे काही पवित्र काम चालणार आहे, असे मानायला मुळीच जागा नव्हती. अत्यंत क्रूर अशी माणसे न्यायाधीश व ज्यूरी म्हणून स्थानापन्न झाली होती. प्रत्येकाच्या डोळ्यात खून चढलेला दिसत होता. न्यायाधीशाने विचारणा केली, ''डार्नेवर आरोप ठेवणारे कोण आहेत?''

तत्काळ अर्नेस्ट दफार्ज, त्याची पत्नी थेरेसा दफार्ज व डॉक्टर मॅनेट या तिघांच्या नावाचा पुकारा झाला. आणि मग सर्वत्र एकच कोलाहल माजला. आश्यर्चचकित झालेले डॉक्टर मॅनेट थरथर कापत कसेबसे उभे राहिले. त्यांचा चेहरा प्रेतासारखा पांढरा फटक पडलेला होता. ते म्हणाले, ''नागरिक बंधूंनो, ही घटना बनावट आहे. बंदी माझा जावई असून तो मला प्राणांपेक्षाही प्रिय आहे! मी त्याच्यावर आरोप करणं कसं शक्य आहे?''

''मॅनेट, खऱ्या नागरिकाला आपल्या लोकसत्तेपेक्षा अधिक प्रिय काही असूच शकत नाही. आपल्या लोकसत्तेसाठी, आपल्या अपत्याचाही बळी द्यायची तयारी पाहिजे!'' न्यायालयाचा अभिप्राय ऐकताच डॉक्टर मॅनेट थरथर कापत मटकन् खाली बसले. जमलेल्या जमावाने फिरून एकदा आरडाओरडा केला. यानंतर दफार्ज आपला पुरावा सादर करण्यासाठी पुढे आला. त्याने प्रथम डॉक्टर मॅनेट यांचा प्रदीर्घ कारावास व त्यांची मुक्तता याची हकीकत सांगितली. तो म्हणाला, ''डॉक्टर मॅनेट बुद्धिभ्रंशाच्या लहरीत स्वत:ला 'एकशेपाच, उत्तर मनोरा' असं संबोधीत. मी बॅस्टील सर केल्यानंतर जे कागदपत्र हस्तगत केले, त्यात डॉक्टरांनी स्वत: लिहिलेल्या आपल्या हकीकतीचा कागद मला मिळाला आहे. तो मी इथे हजर करीत आहे. त्यात बंदी का दंडनीय आहे, याचं मूळ सापडेल!''

''हा कागद वाचला पाहिजे!'' न्यायालयाने हुकूम केला. एकाएकी सर्वत्र प्रगाढ शांतता पसरली.

डॉक्टर मॅनेट यांच्या आत्मवृत्तान्ताचे कथन चालू झाले.

●●●

## १७. बदमाश बंधू

''एके दिवशी सायंकाळी मी पॅरीस शहरात नदीकिनाऱ्याने चाललो होतो. इतक्यात एक घोडागाडी मजजवळ येऊन उभी राहिली. कोणीतरी माझे नाव पुकारले व सर्वांग झुब्ब्याने आच्छादलेली दोन माणसे माझ्याजवळ येऊन ठेपली. ते दोघेही माझ्याच वयाचे असून जुळे भाऊ असावेत असा भास होत होता.

'तुम्हीच डॉक्टर मॅनेट काय?' त्यातील एकाने मला विचारले. मी नम्रपणे होकार दिला. 'आम्ही तुमच्या घरी जाऊन आलो, पण तुम्ही इकडे आल्याचे कळले म्हणून आम्हाला इकडे यावे लागले. कृपया तुम्ही गाडीत बसून आमच्या बरोबर चला!' या उभयतांची वागणूक जरा हुकूमशाहीचीच होती. दोघेही शस्त्रसज्ज होते. तरीही मी त्यांना 'तुम्ही कोण?' म्हणून विचारलेच. त्यांचे काय काम आहे, याचीही चौकशी केली.

त्यांच्या सांगण्यावरून असे दिसले, की ते बड्या सरदार घराण्यातील असून, कोणातरी अत्यवस्थ रुग्णाला मी उपचार करावेत अशी त्यांची इच्छा होती. मला त्यांनी गाडीत बसायला जवळ जवळ भागच पाडले.

एका ओसाड ठिकाणी असलेल्या घरापाशी त्यांनी मला आणले. घराच्या एकूण देखाव्यावरून ते फारसे वापरात नसावे, असे दिसत होते. दरवाजा उघडला जाताच दोघाही बंधूंनी दार उघडणाऱ्या नोकराच्या तोंडावर सणसणीत थपडा मारल्या. दरवाजा उघडायला किंचित विलंब लागला, एवढाच त्याचा अपराध!

एका खोलीतून स्त्रीच्या आवाजातल्या करुण किंकाळ्या एकसारख्या ऐकू येत होत्या. मी आत गेलो. एक तरुणी तापाने फणफणत बिछान्यावर पडली होती. तिचे हात एका रुमालाने बांधून ठेवलेले होते. छळ व मनस्ताप यांमुळे तिला वाताचा झटका आल्यासारखे झाले होते. तिच्या हातांना बांधलेल्या रुमालावर 'ई' हे अक्षर मला स्पष्ट दिसत होते.

ती तरुणी गुदमरून मृत्यूपंथास लागली होती. मी तिला नीट झोपविले. ती सारखी किंचाळत होती. 'माझे पती! माझा भाऊ! माझे वडील!' नंतर तिने एक, दोन करीत बारापर्यंत आकडे मोजले. तिच्या बडबडण्यावरून मला साधारण कल्पना आली, की हिला बाप, भाऊ, नवरा, वगैरे नातलग असावेत, पण तिचे बारापर्यंत आकडे मोजणे हे एक कोडेच होते. मी त्या दोघांपैकी एकाला हा प्रश्न विचारला. पण तो बेफिकिरीने म्हणाला, 'बारा म्हणजे बारा वाजता!' जवळच टेबलावर एक औषधांची पेटी दिसली, त्यातली काही औषधे मी त्या तरुणीला दिली आणि त्यांचा परिणाम काय होतो हे पाहात बसलो. तिच्या करुण किंकाळ्या चालू होत्या, पण धडपड मात्र थोडी कमी झालेली दिसली. 'आता आपल्याला दुसरा एक रोगी पाहायचा आहे'. दुसरा भाऊ म्हणाला. मी दचकून विचारले, 'तो ही तातडीने पाहायला हवा का?' 'आपण तोही आत्ताच पाहिलेला बरा!' मोजके उत्तर मिळाले व लगेच त्यांनी मला दुसऱ्या एका खोलीत नेले.

तेथे जमिनीवर अंथरलेल्या गवतावर एक तरुण पडला होता. तरवारीच्या अनेक घावांनी त्याचा देह पिंजून निघाला होता. विलक्षण रक्तस्राव झाल्याने तो आपले अखेरचे क्षण मोजीत होता. त्याच्या जखमांकडे पाहात मी विचारले, 'हे कोणाचे काम?' 'या सडकेवरील कुत्र्याने माझ्या भावावर चाल केल्यामुळे त्याला आपली तरवार चालविणे भाग पडले.' उर्मट उत्तर मिळाले.

मी त्या तरुणावर उपचार केले, पण तो वाचण्याची शक्यता नव्हती. झालेल्या उपचारांनी व आलेल्या संतापाने त्याला एकदम चेव आला. त्या भरात तो म्हणाला, 'ही सरदारी अवलाद मोठी घमेंडखोर आहे! ती आम्हा गरिबांना कुत्री समजते. यांनी माझ्या मेव्हण्याचा जीव घेतला. मी मदतीसाठी गेलो, तर माझी ही दशा केली. त्यांची ही सारी पापे कोणाच्या तरी कानी घालावीत, म्हणून मी जीव तगवून धरला आहे. बरोबर बारा वाजता यांनी हे दुष्कृत्य केल्यामुळे माझी बहीण तेच बडबडत आहे. या दुष्ट घराण्याचे बारा वाजले पाहिजेत.' एवढे बोलून त्याने प्राण सोडला.

त्याच्या बहिणीने कसाबसा आठ दिवसपर्यंत आपला जीव तगवून धरला होता. या काळात मी तिला

औषधोपचार करून जाई, पण तिने आपल्या नावगावाचा काहीच थांगपत्ता लागू दिला नाही. तिला आणखी एक लहान बहीण असावी, पण तिचा आपल्यासारखा छळ होऊ नये म्हणून ती तिचा ठावठिकाणा सांगायला तयार नसावी, एवढा कयास मी बांधला. शेवटी एके दिवशी ती बिचारीही मरण पावली.

त्या उभयता बंधूंनी मला पैसे देण्याचा खूप प्रयत्न केला, पण मी पैसे घेण्यास स्पष्ट नकार दिला; कारण ही सर्व घटना गुप्तपणे एखाद्या मंत्र्याच्या कानावर घालावी व या अत्याचारी बंधूंना चांगली अद्दल घडवावी, असा माझा विचार होता. या साऱ्या घटना मी निवेदनरूपाने लिहूनही काढल्या. पण एके दिवशी एक तरुण स्त्री मला भेटायला आली. सरदार एव्हरमाँद यांची आपण पत्नी असल्याचे तिने मला सांगितले. दुर्दैवाने अत्यंत क्रूर अशा घराण्यात पडण्याचा प्रसंग तिच्यावर आला होता. घडलेल्या अत्याचाराचे प्रवर्तक आपला दीर व नवरा असल्याचे तिने सांगितले. तिने आपल्या मुलाला त्यांच्यापासून दूर ठेविले होते. त्याने पुढे-मागे आपल्या पित्याने व चुलत्याने केलेल्या अन्यायाचे परिमार्जन करावे, अशी तिची मनीषा होती. ती तरुण होती, सुंदर होती, पण त्या अधमांच्या तावडीत ती फार काळ जगेल, असे वाटत नव्हते. मी तिला या कामी मदत करावी, अशी तिची फार इच्छा होती. पण ते शक्य झाले नाही. त्याच रात्री एक अगदी खालावलेला रोगी तपासायचा आहे या सबबीवर काही माणसे मला बोलवायला आली. मी विचार न करता गाडीत चढलो आणि माझी बॅस्टीलच्या तुरुंगात रवानगी झाली. मी एका अंधारकोठडीत बंदिस्त झालो. हे सर्व कारस्थान त्या बदमाश भावांचे होते. हे सर्व कुटुंबच्या कुटुंब अपराधी आहे. त्यातील प्रत्येक व्यक्तीला या गुन्ह्याचे प्रायश्चित्त मिळाले पाहिजे.''

कागद वाचून झाला. दफार्जबाईने सांगितले, ''त्या दगावलेल्या बहीण-भावंडाची मागे जिवंत राहिलेली बहीण मी आहे आणि त्या दुष्ट भावांचा वारसा डार्नेकडे आहे. डॉक्टरांना भेटलेल्या तरुण सरदार स्त्रीचा तो मुलगा म्हणजेच डार्ने!''

''एव्हरमाँद घराण्याचा दुष्कृत्यांचा भरपूर पुरावा उपलब्ध झाला आहे. या घराण्याचा समूळ उच्छेद होणं रास्त आहे. डॉक्टरांनी या कामी उपलब्ध केलेल्या पुराव्याबद्दल फ्रेंच लोकसत्ता त्यांची ऋणी आहे. या प्रकरणात त्यांच्या मुलीला वैधव्य प्राप्त होणार आहे, पण त्याची खंत त्यांना वाटणार नाही.'' न्यायाधीश बोलू लागले.

''आता डॉक्टर डार्नेला कसा वाचवतात पाहूया!'' दफार्जबाई 'सूडबया'कडे पाहात हसत म्हणाली.

''डार्नेला परत तुरुंगात न्यावं नि पुढील चोवीस तासांत त्याचा शिरच्छेद करावा!'' न्यायालयाने निर्णय दिला आणि मग सर्वत्र एकच कोलाहल माजला.

●●●

## १८. वेगळीच प्रेरणा

शिक्षेचा उच्चार होताच, एखाद्या जखमी हरिणीप्रमाणे ल्यूसी व्याकूळ झाली, पण तत्काळ तिने आपले मन आवरले. आपल्या अशा वागण्याने आपल्या पतीला मदत तर होणार नाहीच, पण उलट त्याला मनस्ताप होईल, हे जाणून तिने आपला शोकावेग आवरला. न्यायालय एव्हाना रिकामे झाले होते. डार्नेपाशी फक्त दोन पहारेकरीच काय ते होते. तेथे उभा असलेला तिसरा माणूस बरसाड त्यांपैकी एकाला म्हणाला, ''कैद्याच्या पत्नीला त्याची एकदा अखेरची भेट घेऊदे!'' त्याने विशेष आढेवेढे न घेता तशी परवानगी दिली. उभयता पती-पत्नीनी एकमेकांचा निरोप घेतला. डार्ने धैर्याचा मूर्तीमंत पुतळा भासत होता; पण ल्यूसीचे हृदय मात्र दुभंगून गेले होते. ल्यूसीच्या पाठोपाठ तिचे वडीलही आले होते. त्यांनी क्षमायाचनेसाठी डार्नेपुढे गुडघे टेकले. तोच डार्ने दु:खावेगाने म्हणाला, ''छे:! छे:!

माझी कसली क्षमा मागता आपण? आपल्याला पूर्वी काय यातना झाल्या, ते मला आज कळलं. माझ्या कुटुंबाचा इतिहासही ऐकायला मिळाला. माझ्या आईसाठी आपण केवढी तसदी घेतली आहे! परमेश्वर आपल्याला सुखी ठेवो! मी आपला सदैव ऋणी आहे!''

डार्नेला तेथून नेले त्यावेळी ल्यूसीने त्याच्याकडे सस्मित मुद्रेने व प्रेमाने पाहिले. नंतर एका कोपऱ्यात उभा असलेला सिडने कार्टन पुढे आला आणि त्याने ल्यूसीला आधार दिला. एका घोडा-गाडीतून त्याने त्या सर्वांना त्यांच्या बिऱ्हाडी पोचविले.

ल्यूसीची अवस्था पाहून प्रासबाई व छोटी ल्यूसी यांना रडू कोसळले.

''ठीक आहे. तिला झोपवा! जराशाने तिला बरं वाटेल!'' कार्टन म्हणाला. छोट्या ल्यूसीने कार्टनच्या गळ्याला मिठी मारली आणि ती म्हणाली, ''काका, माझ्या आईला नि वडिलांना तुम्हीच वाचवू शकाल!''

''जरूर! पोरी, मी माझ्या प्रयत्नांची शिकस्त करीन!'' एवढेच कसेबसे बोलून कार्टन मोठ्या जड अंत:करणाने तेथून बाहेर पडला.

शेजारच्या खोलीत बसलेल्या डॉक्टर मॅनेटना तो जाता-जाता म्हणाला, ''आपण न्यायाधीशाकडे जाऊन काही प्रयत्न करून पाहाणार का? अवधी फार थोडा आहे!''

''क्षणाचीही विश्रांती न घेता मी जरुर जाईन. आशा दिसेल तिथे धाव घेण्याची माझी तयारी आहे!''

''आशेला फारशी जागा नाही. तरीही प्रयत्न करून पाहायचा, एवढंच! आपण साधारण केव्हा जाल?''

''अगदी ताबडतोब!''

''ठीक आहे. काय झालं ते समजून घेण्यासाठी मी लॉरीच्या बिऱ्हाडी रात्री आपल्याला भेटेन.''

कार्टनला निरोप द्यायला लॉरी बाहेर आला आणि त्याला म्हणाला, ''मला तरी काही आशा दिसत नाही!''

''मलाही दिसत नाही. त्याच्या मानेवर कुऱ्हाड पडणारच, पण वैतागून, निराश होऊन तरी काय होणार? मी डॉक्टरना न्यायाधीशाची भेट घ्यायला सांगितलं, त्यातला उद्देश एवढाच, की आपण प्रयत्नात कसूर केली, असं ल्यूसीला वाटू नये.''

''ते बरोबर आहे, पण मला मात्र कोणतीच आशा वाटत नाही!'' अश्रू पुशीत लॉरी म्हणाला.

कार्टन चालता चालता वाटेत मध्येच थांबला. कोठे जावे याचा विचार त्याच्या डोक्यात घोळत होता. शेवटी त्याने आपले पाय सेंट अँतोन विभागाकडे वळविले. दफार्जचा गुत्ता हुडकून काढायला त्याला मुळीच वेळ लागला नाही. तो सरळ आत शिरला. ज्यूरी म्हणून काम करणारा जॅक्स क्रमांक तीन, दफार्ज पती-पत्नी आणि 'सूडबया' एवढीच मंडळी आत बसली होती. कार्टनने एके ठिकाणी बसून मोडक्या तोडक्या फ्रेंच भाषेत मद्याची मागणी केली. त्याचा स्वरोच्चार ऐकून दफार्जबाईने विचारले, ''आपण इंग्रज आहात काय?'' प्रश्न आपणाला नीट समजला नाही असे भासवीत, कार्टनने आपण परकीय असल्याचे सांगितले. दफार्जबाई त्याच्यासाठी मद्य आणायला आत गेली असता कार्टनने वृत्तपत्र वाचण्यात दंग झाल्याचा आव आणला, पण त्याचे सर्व लक्ष दफार्ज मंडळीच्या हालचालीवर होते.

''हा प्राणी तर हुबेहूब एव्हरमाँद सारखा दिसतोय्!'' दफार्जबाई आपल्या नवऱ्याला म्हणाली. दफार्जने एकदा कार्टनने नजर टाकली आणि पत्नीच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

जॅक्स क्रमांक तीन म्हणाला, ''झाडून सारे एव्हरमाँद निकालात निघाले पाहिजेत!''

सूडबया म्हणाली, ''मग डार्नेची बायको आणि मुलगी तरी का सोडायची? डॉक्टर मॅनेटसुद्धा गेले तरी चालतील!''

या भाषणाने दफार्ज चांगलाच बावचाळला. त्या लोकांच्या या अतिरेकी सूडबुद्धीची त्याला मनस्वी चीड आली. त्याला डॉक्टर मॅनेट व ल्यूसी यांच्याबद्दल हळहळ वाटली.

''डॉक्टर मॅनेट हा काही फ्रेंच लोकसत्तेचा खरा मित्र नाही!'' दफार्जबाई म्हणाली. ''हे सगळे मेले तरी चालेल. या एव्हरमाँद घराण्याने ज्या गरीब कुटुंबाचा विध्वंस केला, ते माझं कुटुंब होतं! एव्हरमाँद कुटुंबाचा सत्यानाश केल्याखेरीज मला आता चैन पडणार नाही. क्रांतीची आग तुम्हाला आटोक्यात आणता येईल, पण माझ्यापुढे तुमची मात्रा मुळीच चालणार नाही!'' दफार्जची सहानुभूती ल्यूसी अगर डॉक्टर मॅनेट यांना लाभणे अशक्य आहे, याची

जाणीव कार्टनला झाली. मद्यप्राशन करून तो तेथून बाहेर पडला.

रात्री नऊ वाजायच्या सुमारास तो लॉरीच्या बिऱ्हाडी येऊन दाखल झाला. डॉक्टर मॅनेट तेथे अगोदरच आलेले होते. ते अत्यंत त्रासलेले दिसत होते, कारण त्यांच्या म्हणण्यास कोणीच दाद दिली नव्हती. मध्यरात्रीपर्यंत सगळेच विचार करीत बसले होते. डॉक्टर मॅनेटना पुन्हा बुद्धिभ्रंशाचा झटका येणार की काय, अशी भीती वाटू लागली होती. ल्यूसीची काय अवस्था होणार, या विचाराने सारेच चिंतातुर होऊन गेले होते.

शेवटी कार्टन म्हणाला, ''यांना आपण आता ल्यूसीकडे घेऊन जाऊया. आणि हे पाहा, तुम्ही सारे आता माझ्या सांगण्याबरहुकूम वागाल असं वचन मला अगोदर द्या! आज मला काही वेगळीच प्रेरणा होत आहे यात शंका नाही!''

कार्टनने डॉक्टरांचा कोट त्यांच्या अंगावर चढविण्यासाठी उचलला आणि एक कागद खाली पडला, तो हाती घेऊन त्याच्याकडे पाहात कार्टन उद्गारला,''परमेश्वरा, तुला धन्यवाद!'' त्याने दुसरा तसलाच कागद आपल्या खिशातून बाहेर काढला. ''हे पाहा, हे शहर वा देश सोडून जाण्याचे हे परवाने आहेत. एक डॉक्टर मॅनेटना उपयोगी पडेल व दुसरा ल्यूसी आणि तिची मुलगी यांच्यासाठी वापरता येईल. परवाने रद्द होईपर्यंत पुढे चालू राहायचे आहेत. तसे ते कायम स्वरूपाचे असल्यामुळे रद्द होण्याची शक्यता नाही! दफार्जबाई ल्यूसीसुद्धा सर्वांना गोत्यात आणायच्या नादात आहे. तेव्हा या सर्वांना वाचवायची खटपट केलीच पाहिजे.''

''ते ठीक आहे. पण ती करायची कशी?'' लॉरीने विचारले.

''आपल्याकडे पैसे आहेत. जास्तीत जास्त जलद प्रवासाची साधनं पैदा करून उद्या पहाटे गाडी-घोडे सज्ज ठेवा! ल्यूसीला म्हणावं, तुझे वडील आणि मुलगी यांचे जीव धोक्यात आहेत. तुझ्या पतीची अशी इच्छा आहे, की निदान त्यांचे प्राण वाचावेत. सर्व काही जय्यत तयार ठेवा. कशासाठीही थांबू नका. मी येताच एकदम निघायचं आहे. समजा, मी नाहीच आलो तर, माझ्याऐवजी दुसरा कोणीतरी येईल! त्याला घेऊन इंग्लंडच्या दिशेने दौड करा, समजलं!''

''समजलं!'' त्याचा हात प्रेमाने दाबीत लॉरी म्हणाला. ''यात काडीमात्र बदल होणार नाही असं वचन द्या. कारण लॉरी, अनेकांचे प्राण तुमच्यावर अवलंबून आहेत! मी माझी कामगिरी नक्कीच चोख बजावीन.''

''ठीक आहे. मीही माझी कामगिरी तितकीच चोख बजावतो!'' सर्वजण ल्यूसीच्या बिऱ्हाडी परतले. ल्यूसीच्या खिडकीतून दिसणाऱ्या प्रकाशाकडे पाहात कार्टन काही वेळ रस्त्यात उभा राहिला आणि नंतर तेथून निघून गेला.

●●●

## १९. हा काय मूर्खपणा

चार्लस् डार्ने एकटाच अंधार कोठडीत बसला होता. त्याची सर्व आशा नष्ट झाली होती. तरीही मनाने त्याने जीवन-धागा घट्ट धरून ठेवला होता. त्यावरील आपली पकड सैल होणार नाही, अशी त्याची मनोदेवता त्याला सांगत होती. मनात विचारांचे काहूर माजणे स्वाभाविक होते, पण त्याचे मनोधैर्य मात्र मुळीच विचलित झाले नव्हते.

आपल्या आधी अनेक निर्दोष, निराधार, माणसे मृत्यूमुखी पडली आहेत, या विचाराने उलट त्याला धीरच आला. त्याने ल्यूसीसाठी एक लांबलचक पत्र लिहिले. डॉक्टर मॅनेटनाही एक लिहिले, 'आपण आपला जीवनवृत्तांत लिहिण्यात काही चूक केली, असे मानण्याचे कारण नाही. भवितव्यतेने आपली सांगड घातली, यात आपला काय दोष?' त्याने लॉरी व छोटी ल्यूसी यांच्यासाठीही काही मजकूर लिहिला होता, पण कार्टनची आठवण मात्र त्याला झाली नाही.

त्याचा जरा डोळा लागला नि तेवढ्यात त्याच्या

डोळ्यापुढे लंडनमधील त्या निवांत निवासस्थानाचे चित्र उभे राहिले. आपण तेथे आहोत, असा भास झाला. त्या जागेची ऊबही त्याला जाणवली, पण जेव्हा तो जागा झाला, त्यावेळी मात्र आपले सर्वांग थंडीने गोठल्यासारखे झाल्याची त्याला जाणीव झाली. आपल्याला कोणत्या पद्धतीने मरण येणार, याचा विचार त्याला बोचू लागला. त्यात भीतीचा अंश नव्हता, पण इच्छामरण येते की नाही, एवढीच शंका होती. तो अस्वस्थपणे येरझारा घालू लागला, आपली विचारशक्ती मंदावते आहे, अशी त्याला उगीचच शंका आली.

नंतर त्याने प्रार्थना केली. आपल्या शेवटच्या घटका इतर कैद्यांना समाधान प्राप्त करून देण्यासाठी खर्च कराव्यात, असे त्याला वाटू लागले. एवढ्यात दाराबाहेर कोणाची तरी पावले हळूवार वाजली. शुद्ध इंग्रजीत कोणीतरी हलक्या आवाजात म्हणाले, ''विलंब नको!''

दरवाजा उघडला गेला आणि सिडने कार्टन त्याच्यापुढे येऊन उभा राहिला. तो असा काही विलक्षण दिसत होता की, डार्नेला वाटले, आपल्या पुढे जणू पिशाच्च उभे आहे. त्याने डार्नेचा हात पकडून म्हटले, ''मी आता इथं कैदी म्हणून आलो आहे. डार्ने, आता कसलीही नसती उठाठेव न करता मी सांगेन त्याप्रमाणे तू वागावंस, असा ल्यूसीचा तुला खास निरोप आहे. काढ तुझे बूट आणि कपडे! माझे कपडे तुला घालायचे आहेत.''

काय घडत आहे हे कळण्यापूर्वीच बूटांची अदलाबदल केली गेली. ''कार्टन, हा काय मूर्खपणा? यामुळे मी तर सुटणार नाहीच, पण तू मात्र माझ्याबरोबर फुकट मरशील!''

''इथून बाहेर पडल्यानंतर हा शहाणपणा आहे की मूर्खपणा आहे, यावर तुझा अभिप्राय दे. आधी झटकन कपड्यांची अबलाबदल कर बघू!''

''कार्टन, माझ्या मृत्यूत तुझ्या मृत्यूची भर घालण्याची माझी मुळीच इच्छा नाही!''

''मग निदान ल्यूसीसाठी पत्र तरी लिही बघू. हं, कर सुरुवात.''

डार्ने डोके धरून बसला. कार्टन त्याच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवीत होता.

''कसला वास येतोय्?'' डार्नेने विचारले. एवढ्यात त्याच्या नाकावर रुमाल दाबला गेला. तत्काळ गलितगात्र होऊन बेशुद्ध झाला.

कार्टनने झटपट कपड्यांची अदलाबदल केली. तो हळूच म्हणाला, ''आत या आणि पाहा!'' आत आलेल्या हेराला तो म्हणाला, ''तुझी जबाबदारी मोठी आहे. माझी मी पार पाडीत आहे. तुझ्याकडून जराही कुचराई होता उपयोगी नाही. कैद्यांचा नंबर बरोबर आहे ना? आता मी कैदी आहे आणि मूळचा कैदी हा त्याला भेटायला आलेला माणूस आहे. भेटायला आलेल्या माणसाला बेशुद्ध होणं, हा इथला नेहमीचाच प्रकार आहे.'' थरथर कापत बरसाड म्हणाला, ''तुम्ही माझा विश्वासघात तर करणार नाही ना?''

''मी तुला तसं वचन दिलं आहे. या माणसाला लॉरीकडे घेऊन जा. नि त्याला म्हणावं, रात्री वचन दिल्याप्रमाणे अत्यंत तातडीने प्रवास करून इथून निघून जा!'' बरसाडने व त्याने फितुर केलेल्या दोन पहारेवाल्यांनी डार्नेला बाहेर हलविले. कार्टन डोके धरून, मान खाली घालून बसून राहिला. तो कान लावून ऐकत होता, पण कसलीच गडबड वा गोंधळ त्याला ऐकू आला नाही. सुमारे दोन-तीन वाजता तुरुंगाधिकारी आत आला आणि त्याला घेऊन एका मोठ्या दालनात आला. तेथे अनेक कैदी मृत्यूघटीची वाट पहात बसले होते. काही आकांत करीत होते, तर काही मुकाट्याने बसून होते. त्यात एक टपोऱ्या डोळ्यांची सुंदर तरुणी होती. तिची मुद्रा फिकट दिसत होती. ती त्याच्यापाशी आली व म्हणाली, ''एव्हरमाँद, मी तुमच्याबरोबर लोफॉर्सच्या तुरुंगात होते. माझ्यावर लोकसत्तेविरुद्ध कारस्थान केल्याचा आरोप आहे, पण परमेश्वरसाक्ष मला यातलं काही माहीत नाही. मी निरपराध आहे.'' तिने स्मित केले पण त्यामधून तिचे दुःखच प्रगट झाले.

कार्टनच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. त्या गरीब पोरीबद्दल त्याच्या मनात अतीव करुणा निर्माण झाली. ''जर मला तुमच्याबरोबर नेलं, तर मी तुमचा हात धरू का? मला भीती नाही वाटत, पण अशक्तपणा मात्र फारच वाटतो. तुमच्या आधाराने मला धीर येईल.'' कार्टनने त्या मुलीचा हात आपल्या हाती घेतला, तेव्हा त्याच्याकडे रोखून पाहात ती म्हणाली, ''तुम्ही त्याच्यासाठी

आत्मबलिदान करीत आहात वाटतं? त्याच्या पत्नीसाठी, मुलीसाठी, होय ना?''

''चूप! बोलू नकोस! तू मोठी चाणाक्ष मुलगी आहेस!''

''मला तुमचा हात धरूद्या. धन्य आहे तुमची!''

''भिऊ नकोस पोरी, मी तुझा हात आता अखेरपर्यंत सोडीत नाही!''

अगदी याच वेळी पॅरिस शहरातून भरधाव निघालेली एक घोडागाडी मार्गावरील एका मेढेकोटापाशी थबकली. तेथील लष्करी शिपायांनी उतारूंचे दाखले नीट तपासले. ''सिडने कार्टन! डॉक्टर मॅनेट, ल्यूसी मॅनेट!'' त्यांनी उतारूंची नावे मोठ्याने वाचली. सिडने कार्टन बेशुद्ध असल्याबद्दल खेद व्यक्त केला. रक्षकांच्या अनेक प्रश्नांना उतारूंनी उत्तरे दिली. उलट सुलट तपासणी झाली. दाखले परत केले गेले. ''आपण जाऊ शकता!'' रक्षकांनी परवानगी दिली आणि गाडी पुन्हा भरधाव निघाली. गाडीत भीतीचे वातावरण दाटले होते.

''आपण यापेक्षा जलद जाऊ शकतच नाही की काय?'' लॉरीला बिलगलेल्या छोट्या ल्यूसीने विचारले.

''मुली, जरा बाहेर पाहा. आपल्या घोड्यांना जणू पंख फुटले आहेत!''

''आपल्या पाठीमागून कुणी येतंय् का?''

''छे! मार्ग अगदी मोकळा आहे, पोरी. आपण आता अगदी सुरक्षित आहोत!''

घरे, शेते, खेडी, एकामागून एक मागे पडत होती. वारंवार घोडे बदलले जात होते. एकामागून एक कोट निर्वेध ओलांडले जात होते. आता बेशुद्ध माणसाला शुद्ध येऊ लागली होती. त्याला आपण कोठे आहोत हे कळत नव्हते. तो कार्टनची चौकशी करीत होता.

●●●

## २०.'चिंधड्या उडवीन'

नेमकी याच वेळी दफार्जबाई जॅक्सि क्रमांक तीनशी बोलत होती. 'सूडबया' शेजारी उभी होती. ''माझा नवरा तसा चांगला प्रजासत्ताकवादी आहे. धीटही आहे. पण काही बाबतीत मात्र अगदी दुबळा आहे. डॉक्टर मॅनेट यांच्याबद्दल त्याला अकारण दया आहे. हे काही चांगल्या नागरिकाचं लक्षण नाही खास! मला त्या डॉक्टरची मुळीच पर्वा नाही. त्याची मुलगी, नात, ही बळी गेलीच पाहिजेत!'' दफार्जबाई म्हणाली.

''त्या मायलेकींची मान गुलेटिनखाली कचकायला मोठी चांगली आहे!'' जॅक्सि क्रमांक तीन म्हणाला.

''या बाबतीत नवऱ्यावर माझा विश्वास नाही; त्यांच्या सुटकेची खटपट केल्याशिवाय तो राहाणार नाही!'' नंतर शेजारी उभ्या असलेल्या एका सुताराला उद्देशून ती म्हणाली, ''तू शपथपूर्वक त्या बाईवर कारस्थानाचा आरोप करू शकशील का?''

दफार्जबाईला भिणारा तो सुतार म्हणाला, ''जरूर!''

जॅक्सि क्रमांक तीनने सुचविले, ''आपण या लोकांवर करडी नजर ठेवायला हवी हां!''

''आपण आज शिरच्छेद पाहायला जाणारच आहोत ना?'' दफार्जबाईने विचारले.

''हो! जायलाच हवं!'' सूडबया उत्तरली.

''ठीक आहे. ही माणसं तिथं येतीलच. तिथेच आपण सेंट अँतोन विभागामार्फत त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करूया!''

वधस्तंभाकडे जाण्यापूर्वी एकदा ल्यूसीच्या घराला भेट द्यावी, असा दफार्जबाईचा बेत होता. ती डार्नेसाठी शोक करीत असणार आणि देशद्रोही माणसासाठी शोक करणे हा गुन्हा आहे, असाही एक आरोप तिच्यावर करता येईल, असा तिचा कयास होता. तिने अंगावर एक सैलसा झुब्बा घेऊन, त्यात एक सुरा व पिस्तुल दडवून घेतले. मग मोठ्या

धीमेपणाने ती ल्यूसीच्या घराकडे निघाली.

....

आपण निघून गेल्यानंतर काही वेळाने जेरीने व प्रासबाईने निघावे, अशी योजना लॉरीने आखली होती. साऱ्याच माणसांनी एकाच गाडीतून जाणे धोक्याचे होते आणि प्रवासाची गतीही मंदावण्याची शक्यता होती. त्यामुळे या दोघांनी मागाहून दुसऱ्या गाडीने निघावे, असे ठरले होते. मागील गाडीत दोनच माणसे असल्याने, जलद प्रवास करून, ती आपल्याला सहज गाठू शकतील अशी त्याची कल्पना होती.

पहिली गाडी निघून जाताच जेरीने व प्रासबाईने उरले-सुरले सामान-सुमान एकत्रित करून बांधाबांध केली. नंतर प्रासबाई जेरीला म्हणाली, ''जेरी, मला वाटतं आपण एकत्र निघण्यापेक्षा दोन वेगवेगळ्या गाड्यांनी निघावं, म्हणजे कोणाला शंका येणार नाही!''

मग असे ठरले, की जेरीने एका विशिष्ट चर्चपाशी उभे राहावे व प्रासबाई गाडी घेऊन तेथे येताच उभयतांनी पुढील प्रवास चालू करावा. प्रासबाईला सोडून एकट्याने पुढे जावे असे जेरीला वाटत नव्हते, पण प्रासबाईने त्याला पुढे पिटाळलेच.

आता घर रिकामेच पडले होते. मधल्या खोलीत येऊन प्रासबाई काही बांधाबांध करीत होती. इतक्यात खोलीत कोणाची तरी सावली पडली. प्रासबाईने चटकन् वळून पाहिले. दारात दफार्जबाई उभी होती.

''एव्हरमाँदची पत्नी कुठे आहे?'' तिने दरडावून विचारले.

ल्यूसीच्या प्रयाणाची शंका येऊ नये म्हणून प्रासबाईने झटकन् पुढे होऊन एका खोलीचे दार लावून घेतले व आपण वाट अडवून दारात उभी राहिली. दफार्जबाईची अशी ठाम कल्पना झाली, की खोलीत ल्यूसी असावी.

''मी तुला आत जाऊ देणार नाही!'' प्रासबाई ओरडली.

दफार्जबाईने तिच्याकडे तुच्छतेने पाहिले व ती दरडावून ओरडली, ''एव्हरमाँदच्या बायकोला आत लपवून ठेवतेस काय? ते जमायचं नाही!''

''जा टवळे, मी इथे उभी आहे.''

''तू काय करतेस तेच बघते!'' प्रासबाई मनात म्हणाली, 'तू जितका वेळ हुज्जत घालीत बसशील, तितकाच जास्त वेळ त्यांना पळून जायला मिळेल.'

''दारातून दूर हो! नाहीतर मी तुझ्या चिंधड्या उडवीन!''

''अगं जाऽ तुझ्यासारख्या पुष्कळ पाहिल्या आहेत मी!''

या अपमानाने खवळलेली दफार्जबाई खोलीकडे धावली, पण प्रासबाईने मोठ्या चलाखीने तिच्या कमरेला विळखा घातला आणि तिला रोखून धरले. झोंबी चालू झाली. दफार्जबाईने झुब्यातील खंजीर वा पिस्तूल हस्तगत करण्याची धडपड चालविली, पण ती गोष्ट लक्षात येताच प्रासबाईने तिथेच पिस्तूल हस्तगत करून तिच्यावर झाडले. 'धडाड्' असा आवाज झाला आणि दफार्जबाई मृत होऊन जमिनीवर कोसळली.

प्रासबाईने गडबडीने आपले कपडे नीटनेटके केले, डोळे पुसले आणि सामान गोळा केले. मग दरवाजाला कुलूप ठोकून ती बाहेर पडली. झालेल्या झगड्याचे कोणतेच चिन्ह आता तिच्या अंगावर दिसत नव्हते. वाटेत तिने घराच्या किल्ल्या गंगार्पण केल्या व ती ठरलेल्या ठिकाणी येऊन जेरीला भेटली.

''का रे बाबा, रस्त्यात काही गडबड दिसली का?'' तिने विचारले. ''तू ऐकली नाहीस? का तासाभरातच किंवडी झालीस?'' जेरी म्हणाला.

''मला वाटलं, काही तरी आवाज झाला नि धाडकन् काहीतरी खाली कोसळलं!''

''मूर्खच आहेस! कैद्यांनी भरलेल्या गाड्या वधस्तंभाकडे गेल्या नि मागोमाग आरडा-ओरडा करीत लोकांचा केवढा तरी जमाव गेला. अद्यापि गलका ऐकू येतोय् आणि हे जर तुला ऐकू येत नसेल तर यापुढे जन्मात तुला काहीच ऐकू येणार नाही!''

●●●

## २१. खरी चिरशांती

कैद्यांनी भरलेल्या गाड्या वधस्तंभाच्या दिशेने चालल्या होत्या. असंख्य लोक हे दृश्य पाहात उभे होते. ''यातला एव्हरमाँद कोणता?'' भीतीने घाबराघुबरा होऊन गर्दीत उभ्या असलेल्या बरसाडला कोणीतरी विचारले.

''तो त्या गाडीत मुलीचा हात धरून उभा आहे ना, तोच.'' तो उत्तरला व त्याने सुटकेचा एक दीर्घ निश्वास टाकला.

सर्व सिद्धता झाली आहे. 'सूडबया' दफार्जबाईची वाट पाहात उभी आहे. प्रत्येक शिरच्छेद प्रसंगी वीणकाम करीत उभी असणारी दफार्जबाई आज कोणाला दिसत नव्हती.

गाड्या रिकाम्या होऊ लागल्या. एकामागून एक शिरच्छेद होऊ लागले. मुंडक्यांची मोजदाद होऊ लागली. कार्टनने त्या मुलीला मुद्दामच त्या भयानक यंत्राकडे पाठ करून बसविले होते. तो तिला सारखा धीर देत होता. ती त्याचे आभार मानीत होती.

''मला सारखी भीती वाटतीय. त्यामुळे परमेश्वराकडे चित्तच लागेनासं झालं आहे! पण काय हो, आता यानंतर आपल्या प्रियजनांना भेटायचं झालं तर मृत्यूच्या अज्ञात राज्यातच दीर्घकाल राहावं लागणार का?'' तिने विचारले.

''मुली, तिथे ना दु:ख, ना यातना!''

''तुम्ही मला खूप धीर देता. मी तुमचं चुंबन घेऊ?''

''जरूर घे, मुली!'' कार्टनने तिचे प्रगाढ चुंबन घेतले. तिला आशीर्वाद दिला. त्या मुलीचे हात किंचित् थरथरल्यागत झाले. शिरच्छेदयंत्राचा तो प्रचंड फाळ खाली आदळला. परमेश्वरावर नितांत श्रद्धा दर्शविणारी तिची मुद्रा धडापासून वेगळी झाली. त्या पोरीचे अस्तित्व नष्ट झाले.

''जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मरण पत्करूनही अमर राहातो!'' कार्टनच्या कानात हे शब्द घुमत होते. अथांग जनसागर त्याला पाहाण्यासाठी रेटारेटी करीत होता. सुरा खाली आला. कार्टन निघून गेला.

''मृत्यूला इतक्या शांतपणे कवटाळणारा बहाद्दर आपण पाहिला नव्हता!'' लोक म्हणत होते, ''तो एखाद्या देवदूतासारखा दिसला!'' कोणी म्हणाले, ''त्याने भविष्य वर्तविले आहे. बरसाड, सूडबया, खोटे न्यायालय, खोटे पुरावे, गुलेटिनचे बळी, या साऱ्या भयानकतेमधून आज ना उद्या नवी पॅरिसनगरी उदयाला आल्याशिवाय राहाणार नाही.''

मृत्यूला कवटाळताना कार्टन मनात म्हणाला असेल, 'ज्यांच्यासाठी मी प्राणार्पण केलं, ती माणसं इंग्लंडमध्ये सुखाने राहतील. त्या कुटुंबातील सर्वांच्या अंत:करणात माझी स्मृती चिरकाल नांदेल. पिढ्यान्‌पिढ्या त्या घराण्याच्या अंत:करणात माझी स्मृती नांदेल! त्यांचा वैभव-प्रकाश हाच माझा वैभव-प्रकाश नव्हे का? मुलाबाळांना माझी कथा ऐकवली जाईल. एवढं मोठं सत्कृत्य मी कधीच केलेलं नाही! मर्त्यसृष्टीत राहिलेली माझी स्मृती हेच खरं चिरजीवन , यातच खरी चिरशांती!'

●●●